म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालेवाङ्मय
दा. क्र. ६३९९

IRBK-0106399

दा.क्र.६३९९

मरा

३१४. २८४०
आ. ना.
१८११
३-४-५

ललितसाहित्य प्रकाशन ५५ वें

म. ए. सं. हांजे, ग्रंथालय शास्त्र.
ग्रं. क्र. ६३९१ नों दि .....
ता. ....
ला. सं.

परिचिता

—सुशीला चिकटे

IRBK-0106399
IRBK-0106399

किंमत दोन रुपये

१९५७

मुखपृष्ठ : चित्रकार पेडणेकर

प्रकाशक :
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार,
१८६ शनवार, पुणे २.

मुद्रक :
न. शं. कुलकर्णी,
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
७७ शनिवार पेठ, पुणे २.



मत्स्यगन्धा १

आधींच शोभिवंत आणि भव्य दिसणारें 'रंजन-मंदिर' आज नानापरींनीं सजविल्यामुळं अधिकच नयनमनोहर दिसत होतें आणि नेत्रांचें पारणें फेडीत होतें. आज बरेच दिवसांनीं एकाएकीं सम्राट् शंतनुमहाराजांची लहर लागली होती आणि नवीन नर्तकी जयमाला हिचं नृत्य पाहाण्याची आपली इच्छा त्यांनीं प्रगट केली होती. प्रत्यक्ष महाराजांची आज्ञा, मग तिची अंमलबजावणी व्हायला कसला अवकाश होता. प्रत्येक सेवकानं आपली पराकाष्ठा केली आणि थोडयाच वेळांत 'रंजन महाल' प्रेक्षकाचं स्वागत करण्यास सिद्ध झाला.

नाना प्रकारच्या पुष्पमालांनीं आणि पुष्पगुच्छांनीं महाल सुशोभित झालाच होता, शिवाय सुगंधित पण झाला होता. तऱ्हेतऱ्हेच्या फुलांच्या नाजूक आणि मादक सुवासांनीं सारं वातावरण दरवळून गेलं होतं आणि मनाला प्रसन्न करीत होतं. साऱ्या महालभर पसरलेला मौल्यवान् मखमाली गालिचा पायाला गुदगुल्या करीत होता. मधून मधून मांडलेल्या देवतांच्या व ऋषिमुनींच्या मूर्तीच शिल्पकलाकारांचें कसब व्यक्त करीत होत्या. रंगीत हंड्याझुंबरांमधून पडणारे प्रकाश-किरणहि रंगीबेरंगीच होते. जागजागीं ठेवलेल्या आसनांना लावलेलीं रत्नें त्या प्रकाशांत चमकत होतीं आणि आसनांवर विराजमान झालेल्या सरदार-उमरावांच्या अंगाखांद्यावरील आभरणांवर तें तेज मिसळून ठिकठिकाणीं तेजोवलयें निर्माण झाल्याचा भास होत होता. त्या महालाकडे पाहिलं, कीं भरताच्या राज्याचं वैभव किती अवाढव्य आहे याची कल्पना येत होती. तेजानं झळाळणारे मानकऱ्यांचे चेहेरे आणि रुबाब पाहिला कीं राज्याच्या

संपन्नतेची जाणीव होत होती. तिथं एकवटलेलीं सारीं संपदेचीं चिन्हं म्हणजे जणूं पौरव साम्राज्याच्या विस्ताराची साक्षच होती.

कला आणि कौशल्य, पराक्रम आणि संपदा, पौरुष आणि रसिकता यांचा सुंदर संगम झालेल्या त्या महालांत मध्यभागीं एक सुंदर नर्तिका नृत्य करीत होती. तिच्या पायांतलीं पैंजणें रुमझुम असा मंजुळ आवाज करीत होतीं. आणि वाद्यांचा सुस्वर ध्वनि त्या आवाजांत मिसळत होता. नर्तिका आपल्या कौशल्याची पराकाष्ठा करीत होती. आज कितीतरी दिवस नर्तिका महाराजांना आपलं नृत्यकौशल्य दाखविण्याचं मनांत योजून होती. शंतनुमहाराजांच्या नृत्यशाळेंत अग्रमान पटकाविणं हें तिचं जिवाभावाचं ध्येय होतं. शेवटीं आज शंतनुमहाराजांची लहर लागून त्यांनीं आज मैफलीची आज्ञा दिली होती. आपल्या ध्येयाची पूर्तता होण्याची हीच संधि आहे हें लक्षांत घेऊन नर्तिका जयमालेनं आपलं सारं कौशल्य पणाला लावलं होतं.

नृत्याचे नवनवीन प्रकार दाखवून ती प्रेक्षकांना चकित करीत होती. सारी सभा चित्रासारखी तटस्थ बसली होती. विजेच्या चपळतेनं लवलवणाऱ्या जयमालेच्या नाजूक आणि लवचिक देहलतिकेवर साऱ्यांच्या नजरा खिळल्या होत्या. आपल्या कोमल करकमलांनीं आणि हळुवार पदक्षेपांनीं नर्तिका नाना प्रकारचे भाव व्यक्त करीत होती. ते भाव टिपून घेण्यासाठींच साऱ्या नजरा अधीर झाल्या होत्या.

जयमालेनं सर्पनृत्य संपविलं आणि आतां तिनं 'समर्पण' या नृत्याला सुरुवात केली. प्रथम तिनं प्रियकराच्या प्रथमदर्शनानं प्रेयसीच्या मनांत निर्माण झालेली चलबिचल व्यक्त केली. मग विरहानं व्याकुल झालेल्या अवस्थेचा आविष्कार केला. शेवटीं, मीलनासाठीं आतुर होऊन, विरहताप असह्य झाल्यानं विरहिणी सारा अभिमान सोडून देऊन, प्रियकराला आत्मसमर्पण करावयास निघाल्याचा अभिनय केला. या नृत्यांतील नर्तिकेचा अभिनय आणि मुद्राविभाव इतका हृदयस्पर्शी झाला कीं जणूं काय तीच या विरहयातना भोगते आहे. प्रीतीच्या परिचयानं तिलाच असं होरपळून टाकलं आहे. मदन-बाधेनं तिलाच अशी विकलावस्था प्राप्त झाली आहे.

प्रीतीच्या नव्या आणि पहिल्या चाहुलीनं मनाचं कमल प्रफुल्लित झालं. प्रीतीच्या खऱ्या स्वरूपाची पूर्ण जाणीव झाल्यावर त्या पुष्पांच्या पाकळ्या

लाजून लाल झाल्या, शहारल्या, संकोचल्या, पण पुन्हा विकसित झाल्या. आतां मीलनाची आंस लागली. विरहानं जीव विव्हल झाला, प्रियकर येईल म्हणून वाट पाहिली पण तो रुसला होता. प्रीतीच्या मधुर जाणिवेनं फुललेलं हृदयपुष्प आतां विरहानलानं सुकूं लागलं शेवटीं प्रेयसी प्रियकराला शरण गेली आणि आत्मसमर्पणाला सिद्ध झाली.

वायुलहरींनीं जलाशयावर हळुवार तरंग उठावेत. त्याप्रमाणं कोमल करकमलं, चपल चरणांची हालचाल आणि लवलवणाऱ्या शरीराची लयबद्धता यांच्या साहाय्यानं तारुण्यानं आणि सौंदर्यानं बहरलेल्या चेहेऱ्यावर ही प्रेमकथा नर्तिकेनं साकार केली तेव्हां टाळ्यांचा कडकडाट झाला. इतका वेळ तन्मयतेनें नृत्य पाहणाऱ्या प्रेक्षकगणानं एकदिलानं आपला संतोष आणि आनंद दर्शविला. समर्पण केल्याचा आविर्भाव करण्याकरितां नर्तिका नतमस्तक झाली होती. टाळ्यांचा कडकडाट कानांवर पडतांच ती आनंदून गेली. प्रेक्षकगणाची पसंती तिला समजली. आतां शंतनुमहाराजांचं मनोगत समजून घेण्याकरितां तिचा जीव आतुर झाला. समर्पणाच्या पावित्र्यांत खालीं केलेलं मस्तक तिनं हलकें वर केलं. आपल्या नर्तनकौशल्याचा शंतनुमहाराजांच्या मनावर काय परिणाम झाला, याचा प्रत्यय घेण्याकरितां म्हणून जयमालेनं धीटपणानं सिंहासनाकडं नजर टाकली आणि महाराजांशीं दृष्टादृष्ट झाली.

पण नर्तिकेच्या अपेक्षेप्रमाणें महाराजांच्या चर्येवरचे भाव कौतुकाचे नव्हते. आनंदाचेहि नव्हते. त्यांच्या चेहेऱ्यावर विकलतेचे भाव पसरले होते आणि असह्य वेदना झाल्याप्रमाणं त्यांनीं आपले दोन्ही हात छातीवर दाबून धरले होते. जयमालेशीं नजरानजर होतांच त्यांचा चेहरा अधिकच कष्टी झाला "नको नको" असं मोठ्यानं ओरडून, झपाझपा सिंहासनाच्या पायऱ्या उतरून ते द्रुतगतीनं महालाच्या बाहेर पडले.

नर्तकी आश्चर्यचकित झाली. सारेजण अगदीं भांबावून गेले. निरभ्र आकाशांत अकस्मात् अभ्रं यावींत तसं झालं. शंतनुमहाराजांच्या दरबारांत असं कधींहि घडलं नव्हतं. महाराज गुणग्राही होते. कुणीहि कलावंत असा अनुभव घेऊन दरबारांतून परत गेला नव्हता. त्यांतून आजच्या या नर्तिकेचं कौशल्य असामान्य होतं. तिच्या कलेचं चीज शंतनुमहाराजांनीं स्वतः करावं अशीच तिची योग्यता होती. तिच्या कलेचा श्रेष्ठ दर्जा लक्षांत आल्यावर महाराज

फारच खूप होणार अशी सर्वांची खात्री झाली होती, पण झालं तें सारं अघटितच.

महाराज प्रसन्न तर झालेच नाहीत, उलट दुःखीकष्टी होऊन आसनत्याग करून एकाएकीं महाल सोडून निघून गेले. हें काय झालं ...? असं कसं झालं? सारा दरबार आश्चर्यानं मूढ होऊन महाराजांच्या पाठमोऱ्या आकृतीकडं पाहात राहिला. काय झालं हें क्षणभर कुणाच्याच ध्यानांत येईना.

हळू हळू आश्चर्याची लाट ओसरली आणि साऱ्यांच्या नजरा आतां युवराजाकडे वळल्या. युवराजानं सर्वांचं मनोगत ओळखलं, आपल्या गळ्यांतला बहुमूल्य मुक्ताहार काढून तो नर्तिकेपुढं करून तो म्हणाला, "जयमाले, झालेल्या घटनेबद्दल मी फार दिलगीर आहें. काय झालं त्याचं कारण मला तुम्हां सर्वांच्याइतकंच अज्ञात आहे. तरीपण तुझी कला फारच श्रेष्ठ दर्जाची आहे. तिचं कौतुक मला केलंच पाहिजे. माझ्या पित्याची जाणीव अंशतः तरी भरून काढण्याची माझी इच्छा आहे.

बिचारी जयमाला अगदीं खिन्न झाली होती. मघाशीं उत्साहानें रसरसलेला तिचा चेहेरा आतां काळवंडून गेला होता. अधोवदन होऊन ती म्हणाली, "युवराज, माझ्या कलेचा आपण गौरव केलात, याबद्दल मी आपलीं फार आभारी आहें. आपण देऊं केलेलें पारितोषिक मीं स्वीकारलें असतें; पण केव्हां? महाराज खूष झाले असते तर. त्यांच्या चेहेऱ्यावर उमटलेले खुषीचे आणि प्रसन्नतेचे भावच माझ्या कलेचं कौतुक करायला पुरेसे होते. त्यांच्या मुखांतून बाहेर पडलेला एखादा प्रशंसोद्गार मला पृथ्वीमोलाचा वाटला असता. माझ्या कलेनं त्याचं रंजन न होतां ती त्यांच्या दुःखालाच कारणीभूत झालेली पाहून मला किती वेदना होताहेत; म्हणून मी मुक्ताहार स्वीकारूं शकत नाहीं, याबद्दल आपणच मला क्षमा करावी."

जड पावलानं नर्तकी तिथून निघून गेली. इतरहि प्रेक्षक भारावलेल्या अंतःकरणानं तिथून निघून गेले. युवराज देवव्रत एकटाच विचारमग्न अवस्थेंत तिथें उभा होता. आपल्या पित्याचा रसिक स्वभाव त्याच्या पूर्ण परिचयाचा होता. सर्व प्रकारच्या ललितकलांची त्यांना विशेष आवड होती. कलावंतांना उत्तेजन देण्यांत त्यांनीं कधींच कसूर केली नव्हती. असं असतांना आज हा

प्रकार घडावा याचा अर्थच त्याला कळेना. पण आपल्या पित्याच्या या विचित्र कृतीचा अर्थ लावण्याचा तो प्रयत्न करूं लागला, तेव्हां एक गोष्ट त्याच्या लक्षांत आली.

आजच्या या मैफलीची आज्ञा जरी शंतनुमहाराजांनीं दिली असली, तरी नेहमींप्रमाणं ते आज रंगून गेले नव्हते. कलेचा रसास्वाद घेतांना महाराज कलावंतांशीं किती एकरूप होत, याचा नेहमीं अनुभव घेणाऱ्या युवराज देवव्रताच्या लक्षांत आलं कीं, आज महाराजांचं मन कांहीं नृत्यांत नव्हतं, ते बेचैन दिसत होते. नृत्यानं मन रमण्याऐवजीं मनांतलं दुःख चाळवलं जावं तसं त्यांच्या हालचालीकडं वघून वाटत होतं. अशा मैफलीच्या वेळीं युवराज देवव्रताचं आसन नेहमीं शंतनुमहाराजांच्या जवळच असे आणि कलावंतानं कांहीं विशेष कौशल्य दाखविलं कीं महाराज युवराजाकडं सस्मित आणि साभिप्राय नजर टाकीत आणि आपला आनंद एकुलत्या एका पुत्राजवळ व्यक्त करीत.

आज असं कांहींच झालं नव्हतं. उलट युवराजांची नजर टाळण्याचाच त्यांचा प्रयत्न चालला होता. महाराजांच्या मनाला कसली व्यथा त्रास देत असावी, याचा मात्र देवव्रताला उलगडा होईना. परंतु, कांहीं तरी दुःख त्यांना जाळीत असावं, याबद्दल मात्र त्याची खात्री होती. शेवटीं महाराजांच्या प्रकृतीची चौकशी करून मग आपण आपल्या शयनमंदिराकडं वळावं असा विचार करून युवराज देवव्रत रंजन-मंदिरांतून बाहेर पडले.

महाराज पर्यंकावर पहुडले होते. एक सेवक त्यांना विंझणवारा घालीत होता. महालांतील दीपांचा प्रकाश अगदींच मंद होता. त्या अंधुक प्रकाशांत महाराजांची म्लान आणि खिन्न मुद्रा अधिकच उदासवाणी वाटत होती. थकलेल्या सुरांत महाराज म्हणाले, "युवराज, आज सर्वांचा विरस झाला माझ्याकडून."

"छेः छेः ! आपण दुःखी झालेले पाहून आम्हां सर्वांना चिंता वाटत आहे. महाराज, आपल्या दुःखाचें कारण कळलें, तर त्याचा परिहार करण्याचा मी प्रयत्न करीन."

बिचारे शंतनु महाराज ! पुत्राचें आपल्यावरील प्रेम पाहून त्यांना धन्य वाटलें; पण ते काय सांगणार त्याला–! आपल्या मनांतलं शल्य ते युवराजांना

सांगूं शकत नव्हते. छेः ! तें त्याला सांगण्यासारखं नव्हतंच. युवराज देवव्रत त्यांचा लाडका पुत्र होता. पित्यानं पुत्राशीं मित्रवत् वागण्याच्या वयांत तो आला होता, हें सारं खरं. पण म्हणून काय पिता आपलं प्रेमप्रकरण पुत्राला सांगूं शकेल ?

शंतनुमहाराजांनीं आपल्या त्या देखण्या आणि पराक्रमी पुत्राकडं नीट निरखून पाहिलं आणि एक दीर्घ निःश्वास टाकून ते म्हणाले, " बाळा, मला तुझ्या आईची आठवण झाली रे ! जा आतां. विश्राम कर. "

पित्याला वंदन करून युवराज देवव्रत जाऊं लागला. महालाबाहेर पडणाऱ्या त्या भव्य पाठमोऱ्या आकृतीकडं बघत महाराजांनीं पुन्हा एक उसासा टाकला आणि ते मनांत म्हणाले, " बाळा, क्षमा कर मला. तुझ्याशीं प्रतारणा केली मीं–असत्य भाषण केलं. पण काय करूं बाळ. एका स्त्रीच्या मोहपाशांत मी पडलों आहें, असं कसं सांगूं तुला...! स्त्रीच्या सौंदर्यानं मोहून जाण्याचं, तिच्या सहवासासाठीं आतुर होण्याचं तुझं वय. तुला मीकोणत्या शब्दांत माझ्या अभिलाषेची कहाणी सांगूं–"

शंतनुमहाराजांनीं डोळे मिटले. गेल्या आठ दिवसांत घडलेल्या घटनांचा सारा चित्रपट त्यांच्या नजरेसमोर सरकूं लागला. देवव्रताला महाराजांनीं सांगितलेलें कारण कांहीं अंशीं खरंच होतं. सुमारें आठ दिवसांपूर्वी महाराजांना एकाएकीं तीव्रतेनं गंगेची आठवण झाली. गंगेची अशी आठवण झाली म्हणजे महाराज गंगातीरीं जावयाचे आणि तिच्या परिसरांत हिंडून सान्निध्यांत घालविलेले सुखक्षण आठवायचे आणि मनाचा दाह शांत झाला कीं परत फिरायचे.

या नियमाला अनुसरून त्या दिवशीं गंगेची आठवण झाल्याबरोबर महाराज एका विश्वासू सेवकानिशीं गंगातीरावर गेले. तीरावरच्या एका विशाल वटवृक्षाच्या बुंधाला टेकून, डोळे मिटून ते गंगादेवीच्या मधुर चिंतनांत मग्न होणार, इतक्यांत पश्चिमेकडून वहात येणाऱ्या वायुलहरी-बरून आलेल्या एका विलक्षण मधुर सुगंधाची त्यांना जाणीव झाली. सम्राटाचें वैभव उपभोगणारे शंतनुमहाराज, नानाप्रकारच्या सुमधुर सुगंधाचा त्यांनीं आस्वाद घेतला होता. पण हा सुगंध कांहीं अपूर्वच होता. तो पृथ्वीतला-वरचा नव्हताच. क्रीडा करणाऱ्या अप्सरांच्या हातून चुकून एखादं स्वर्गीय

अनुक्रम 2-5-67
3-7-67

पुष्प भूमंडलावर गळून पडलं असावं आणि त्याचाच हा अलौकिक सुगंध इथं पसरला असावा, असं महाराजांना वाटलं. त्या अपूर्व सुगंधानं त्यांचं मन प्रसन्न झालं. ज्या गंगादेवीचीं स्मृतिचित्रं उजळायाला ते इथं आले होते, तिचा त्यांना अजिबात विसर पडला. आणि तिच्या चिंतनांत मग्न होण्याऐवजीं ते डोळे मिटून त्या सुगंधाची मजा लुटूं लागले.

क्षण दोन क्षणच महाराजांनीं तें सुख अनुभवलें असेल. कारण सुखकारक वाटणाऱ्या त्या सुगंधाच्या लाटा आतां अगदीं जवळून आल्यासारख्या भासूं लागल्या. विरल भासणारं धुकं जवळून अधिकच दाट दिसावं आणि आपण त्यांत गुरफटून जावं त्याप्रमाणं त्या सुगंधाच्या लाटेनं आतां आपण वेढलों गेलों आहोंत असं त्यांना वाटे. आतां त्यांची जिज्ञासा प्रबल झाली. हा अपूर्व सुगंध येतो आहे, तरी कुठून याचा शोध घ्यावा, म्हणून ते उठून उभे राहिले आणि आजूबाजूला न्याहाळून पाहूं लागले.

गंगा-नदीच्या विस्तीर्ण आणि अथांग पात्रावरून एक लहानशी नौका डुलत डुलत येत होती. ती नौका जसजशी जवळ येत होती तसतशी सुगंधाची तीव्रता अधिकच वाढत होती. त्यावरून या नौकेंतच सुगंधाचा उगम असला पाहिजे, अशी शंतनुमहाराजांची खात्री झाली. ते कुतूहलानं नौका जवळ येण्याची वाट पाहूं लागले.

नौका तीराला लागली. नौका वल्हवणारी युवती खालीं उतरली आणि महाराजांच्या दिशेनंच चालूं लागली. आतां तो सुगंधाचा प्रवाह इतका तीव्र झाला कीं महाराजांच्या गात्रागात्रांतून धुंदी चढूं लागली. जलप्रपाताच्या तुषारांनीं गुदगुल्या व्हाव्यात, त्याची शीतलता सुखकारक वाटावी, पण तो प्रपातच अंगावर कोसळूं लागल्यावर जीव गुदमरूं लागावा, तशी महाराजांची अवस्था झाली, मनाशीं प्रसन्नकारक वाटणारा तो सुगंध आतां त्यांना अस्वस्थ करूं लागला. हा दिव्य सुगंध त्या युवतीच्या शरीरांतूनच पसरत आहे, हें महाराजांच्या लक्षांत आलं. सुगंधाइतकंच फूलहि मोहक असावं त्याप्रमाणं सुगंधाच्या देणगीइतकंच तिचं रूपहि तेजस्वी होतं. नुकत्याच उमललेल्या प्रफुल्ल पुष्पाच्या दर्शनानं फुलपांखरूं चटकन् त्या फुलाकडं आकृष्ट व्हावं, त्याप्रमाणं शंतनुमहाराजांचं मन त्या स्त्रीच्या रूपमाधुर्यानं भारून टाकलं.

ती जवळ येईपर्यंत महाराज तिच्याकडं टक लावून पाहात होते. ती अगदीं नजीक येतांच ते हळूच म्हणाले, " गंधवती ! "

आश्चर्यविस्फारित नेत्रांनीं महाराजांकडे न्याहाळून पाहात तिनं चटकन् त्यांना वंदन केलं आणि विनयानं म्हणाली, " योजनगंधा, गंधवती नव्हे! " " ठीक आहे. योजनगंधे, तूं कोण आहेस ? हा दिव्य सुगंध तुला कसा प्राप्त झाला ? "

" महाराज, धीवर जमातीचा नायक दाशराज याची मी कन्या. माझं खरं नांव सत्यवती. पूर्वी माझ्या शरीराला मासळीसारखा वास येत असे. गंगातीरावर नाव घेऊन उभं राहायचं, कुणाला जरूर असल्यास पैल तीरावर नेऊन सोडायचं हें माझं काम. एकदां पराशर मुनींना मी पैलतीरीं नेऊन सोडलं; तेव्हां ते मजवर प्रसन्न होऊन त्यांनीं माझ्या शरीराचा दुर्गंध नाहींसा केला आणि या सुगंधाचें वरदान दिलें. तेव्हां मला मत्स्यगंधा म्हणत असत. आतां योजनगंधा म्हणतात. कारण माझ्या शरीराचा सुगंध योजनभर पसरतो. "

गंधवतीचा हा वृत्तांत ऐकतांच महाराज प्रसन्न झाले आणि म्हणाले, "सुगंधे, तुझा हा अनुपम गंध आणि मनोहर लावण्य पाहून माझं मन तुझ्याकडं ओढ घेत आहे. उदईक तुझ्या घरीं येऊन तुझ्या पित्याला भेटेन आणि तुला मागणी घालीन. तूं माझी होशील का ? "

शंतनुमहाराजांचा तो सरळ सवाल ऐकून बिचारी सत्यवती अगदीं लज्जित झाली आणि खालीं मान घालून मुकाटचानं उभी राहिली. तिच्या लज्जेचा आणि मौनाचा अर्थ महाराजांना समजला आणि त्यांनीं तिला जाण्याची अनुज्ञा दिली. मधून मधून मागं मुरडून पाहणाऱ्या तिच्या उंच सडपातळ आकृतीकडं पाहात महाराज मनाशीं म्हणाले, " गंगेच्या स्मृतीनं कष्टी झालेलं आपलं मन शांत करायला आपण इथं आलों. पण तें शांत न होतां अधिकच भडकलं मात्र. या गंगातीरावरच आपल्या प्रणयजीवनाचा उगम व्हावा असा ईश्वरी संकेत दिसतो आहे. इथंच या गंगातीरावरच आपल्याला गंगेचं दर्शन झालं. तरुण, सुंदर अशा स्त्रीस्वरूपांत ती या तीरावर क्रीडा करीत असतांना आपल्या दृष्टीस पडली. विवाहाच्या याचनेला तिनं होकार दिला आणि कांहीं काल आपल्या सहवासाचं सुख देऊन, देवव्रतासारखं पुत्ररत्न अर्पण करून आपल्या आयुष्यांतून कायमची अंतर्धान

पावली. गंगेच्या विरहानं व्याकुळ झालेलं आपलं मन आज दुसऱ्याच एका स्त्रीच्या लाभासाठीं उत्सुक झालं आहे."

दुसऱ्या दिवशीं महाराजांनीं खरोखरीच दाशराजाच्या घरीं जाऊन सत्यवतीला मागणी घातली. शंतनुमहाराजासारखा एवढा मोठा चक्रवर्ती-सम्राट् आपल्यासारख्या यःकश्चित् कोळ्याच्या पोरीला मागणी घालतो आहे, हें पाहून दाशराज आश्चर्यानं थक्क झाला. पण होकाराची भाषा मात्र चटकन् त्याच्या मुखांतून निघेना. त्याची चलबिचल पाहून शंतनुमहाराज म्हणाले, "धीवरराज, तुझ्या मनांत कांहींतरी शंका दिसते आहे, म्हणून तूं असा घुटमळतो आहेस. तुला काय उलगडा हवा असेल तो करून घे. मी तुझ्या शंकेचं निरसन करून टाकायला तयार आहें."

महाराजांचं आश्वासन ऐकून दाशराज हात जोडून म्हणाला, "महाराज, खरं म्हणजे आपण सत्यवतीची राज्ञीपदावर स्थापना करणार हाच केवढा अनुग्रह आहे. आणखी मी आपणांजवळ काय मागणार...? पण तरीहि एकाच अटीवर सत्यवती मी आपल्याला अर्पण करितों."

"अट...अन् ती कोणती?" महाराज अधीरपणानं म्हणाले. त्यांना वाटलें फार तर पांच गांवं मागेल, धनसंपत्ति मागेल."

"माझ्या सत्यवतीला होणाऱ्या पुत्रालाच आपल्या मागें राज्य मिळालें पाहिजे."

दाशराजाची ती विचित्र अट ऐकून महाराज एकदम मूक झाले. त्या अटीचा संपूर्ण अर्थ लक्षांत आल्यावर, त्यांच्या डोळ्यासमोर देवव्रताची ती भव्य आणि देखणी मूर्ति उभी राहिली; दाशाची मागणी पुरी करणं किती अशक्य आहे, हें त्यांच्या लक्षांत आलं. एक शब्दहि न बोलतां महाराज माघारीं आले.

महाराज शंतनु राजवाड्यांत परत आले खरे, पण त्यांचं मन सत्यवती-भोंवतीं घोटाळत होतें. तिची सुंदर मूर्ति पुन्हा पुन्हा डोळ्यापुढं उभी राहात होती. आणि ती विचित्र अट त्यांना अस्वस्थ करीत होती. दाशाची ती मुलखावेगळी मागणी आठवली, कीं त्यांचं मन क्षुब्ध होई आणि ते मनाशीं म्हणत, अट-अट! कसली ही राक्षसी अट-! माझ्या प्रीतीची पूर्ति अटीतटी-शिवाय व्हायचीच नाहीं, असा शाप आहे कीं काय मला कोणीं दिलेला...!

प्रेमसाफल्याचा मार्ग कधीं निष्कंटक नसतोच कीं काय...! गंगेवर माझं मन जडलं, तिची माझ्यावर प्रीति बसली पण तिचं माझं मीलन कांहीं निःशंक मनानं झालं नाहीं. मनांत कसलाही दुजाभाव न ठेवतां घडलेलं मीलन तेंच खरं मीलन. पण तें माझ्या नशिबीं नव्हतंच. ती माझ्यावर लुब्ध झाली, पण तिनंहि अशीच विचित्र अट घातली. आपल्या उदरीं जन्म घेणाऱ्या साऱ्या अपत्यांना गंगा नदींत बुडवून टाकणार आणि मी तिला प्रतिबंध केल्यास माझा त्याग करणार अशा अटीवरच तिनं माझ्याशीं विवाह केला. त्या वेळीं अपत्यस्नेहाशीं माझी ओळख नसल्यानं मीं ती अट मान्य केली. मोठ्या कष्टानंच. पण ती पाळतांना माझ्या जिवाला किती यातना झाल्या तें माझं मलाच माहीत. प्रत्येक बाळाच्या मृत्यूबरोबर माझ्या काळजाचा लचका तोडला जाई. मदनासारखं सुंदर आणि फुलत्या पुष्पासारखं सुकुमार बाळ पाहून मी आनंदून जाई. या वेळीं तरी गंगेला दुर्बुद्धि आठवणार नाहीं अशी आशा करी; पण मन घट्ट करून मला त्या बालकाचा शेवट पाहावा लागे. कारण गंगेच्या सहवासाला दुरावण्याची भीति; पण आठव्या बालकाला पाहिल्यावर मात्र मला माझ्या भावना आवरतां येईनात. सूर्यासारखं तेजस्वी असं तें प्रफुल्लित बालक पाहून माझं मन प्रीतीनं उचंबळून आलं. त्या क्षणीं स्त्री-सौंदर्याच्या आसक्तीवर अपत्यस्नेहानं विजय मिळविला. गंगेच्या हातांतून त्या बालकाला मीं ओढून घेतलं, हृदयाशीं धरलं आणि तिला माझा नकार दिला. गंगा जणूं याच क्षणाची वाट पाहात होती. तिनं तत्काळ आपल्या खऱ्या स्वरूपाची मला जाणीव दिली. आपल्या वर्तनाचा उलगडा केला. ब्रह्मदेवाच्या शापानं ती या मानवी जगांत स्त्री म्हणून आली आणि तिनं माझं राज्ञीपद भूषविलं. तीं बालकं म्हणजे वसिष्ठांनीं शापिलेले अष्टवसु होते. मानवयोनींतून चटकन् मुक्तता होण्यासाठीं हा बनाव घडवून आणला होता. ही सारी हकीकत कळल्यानंतर माझं मन हलकं झालं. देवव्रतासारखा गुणवान् पुत्र मला देऊन गंगा माझ्या जीवनांतून विराम पावली. तिच्या माझ्या सहजीवनाचं देवव्रत हें प्रतीकच आहे. गंगेच्या सहवासाची सुखद स्मृति आणि त्या साहचर्याची ही पुत्ररत्नरूपी गोड आठवण यांत मी अगदीं सुखी होतों. मला भाग्यवान् समजत होतों. पण हें दुसरं प्रेम, हा मोह पुन्हा उपस्थित झाला. आणि या प्रेमपाशाबरोबर पुन्हा त्याच दारुण यातना, तोच

मानसिक छळ वांट्याला आला. अपत्यस्नेहाला नवखं असलेलं माझं मन त्या वेळीं गंगेची ती शर्त मान्य करूं शकलं. पण आतां मी अपत्यस्नेहाचा अनुभव घेतला आहे. देवव्रतासारख्या गुणवान् आणि पराक्रमी पुत्राचा मी पिता आहें. त्याचं राज्यपद काढून तें दुसऱ्याला देण्यासारखं कर्म माझ्या हातून कधींच होणार नाहीं. माझ्यामागून राज्यपदावर बसण्यास तो सर्वतोपरि योग्य आहे. देवव्रताला दुखविण्यासारखं माझ्या हातून कांहींच होणं अशक्य आहे. तो माझा जीव कीं प्राणच आहे."

दाशराजाची मागणी वेडेपणाची म्हणून जितक्या सहजपणं महाराजांनीं उडवून लावली तितक्या सहजपणानं त्यांना सत्यवतीला विसरणं शक्य होईना. तिचं सुंदर श्यामल रूप आणि शरीराचा मादक दिव्य सुगंध यांनीं महाराजांना भारून टाकलं होतं. सत्यवतीची लावण्यमूर्ति एक क्षणभरहि त्यांच्या दृष्टिआड होईना. जेवणखाण त्यांना गोड लागेना. राजकारणांत त्यांचं चित्त रमेना. सत्यवतीचा विरह त्यांना जाळीत होता, तर देवव्रताला युवराजपद न देण्याची कल्पना त्यांना दुस्सह वाटत होती.

मनाच्या अशा अवस्थेंत जिवाला विरंगुळा म्हणून त्यांनीं नृत्यगायनाच्या मैफलीची आज्ञा दिली होती. गाण्याबजावण्याच्या आनंदांत आपण आपल्या अंतःकरणांतलं दुःख विसरून जाऊं अशी त्यांची कल्पना होती. पण झालं तें सारं अघटितच. 'समर्पण' या नृत्यांतील प्रेयसी, सारं कांहीं विसरून, अभिमान सोडून देऊन, प्रियकराला सर्वस्व अर्पण करायला निघाली होती; पण महाराजांची प्रेयसी मात्र अतीतटीचं मागणं घेऊन बसली होती. तिची प्रीति निःस्वार्थी नव्हती. सारा अभिमान सोडून, दुजाभाव विसरून प्रियकराशीं एकरूप होण्याची तिची इच्छा नव्हती. त्या नृत्यानं महाराजांच्या जखमेची खपलीच काढली. कशीतरी आवरून धरलेली रक्ताची धार पुन्हा वाहूं लागली. मोठ्या प्रयासानें आवळून घेतलेले संयमाचे बंध तटातट तुटले.

वरील प्रकार घडल्यानंतर सातआठ दिवसांनीं शंतनु महाराज बागेंत फिरत होते. आजूबाजूला नाना प्रकारचीं फुलं फुललीं होतीं. कारंजांतल्या पाण्याचा थुई थुई आवाज येत होता. आणि त्यांच्या तुषारांनीं वातावरणांत शीतलता येत होती. उद्यानांतल्या त्या शोभेंत महाराजांचें मन मुळींत रमत नव्हतें. फुलांचा सुगंध त्यांना सुखविण्याऐवजीं व्यथितच करीत होता. गेल्या

आठदहा दिवसांत झालेल्या मनस्तापानं त्यांचा चेहरा अगदीं काळवंडून उदास झाला होता. मूळची त्यांची भव्य आणि तेजःपुंज मुद्रा आतां म्लान दिसत होती. त्यांच्या शरीरांतहि अशीच विकलता आली होती. कशी तरी ओढून ते पावलें टाकीत होते.

शेवटीं कंटाळून ते एका पुष्करणीच्या कांठावर बसले. हाताला आलीं तीं दोनचार फुलें खुडून त्यांचा वास घेऊं लागले. तेवढ्यांत एक वाऱ्याची झुळूक आली आणि त्यांच्या हातांतलीं अलगद धरलेलीं फुलं वायुलहरीबरोबर उडून गेलीं. महाराज विमनस्कतेनं त्या फुलाकडे पाहात होते. इतक्यांत त्या वाऱ्याच्या झुळकेबरोबर आलेली सुगंधाची लहर त्यांना सुखवूं लागली आणि शंतनुमहाराज एकदम चपापून उठून उभे राहिले. "हा तर सत्यवतीच्या शरीराचा सुगंध!"

पाहतां पाहतां तो सुगंध जास्तच तीव्र झाला, साऱ्या उद्यानांत पसरला. "याचा अर्थ...! याचा अर्थ असा कीं सत्यवती जवळपास कोठेंतरी आहे, अधिकाधिक जवळ येत आहे." शंतनुमहाराजांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. सत्यवतीच्या सान्निध्याच्या कल्पनेनं त्यांचं मन आनंदून गेलं. त्यांना वाटलं, "अट सोडून देऊन सत्यवती आपल्याशीं एकरूप होण्यास तर आली नाहीं? तिच्या पित्याच्या विचित्र अटीनं माझ्याप्रमाणंच तिच्याहि मनाला वेदना झाल्या असतील. माझ्या यातनांची तिला जाणीव झाली असेल म्हणून तर मीलनाला उत्सुक होऊन आली नसेल ना!"

सुगंधाच्या लाटा जवळ जवळ येत होत्या. महाराज उत्सुकतेनं प्रवेशद्वाराकडे बघत होते. त्यांच्या हृदयांत धडधडाट होत होता. मन आनंदानं उचंबळून आलं होतं. हातापायांत चैतन्य भरल्यासारखं वाटत होतं. सुकून गेलेली त्यांची देखणी मुद्रा आनंदानं प्रफुल्लित झाली होती. वठून गेलेल्या वृक्षाला पुन्हा नवजीवन प्राप्त व्हावं, तशी त्यांची अवस्था झाली होती. शेवटीं आनंदाचा आवेग सहन न होऊन महाराजांनीं डोळे मिटले आणि ते सुगंधसागरांत पोहूं लागले.

"महाराज" आवडत्या देवव्रताची ती परिचित हांक ऐकून शंतनुमहाराज भानावर आले. त्यांच्या समोर सत्यवती आणि दाशराज उभे होते. युवराज देवव्रत त्यांच्या शेजारीं उभा होता. महाराजांना अभिवादन करून

देवव्रत म्हणाला, "महाराज, सत्यवती, देवीचा स्वीकार करावा. दाशराजाच्या साऱ्या शंकांचं मीं निरसन केलं आहे."

"म्हणजे–?" महाराजांच्या छातींत धस्स झालं.

"युवराजांनीं राज्यपदाचा त्याग केल्याची प्रतिज्ञा केली आहे." निर्विकार मुद्रेनें दाशराज म्हणाला.

"आणि आमरण अविवाहित राहण्याचा निश्चय केला आहे." भरून आलेल्या आवाजांत सत्यवती म्हणाली.

"बाळ," महाराज ओरडले, "खरं आहे हें ?"

"होय, खरं आहे." धीरगंभीर आवाजांत देवव्रत म्हणाला, "या मावळत्या सूर्यबिंबाला साक्षी ठेवून मी पुन्हा एकदां माझ्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार करतों. शंतनुमहाराजांच्या गादीवरचा माझा हक्क मीं सोडून दिला असून माझ्या पुत्रपौत्रांनींहि असा अधिकार सांगूं नये, म्हणून मी आमरण अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा करतों आहे !"

युवराजाची ती प्रतिज्ञा ऐकून सत्यवतीच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंचा वर्षाव होऊं लागला. शंतनुमहाराज एखाद्या पर्वतासारखे निश्चल उभे होते. आकस्मात् झालेल्या या घटनेचा जणूं ते अर्थ लावीत होते. एकाएकीं पडलेला दैवाचा प्रहार सहन करावयासाठीं आपलं सारं बळ एकवटीत होते. ध्यानीं मनीं नसतांना आलेल्या प्रवाहाच्या झोतांत स्वतःला स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. "बाळा, काय हा अविचार केलास ! तुझ्या या त्यागाला सीमा नाहीं. पण तुझ्या त्यागाची जरुरी नव्हती. तुला दुःखांत ठेवून मी सुखाचा उपभोग घेण्याची कल्पना मला किती भयंकर वाटते आहे ! कुलाच्या वृद्धीसाठीं मला आतां सत्यवतीचा स्वीकार केलाच पाहिजे. पण बाळ, एवढं लक्षांत ठेव, तुला संन्यस्त आचरणांत पाहून मी सुखोपभोग घेत असतांनाहि माझ्या जिवाला विलक्षण यातना होतील. तूं केलेल्या त्यागाची अंशतः भरपाई म्हणून मी इच्छामरणाचा वर देतों आणि यापुढं तुला भीष्म म्हणून सारे ओळखतील, तुझी कीर्ति दिगंत होईल."

●●●

शल्य

२

अमृतची त्या गांवांत नुकतीच बदली झाली होती. राहायला चांगलं घर आणि पोरगेलाच पण कामसू नि विश्वासू गडी मिळाल्यानं अमृत अगदीं खूष होता. आज सुट्टीच होती. किसननं करून दिलेल्या ताज्या गरमागरम ऑमलेट्नं आणि चहानं त्याचं पोट भरलं होतं. रात्रभर भरपूर स्वस्थ झोप झाली होती. स्नान, पोटपूजा उरकून, परीटघडीचे कपडे चढवून बीळ घालीत अमृत गांवांत भटकायला म्हणून बाहेर पडला. घरीं परतायची घाई नसल्यामुळं तो संथपणानं, हलकेहलके पावलं टाकीत, आजूबाजूच्या साऱ्या दुकानांचं निरीक्षण करीत रस्त्यावरून चालला होता.

चालतां चालतां अमृत एकदम थबकला, कडेच्या दुकानांत दुकानदाराशीं हसत बोलत, पाठमोऱ्या उभ्या असलेल्या एका गृहस्थावर त्याची नजर खिळली, आणि तो मनाशीं पुटपुटला "हा सुरेशच काय—!" त्या गृहस्थाला नीट न्याहाळून पहात अमृत सुरेशच्या खाणाखुणा आठवूं लागला. त्याच्या मनांत उमटलेलं स्मृतिचित्र त्या गृहस्थाच्या पाठमोऱ्या आकृतीशीं तंतोतंत जमलं. तेवढ्यांत त्या गृहस्थानं आपला चेहरा वळविल्यानं अमृतला शंकाच उरली नाहीं.

तो सुरेशच होता. तसाच हंसतमुख, तजेलदार सांवळा वर्ण, किंचित् भरलेली शरीरयष्टि, सारं कांहीं तसंच होतं. त्याला ओळखल्याबरोबर अमृतला आनंद झाला. या परक्या गांवांत आपला एक जुना ओळखीचा मित्र सांपडला या विचारानं तो क्षणभर आनंदून गेला. सुरेशकडं जाण्यासाठीं त्यानं पाऊल उचललं. दुकानाच्या पायऱ्या उतरणाऱ्या सुरेशची नजर पण

अमृतकडं गेली. अमृतप्रमाणंच सुरेश पण थबकला. दोघांची नजरानजर झाली, ओठ विलग झाले, खूणगांठ पटली, स्नेहाच्या पुसट रेषा पुन्हा सुस्पष्ट झाल्या, नजरेत ओळखीचे भाव दिसले, हास्यांत स्निग्धता तरळली.

लांब लांब टांगा टाकीत सुरेश अमृतजवळ आला आणि त्याचा हात हातांत घेऊन प्रेमभरानं म्हणाला, "काय हें, अमृत, किती दिवसांनीं भेटतों आहोंत आपण ? इथं कसा काय आलास तूं...?"

उभ्याउभ्याच दोघं जणं बोलले. सुरेशला पेशंट पाहायला जायचं होतं. ते लोक त्याची वाट पाहात खोळंबले होते. म्हणून सुरेशनं अमृतचा पत्ता विचारला आणि दुपारीं त्याच्या घरीं येण्याचें आश्वासन देऊन निघून गेला. गांवभर भटकण्याचा आपला बेत बदलून अमृत घरीं परतला.

सात-आठ वर्षांपूर्वी अचानक नाहींसा झालेला आपला मित्र भेटला म्हणून अमृतला आनंद झाला खरा पण जुन्या मित्रांच्या भेटीबरोबरच त्याच्या मनांतील पूर्वस्मृति जागृत झाल्या. त्या स्मृति सुखदायक होत्या. सुरेशच्या अकृत्रिम स्नेहाचे अनेक प्रसंग त्यांत होते, दोघांनीं मिळून घालवलेल्या सहजीवनाची गोडी त्यांत मिसळलेली होती. परंतु पुष्पराशींत एखादा कांटा चुकून कुठं तरी राहून टोंचत असावा त्याप्रमाणं स्नेहभावांच्या त्या मधुर स्मृतींत प्रतारणेचं एक दुःखकारक शल्य अमृतच्या मनाला टोंचत होतं. इतके दिवस तें शल्य गुप्त होतं आणि कधींमधींच अमृतच्या मनाला तें जाणवे. त्या वेळीं तो कशीतरी आपल्या मनाची समजूत घाली. सुखी संसारी जीवनांत तें विसरून जायलाहि त्याला फारसा वेळ लागत नसे. कधीं-मधीं जाचणारं तें शल्य आज मात्र अमृतच्या मनाला जखम करीत होतं आणि तें सहजासहजीं विसरणंहि शक्य नव्हतं. येणार येणार म्हणून भेडसावीत असलेली कसोटीची वेळ पुढें येऊन ठाकावी त्याप्रमाणं सुरेशच्या दर्शनानं अमृतच्या मनाची स्थिति झाली होती. दुरून साजरा दिसणारा डोंगर जवळ गेल्यावर खडबडीत नी अवघड वाटावा तद्वतच एरव्हीं क्षुल्लक वाटणारी ती गोष्ट अमृतच्या मनांतलं शल्य आतां त्याचं त्यालाच मोठ्या स्वरूपांत दिसूं लागलं होतं. सुरेशच्या प्रत्येक भेटीगांठींत त्याला तें जाणवणार होतं. एका गांवांत राहून सुरेशची गांठभेट टाळणंहि शक्य नव्हतं. अमृतनं टाळण्याचा

प्रयत्न केला तर सुरेशला तें चमत्कारिक वाटलं असतं. कारण सुरेशचं मन स्वच्छ होतं. चूक घडली होती ती अमृतच्या हातून.

समोरच अलकाचा मोठा फोटो लावलेला होता. अलकाच्या गैरहजेरींत तो येतां-जातां दिसावा अशा ठिकाणीं मुद्दाम अमृतनं तो लावला होता. त्याला पाहिजे असलेली 'पोझ्' अलकाला घ्यायला लावून त्यानं हा फोटो मुद्दाम काढवून घेतला होता. आरामखुर्चीवर पडल्या पडल्या आतांहि तो अमृतला दिसत होता. तिच्या हंसऱ्या प्रसन्न वदनाच्या दर्शनानं सुखावत असतांना अमृतच्या मनांत आलं, "अलकाच्या या प्रसन्न आणि सुमधुर हास्यानंच आपल्याला आपल्या मित्राशीं प्रतारणा करावयास भाग पाडलं. अलकाच्या मोहक व्यक्तित्वाचं आकर्षण अनिवार झाल्यानंच मी मित्रऋणाला जागलों नाहीं. अलकाचा मोह आणि मित्रप्रेम असा झगडा होता तो. शेवटीं मोहाचा विजय झाला आणि मी माझं कर्तव्य करायला चुकलों. अलकाशीं लग्न करून मीं चालून आलेल्या संधीचा फायदा घेतला. अलकाशीं मी आतां सुखानं संसार करतों आहें, खरा पण मनांत एकसारखं वाटतं कीं हें सुख खरं सुरेशचं होतं तें मीं बळकावलं आहे. अलका माझी सहचारिणी झाली खरी, पण ज्या मार्गानं मी अलकेची प्राप्ति करून घेतली तो मार्ग साधा, सरळ नव्हता, लबाडीचा होता. डावपेंच लढवून मी अलकाला हस्तगत केली होती."

सुरेश आणि अमृत कॉलेजांत शिकत होते. दोघांचा शिक्षणक्रम अगदीं वेगवेगळचा प्रकारचा होता. सुरेश मेडिकलच्या शेवटच्या वर्षाला होता, तर अमृत लॉ कॉलेजचा विद्यार्थी होता. अभ्यासाचे विषय व कॉलेजें वेगवेगळीं असलीं तरी इतर वेळीं ते दोघे नेहमीं एकत्र असत. सिनेमाला जाणें, फिरणें, खरेदी करणें अशा गोष्टी दोघं मिळूनच करीत. सुरेश कॉलेजच्या होस्टेलमधें रहात असे. अमृतचें गांवांतच घर होतं. घरीं कांहीं असलं कीं अमृत सुरेशला घरीं घेऊन येई. समारंभ मोठा असला कीं सुरेशचा रात्रींचा मुक्कामसुद्धां अमृतकडे व्हायचा. सुरेशच्या कॉलेजच्या वसतिगृहांत कांहीं विशेष असलें म्हणजे, किंवा घरून खाऊचा डबा आल्यावर सुरेश अमृतला आग्रहानं आपल्या खोलीवर ओढून नेई. त्याला खाऊं पिऊं घाली. सुरेशच्या मनांत सिनेमाला जावं असं आलं तर तो शक्य असेल तिथून अमृतला फोन करी, पण एकटा कधींहि जात नसे.

सुरेशच्या संगतींत घालवलेला तो आनंदाचा काळ आठवून अमृतच्या अंगावर सुखकारक रोमांच उमटले. अकृत्रिम मैत्रीची खरी गोडी त्याला सुरेशच्या सहवासांत चाखावयास मिळाली होती. खऱ्या स्नेहाचा अनुभव त्याला सुरेशमुळेंच आला होता. मैत्री ही काय चीज असते, हें त्याला सुरेश-मुळेंच जाणवलें होतें. मानवी जीवन सौख्यमय करणाऱ्या ज्या कांहीं गोष्टी जगतांत आहेत, त्यांत माणसांचा परस्परांतील स्नेहभाव ही एक आहे, असं त्या वेळीं अमृतनं ठरवलं होतं.

अजूनही त्याचं तेंच मत कायम होतं. सुरेशच्या उत्कट स्नेहाच्या स्मृति त्याच्या मनांत पूर्णतया उमटल्या होत्या, त्या क्षणाची अवीट गोडी अजूनहि अमृतच्या मनांत रेंगाळत होती आणि तशा मैत्रीच्या सुखाला पारखा झाल्या-मुळं तर त्याला सुरेशच्या गाढ स्नेहाची स्मृति एखाद्या अमोल ठेव्याप्रमाणं वाटत होती. एखाद्या वस्तूच्या विरहानंच तिची किंमत कळते, म्हणतात; त्याप्रमाणं सुरेशच्या स्नेहाला वंचित झाल्यावरच अमृतला त्या स्नेहांतील स्वारस्य अधिक तीव्रतेनें जाणवलं होतं. त्याच्या आणि सुरेशच्या मैत्रीचा ओघ असाच सदैव वाहात राहिला असता; परस्परांच्या अधिकाधिक परिचयानं तो वृद्धिगत झाला असता; दोघांचीं अंतःकरणं कायमचीं एकजीव झालीं असतीं...पण...अलका मधें आली.

अमृतची अंतर्मुख नजर पुन्हा अलकेच्या फोटोकडं वळली. समोरच्या फोटोकडं पाहून मग तो उठला आणि कपाटांतलं आल्बम् काढून त्यांतील फोटोचं निरीक्षण करूं लागला. अलकाचे निरनिराळ्या पोझमधले असंख्य फोटो त्या आल्बम्मध्यें लावले होते. एकामागून एका फोटोचं निरीक्षण केल्यावर अमृतची नजर एका विवक्षित फोटोवर स्थिर झाली. अगदीं पहिल्यानं अलका अमृतच्या आणि सुरेशच्याहि जीवनांत आली, त्या वेळचा तो फोटो होता. अलकाच्या प्रथमदर्शनाचा तो क्षण अमृतला मोठा मंगल वाटायचा...

त्या दिवशीं अमृत आणि सुरेश दोघेही ट्रिपला गेले होते. नुकताच पावसाळा संपला होता. लोणावळ्याच्या आसपासची रम्य वनश्री पाहण्याकरितां आणि फोटोग्राफीची हौस पुरविण्याकरितां अशा दुहेरी उद्देशानें ते बाहेर पडले होते. दिवसभर मजा करून संध्याकाळीं दोघंही घरीं आले. अमृतनं सुरेशला चहा पिऊन जाण्याचा आग्रह केला, म्हणून सुरेश थांबला. हातांतलें सामान

ठेवण्यासाठीं दोघंहि अमृतच्या खोलींत शिरले आणि समोरच्या खिडकींतूनच त्यांना एक सुरम्य दृश्य दिसलें.—

एका डेरेदार आम्रवृक्षाच्या भरीव बुंध्याला टेकून अलका आरामशीरपणें बसली होती. मावळत्या सूर्याचे सोनेरी किरण तिच्या अंगोपांगांवर पडल्यानं तिच्या गौरवर्णाला सुवर्णाचा मुलामा चढून ती एखाद्या कुशल कारागिरानं घडविलेल्या मूर्तीसारखी दिसत होती. सुवर्णप्रभेंत तिच्या अंगावरील अलंकाराची झळाळी मिसळली होती. हातांतल्या ताशीव बांगड्या, कानांतलीं खड्याची कुडी आणि गळ्यांतली माळ या तिच्या अंगावरील दागिन्यांशीं सूर्यकिरण जणूं क्रीडा करीत होते आणि त्यामुळं अलकेच्या सभोंवतीं एक तेजोवलयच तयार झालं होतं. हातांतलं पुस्तक वाचण्यांत ती इतकी तल्लीन झाली होती कीं, आजूबाजूच्या कोणत्याच गोष्टीचं तिला भान उरलं नव्हतं. सायंकाळच्या पश्चिम वाऱ्यानं तिचीं वस्त्रं मधूनमधून हालत होतीं आणि काळेभोर केस गालांशीं क्रीडा करीत होते, ते सांवरायला अलका आपला गोंडस हात हलवी, नाहींतर तिच्याकडं बघून पृथ्वीवर अवतरलेल्या शापभ्रष्ट देवतेचीच आठवण झाली असती. आवतीं-भोंवतीं फुलं फुललीं आहेत, मंद वारा वाहतो आहे, वातावरण सुगंधित झालं आहे. अशावेळीं शांत आणि एकान्त स्थळीं बसलेली अलकेची ती सुंदर मूर्ति पाहून एखाद्या चित्रकारानं कवि यशवंतांच्या शब्दांत म्हटलं असतं "घेऊं दे प्रतिमा रेखाटुन"

चित्रकार नाहीं तरी एक फोटोग्राफर मात्र तिथं हजर होता आणि त्यानं लागलीच कॅमेरा सज्ज केला. कॅमेऱ्यांत घातलेली सर्व फिल्म खलास करून टाकण्याची घोडचूक आपण केली नाहीं, याबद्दल अमृतनं स्वतःला शाबासकी दिली. कॅमेऱ्याच्या 'क्लिक' आवाजानं सुरेश भानावर आला आणि त्यानं अमृताकडे पाहिलं. दोघांच्याहि मनांत एकच विचार उमटला होता. लोणावळ्याला त्यांना रम्य वनश्री बघायला मिळाली होती. पण त्या सुंदर पार्श्वभूमीला शोभून दिसणारी देवता मात्र त्यांना इथं सांपडली होती.

सुरेशनं आश्चर्यानं विचारलं, "हें काय, फोटो घेतलास तूं तिचा-?"

"मग अशा संधीचा फायदा घेतल्याशिवाय कोण राहणार-?"

"अरे पण विचारल्यावांचून फोटो घेणं चांगलं का-?"

" परवानगीची कोण वाट बघतोय्. तूं तुझ्या हृदयपटलावर तिची छबी उमटवली असशील, ती मीं कागदावर घेतली एवढंच! अरे, या फोटोची एक कॉपी तिच्याकडे पाठवून देईन तिला खूप करायला. आमच्या शेजारीं हा बंगला आहे ना, हा परवांच एका पेन्शनरनं विकत घेतला. या मंडळींपैकींच दिसते आहे ही मुलगी. "

त्याच्या पाठीवर थाप मारून सुरेश म्हणाला, " भाग्यवान् आहेस बुवा. आतां फोटोग्राफीकरितां दूर जायला नको. मीं पण फोटोग्राफी शिकून घेतली असती, तर बरं झालं असतं बुवा...! "

इतकं वाईट नको वाटून घ्यायला, दोस्त, मीं घेतलेल्या प्रत्येक फोटोची एक प्रत तुला देईन हं..."

हळूहळू अमृतचा आणि अलकेचा परिचय झाला. अलका इंटरच्या वर्गांत शिकत होती. तिच्या घरांत वडिलाशिवाय कुणींच नव्हतं. मोठ्या बहिणीचं लग्न होऊन ती सासरीं गेली होती. भाऊ अमेरिकेला गेला होता. घरांत तिला एकटं एकटं वाटे. त्यामुळं अमृतशीं ओळख झाल्यानं तिला बरं वाटलं. सुरेशची पण तिच्याशीं ओळख झाली. इतके दिवस अमृत आणि सुरेश असे दोघेच होते. आतां पुष्कळ वेळां त्या दोघांच्या कार्यक्रमांत अलकाचाहि समावेश होऊं लागला होता.

अलका इतकी गोड मुलगी होती कीं, तिच्याविषयीं अमृत आणि सुरेश या दोघांच्या तरुण मनांत कांहीं नाजूक भाव उत्पन्न होणं अगदीं शक्य होतं, आणि अमृत व सुरेश हे दोघेहि स्वभावानं, रूपानं, शिक्षणानं आणि परिस्थितीनं इतके चांगले होते कीं, त्यांतला कोणीहि अलकेच्या प्रेमाला पात्र ठरला असता. त्यांच्यापैकीं कुणीकडं अलकाचा मनाचा ओढा अधिक होता अगर नव्हता, हें ठरवणं फार कठीण होतं, किंवा सुरेश आणि अमृत या दोघांपैकीं कोण तिच्यावर जास्त प्रेम करीत होता, हें सांगणंहि तितकंच अवघड होतं. तसं पाहिल तर अलका अमृतच्या घराजवळच राहात असल्यानं त्यालाच तिचा जास्त सहवास मिळे. अमृतला कधीं कधीं असं वाटून जाई कीं, अलका आपल्यावरच लुब्ध आहे. पण सुरेश येऊन त्यांच्यांत मिसळला म्हणजे त्याला वाटे, " आपल्यापेक्षां सुरेशचें आकर्षण अलकाला अधिक वाटतें."

प्रणयाचे तीव्र भाव कुणाच्याच मनांत नव्हते. पण त्या भावांची अस्पष्ट अशी चाहूल प्रत्येकाला लागली होती एवढं खरं. परंतु, अजून तरी या प्रकरणामुळं त्यांच्या मैत्रींत कांहींहि अंतराय उत्पन्न झाला नव्हता. असूया निर्माण झाली नव्हती. परस्परांच्या सहवासाचा आनंद ते पूर्वीप्रमाणेंच लुटीत होते. या मैत्रीचें पर्यवसान कशांत होणार असा प्रश्न क्वचित् प्रत्येकजण आपापल्या मनाला विचारीत असेल, पण त्याची उघड वाच्यता न होऊं देण्याची प्रत्येकानं खबरदारी घेतली होती. जणूं कांहीं आपल्या पूर्वीच्या परिस्थितींत कांहींच बदल झालेला नाहीं अशाच तऱ्हेनं ते एकमेकांशीं वागत. त्यांच्या करमणुकीची हीच तऱ्हा कायम राहिली असती तर...

तर अमृतच्या मनांत सतत सलणारं प्रतारणेचं शल्य निर्माणच झालं नसतं. पण तो प्रसंग घडला...

त्या दिवशीं अलकाच्या कॉलेजांत डिबेट होता. वादाचा विषय "स्त्री-पुरुषांच्या जीवनांत विवाहसंस्थेची आवश्यकता आहे काय?" असा होता. अलकाच्या कॉलेजतर्फे अलकाच बोलणार होती, म्हणून तिनं सुरेशला आणि अमृतला बोलावलं होतं. गंमत म्हणून दोघांनींहि जायचं ठरवलं होतं. ठरल्याप्रमाणं ते सभेच्या हॉलमध्यें गेले, तेव्हां सभागृह स्त्री-पुरुषांनीं फुलून गेलं होतं. संभाषणं, कुजबूज, शिटच्या यांनीं वातावरण निनादून गेलं होतं. विजेच्या प्रकाशानं सारं कांहीं उजळून निघालं होतं. श्रोतृगण अगदीं आतुर झाला होता. अखेर एकदांची सभेला सुरुवात झाली. दोघांतिघांचीं भाषणें झाल्यावर अलकाची पाळी आली. दिव्यांच्या लखलखाटांत ती फारच सुंदर दिसत होती. अस्मानी जॉर्जेट आणि पांढरं शुभ्र सॅटीनचा ब्लाऊझ हा पोषाख तिच्या सडपातळ आणि गौर शरीरयष्टीला फारच खुलून दिसत होता. कानांतलीं हिऱ्याचीं कुंडलं सारखीं चमचमत होतीं.

अलका बोलूं लागली. तिचा आवाज खणखणीत होता. शब्दोच्चार अगदीं स्पष्ट होता. कुठेंहि न अडखळतां निर्भयतेनं, सहजतेनं आपले विचार बोलून दाखविण्याची तिची शैली वाखाणण्याजोगी होती. प्रास्ताविक भाषण संपवून तिनें विषयाच्या गाभ्याला हात घातला. आपले विचार ती सडेतोडपणानं बोलून दाखवूं लागली.

तिच्या मतें विवाहसंस्था अनावश्यक होती. मानवाच्या प्राथमिक अवस्थेंत अशी संस्था नव्हती. त्या वेळीं स्त्री परावलंबी आणि पुरुषाधीन नव्हती. विवाहसंस्थेमुळं स्त्री परतंत्र झाली, पुरुषाची दासी बनली. पावित्र्याचे नीति-नियम स्त्रीला तेवढे लागूं झाले. स्त्रीजात पुरुषापेक्षां हीन लेखली जाऊं लागली. विवाहसंस्थेच्या कायद्यांच्या कचाट्यांत स्त्री तेवढी सांपडली, पुरुष स्वैराचार करायला मोकळा राहिला. स्त्री-जातीच्या अवनतीचें कारण असलेल्या या विवाहसंस्थेची कांहीं जरुरी नाहीं, असं तिनं प्रतिपादन केलं.

सुरेश आतुरतेनं आणि कौतुकानं अलकाचं भाषण ऐकत होता. अलका जसजशी आवेशांत येऊं लागली तसतसा सुरेश अस्वस्थ होऊं लागला. त्याच्या चेहेऱ्यावरचे कौतुकाचे, उत्सुकतेचे भाव मावळूं लागले. विषादानं त्याचं मन भरून गेलं. निराशेनं त्याचा चेहरा काळवंडूं लागला. अलकाच्या तोंडून निघणारे शब्द त्याच्या हृदयावर घाव घालूं लागले. तिचं भाषण ऐकणं त्याला अशक्य झालं आणि आजूबाजूच्या लोकांना काय वाटेल याची पर्वा न करतां हलकेंच उठून तो सभागृहांतून बाहेर पडला.

अमृतचं सारं लक्ष अलकाच्या भाषणाकडं असल्यानं सुरेशच्या मनःस्थितींत झालेला फेरबदल त्याच्या लक्षांतच आला नाहीं. सुरेश उठून गेला, तेव्हां मात्र त्याचं लक्ष सुरेशकडं गेलं आणि तो आश्चर्यचकित झाला. डिबेट संपल्यावर बोर्डिंगला जायचं सुरेश विसरून गेला, असं त्याला वाटलं. सुरेशला एकाएकीं उठून जायला काय झालं, हें त्याच्या लक्षांतच येईना. आपणहि उठून त्याच्या पाठोपाठ जावं कीं काय असं त्याच्या मनांत आलं. पण वाईट दिसेल, म्हणून आपला विचार अमलांत न आणतां तो तसाच बसून अलकाचं भाषण ऐकूं लागला. आतां त्याचं मन संपूर्णतया भाषणाकडं लागेना. एकीकडं तो भाषण ऐकत होता, तर एकीकडं सुरेशच्या विचित्र वागणुकीचा विचार करीत होता. सभा संपल्यावर अलका सुरेशची चौकशी करील, तेव्हां तिला काय सांगावं, याचंहि त्याला गूढ पडलं होतं.

सभा संपली. अलकाचं अभिनंदन करून अमृत घरीं आला. वास्तविक त्याच्या मनांत अलकाच्या भाषणासंबंधीं विचार यायला पाहिजे होते; पण अलकाचं भाषण तो अजिबात विसरून गेला होता, आणि सुरेशच्या वर्तनाचेच

विचार त्याच्या मनांत घोळत होते. आपल्याला कांहींहि न सांगतां–सवरतां सुरेश मुकाटचानं उठून गेला, याचा त्याला थोडा रागहि आला होता; पण रागापेक्षां आश्चर्याचा भागच अधिक होता.

विचार करतां करतां एकदम एक कल्पना त्याच्या मनांत आली. "अलकाची विचारसरणी खरी वाटून तर सुरेश बिथरला नाहीं ना—! विवाहसंस्थे-विरुद्ध तिनं आपलं मत प्रदर्शित केलं म्हणून सुरेश दुखावला गेला कीं काय...?"

अमृत जों जों विचार करूं लागला तों तों हाच विचार त्याच्या मनाला सयुक्तिक वाटूं लागला. सुरेश आपल्यापेक्षां भावनाप्रधान आहे, हें अमृतला माहीत होतं; पण अलकाचं सभेंतलं भाषण तो एवढं मनाला लावून घेईल अशी त्याला कल्पनाच नव्हती. त्या दिवसानंतर बरेच दिवस सुरेश त्याच्याकडं फिरकला सुद्धां नाहीं. तेव्हां सुरेशच्या त्या विचित्र वागणुकीचं कारण हेंच असावं, असं अमृतनं नक्की ठरवलं.

हें नक्की ठरलं आणि त्याच क्षणीं अमृतच्या मनांत खलपुरुषाचा उद्भव झाला. खरं म्हणजे अमृतनं तावडतोब सुरेशकडं जायला हवं होतं. सुरेशच्या औदासीन्याच्या कारणाची कल्पना आल्याबरोबर अमृतनं त्याचं निराकरण करायला पाहिजे होतं. कारण, अलका सभेंत जें बोलली, जीं मतं तिनं प्रतिपादित केलीं, तीं तिचीं खरीं मतं नव्हतीं. केवळ वादाकरितां म्हणून तिनं तो पक्ष घेतला होता. केवळ वक्तृत्वाची देणगी असल्यामुळेंच तिला त्या आपल्या नसलेल्या मुद्द्यांचंहि इतक्या यशस्वीपणानं समर्थन करतां आलं होतं. तिचं भाषण इतकं अस्खलित आणि मुद्देसूद झालं होतं, कीं तिनं बोलून दाखविलेलीं मतं तिचीं नाहींत, असं कोणीहि म्हणूं शकलं नसतं. त्यामुळं सुरेशला तीं खरीं वाटलीं, यांत कांहींच नवल नव्हतं.

पण तीं खरीं नाहींत हें अमृतला माहीत होतं. अलकानं मुद्दे काढतांना अमृतशीं त्या विषयाची चर्चा पण केली होती. आपल्याला वादाची हीच बाजू घेऊन बोलावयास सांगितलेलें असल्यामुळें आपण असें भाषण करणार असाहि तिनं उल्लेख केला होता. ही सर्व परिस्थिति ठाऊक असतांना सुरेशचा गैरसमज तसाच कायम राहूं देणं म्हणजे मित्र–कर्तव्याला चुकणंच होतं.

सुरेशच्या मनःस्थितीचा अंदाज आल्याबरोबर अमृत उठला. सुरेशकडं जाण्याकरितां त्यानं कपडेहि चढवले. पण मन 'जा' म्हणून सांगत असलं

तरी पाऊल मात्र पुढें पडेना. तें माघार घेऊं लागलं, अडखळूं लागलं. आतां-पर्यंत ठेवलेली तटस्थ वृत्ति एकदम बदलली. अनायासें लाभलेल्या संधीचा फायदा घेण्याचा मोह अमृतला होऊं लागला.

"कांहींहि प्रयत्न न करितां अगदीं सहजपणानं सुरेश आपल्या मार्गांतून बाजूला होतो आहे, आपला मार्ग आपोआप मोकळा होतो आहे, मग कशाला सुरेशला जागं करायला जायचं...! वास्तविक ही सुरेशचीच चूक आहे. इतकं काय मनाला लावून घ्यायचं कारण होतं...! निदान माझ्याशीं तरी त्यानं आपल्या मनांतलं सुख-दुःख बोलून दाखवायला नको होतं का ? अलकाच्या मनाचा थांग घ्यायला नको होता का ? फार तर अलकाशीं बोलायचं नव्हतं. पण इतकं निराश होऊन तडकाफडकी निर्णय घ्यायचा उतावळेपणा कशाला करावा त्यानं...? त्यानंच माझ्याकडं यायला हवं होतं. मन मोकळं करायला पाहिजे होतं. त्यानं आपलं कर्तव्यं केलं नाहीं, मग मी तरी कां विनाकारण धडपड करावी ? त्याला खरोखरीच अलकाबद्दल कांहीं वाटत असतं, तर अशा रीतीनं मुकाट्यानं तो निघून गेलाच नसता."

मनाची अशी समजूत करून घेऊन अमृत स्वस्थ बसला. सुरेशची त्यानं चौकशीच केली नाहीं. अलकाच्या प्राप्तीच्या आशेनं त्याची कर्तव्यबुद्धि थिजली, मित्रप्रेम गारठून गेलं. शेवटीं अलकाशीं त्याचं लग्न झालं.

त्या दिवशीं सुरेश जो नाहींसा झाला तो आज अमृतला दिसला होता. जवळ जवळ सात-आठ वर्षांनीं त्यांची पुन्हां गांठभेट झाली होती. मैत्रीचे ते तुटलेले धागे आज पुन्हा सांधले गेले होते. मध्यंतरीं खंडित झालेला स्नेहाचा प्रवाह आज पुन्हा वाहूं लागणार होता. कांहीं काळ दुरावलेलीं तीं दोन मनं आतां पुन्हा एकरूप होणार होतीं. आजवर सांचलेल्या जिव्हाळ्याच्या गोष्टी सांगून मनावरचं दडपण दूर करायला उत्सुक झालीं होतीं. उदकासाठीं आसुसलेल्या तप्त पृथ्वीमातेप्रमाणं स्नेहासाठीं आसावलेलीं त्यांचीं मनं स्नेह-सिंचनानं पुन्हा संजीवित होणार होतीं. गतस्नेहाचीं स्मृतिचित्रं आतां पुन्हा मूर्तरूप होणार होतीं.

पण अमृतच्या मनांत प्रतारणेचं शल्य एकसारखं टोंचत होतं. सुरेशला सारं कळल्यावर त्याला आपल्याबद्दल काय वाटेल, हा विचार त्याला सतावून

सोडीत होता. आपण त्याची प्रतारणा केली, हें लक्षांत आल्यावर सुरेश आपला तिरस्कार करील आणि आपल्याला कायमचा दुरावेल, अशी अमृतला भीति वाटत होती.

सुरेश यायची वेळ झाली होती. अमृतला काय वाटलं कुणास ठाऊक. तो उठला आणि अलकाचा फोटो उचलून त्यानं कपाटांत ठेवला. पण मग त्याचं त्यालाच हसूं आलं. "किती वेडा मी ...अलकाचा फोटो लपवल्यानं का सुरेशला कळायचं राहणार आहे? आज ना उद्यां अलका येईलच. त्यापेक्षां आपणच सारं सांगून सुरेशची क्षमा मागावी."

अमृतनं फोटो पुन्हा भिंतीला लावला. अस्वस्थ मनानं त्यानं कांहीं वेळ इकडं तिकडं येरझारा घातल्या. त्याला कांहींच सुचेनासं झालं होतं. सुरेश आल्यावर काय होणार, अलकाचा फोटो पाहून त्याला काय वाटेल, याचा अमृतला कांहीं अंदाज करतां येईना. शेवटीं कंटाळून तो पुन्हा कोचावर बसला आणि सुरेशची वाट पाहूं लागला.

पांच-दहा मिनिटांतच सुरेश आला. अलकाच्या फोटोकडं नजर टाकीत त्यानं अमृतच्या पाठीवर थाप मारली आणि त्याच्या शेजारीं कोचावर बसून तो म्हणाला, "जोडप्यानं माझं स्वागत होईल अशी अपेक्षा होती माझी... मी येणार असल्याचं तूं अलकाला सांगितलं नाहींस का...? कुठं आहे ती?"

"अलका माहेरीं गेली आहे रे, सुरेश" क्षणभर थांबून अमृत अडखळत पुढें म्हणाला, "सुरेश, अलकाशीं माझं लग्न झालं याचं आश्चर्य नाहीं वाटलं तुला?"

"आश्चर्य वाटायचं काय कारण...?"

"मग तुला माझा राग आला का?"

"राग तरी कां यावा...! उलट अलकासारख्या गुणी मुलीची तुला सोबत मिळाली याचा फार आनंद झाला मला. तुझ्याशीं तिचं लग्न झालं हें मला मागेंच कळलं होतं.-"

"पण अलका लग्नसंस्थेच्या विरुद्ध आहे अशी तुझी समजूत झाली होती ना?"

"होय, कांहीं काल मला तसं वाटलं होतं; पण ती समजूत कांहीं फार काळ टिकली नाहीं."

" मग तूं असा एकाएकीं निघून कां गेलास ? पुन्हा परत कां आला नाहींस ? "

" खरं सांगूं का तुला अमृत ? "

" हो, अगदीं खरं सांग. "

" अमृत, अलकाचीं तीं विचित्र मतं ऐकून मी कांहीं काळ अगदीं निराश झालों. तडकाफडकीं निघून गेलों. पण माझा वेडेपणा लवकरच माझ्या लक्षांत आला. पुन्हा परत यावं असं मला वाटलं. मग सर्व गोष्टींचा मनाशीं विचार केल्यावर मला वाटलं, नाहींतरी आपण आतां निघून आलोंच आहोंत तें पुन्हा कशाला जायचं...! तुझा तरी मार्ग मोकळा असूं दे. अलकाला लग्न करायचं असलं तर उगीच द्विविधा मन नको व्हायला तिचं. आणि एक त्रिकोण निर्माण होऊन आपल्या मैत्रींत बिघाड यायला नको. "

" तूं मनाचा थोरपणा दाखवलास, सुरेश; पण..." अमृतचा गळा दाटून आला, डोळे अश्रूंनीं डबडबले. कृतज्ञतेचे भाव त्याच्या हृदयांत मावेनात. सद्गदित स्वरानं तो म्हणाला, " पण मी मात्र मित्रप्रेमाला जागलों नाहीं. मला लाज वाटते सुरेश कबूल करायला; पण तूं निघून गेलास याचा मला आनंदच झाला. त्या वेळचं माझं वर्तन मला आठवलं म्हणजे वाटतं... मनुष्याची सुधारणा होण्यापूर्वी एका स्त्रीसाठीं रानटी माणसं झगडत असत. 'बळी तो कान पिळी' असा त्या वेळीं न्याय असे. प्रतिपक्षाचा पाडाव करणाराला त्या स्त्रीची प्राप्ति होत असे, ही रानटी प्रवृत्ति अजूनही आपल्या सुशिक्षित समाजांत शिल्लक आहे, असं म्हणावं लागतं. तसं नसतं तर माझ्या हातून असं वर्तन घडलं नसतं. तुझ्या गैरसमजुतीचा मीं असा फायदा घेतला नसता. अलकाच्या प्राप्तीसाठीं मीं तुझ्याशीं प्रतारणा केली नसती. माझं कर्तव्य करायला मी चुकलों नसतों. अलकाच्या मतासंबंधीं भलतीच समजूत करून घेऊन तूं निघून गेलास, त्या वेळीं मी तुझ्या पाठोपाठ येऊन तुझी समजूत घालायला पाहिजे होती; तुला पटवून द्यायला पाहिजे होतं, कीं अलकाचीं हीं जहाल मतं फक्त वादापुरतींच होतीं. त्यामुळं तुला निराश होण्याचं कांहींच कारण नाहीं. आपल्या दोघांच्याहि मनांत अलकेसंबंधीं अभिलाषा निर्माण झाली होती. अखेर माझा विजय झाला. पण हा विजय खरा नव्हता. अलकाची

गोड सोबत मला लाभली खरी, पण त्याबरोबरच मित्रवंचनेचं हें शल्य मीं कायमचं मनाला लावून घेतलं. सुरेश, मी असं करायला नको होतं. तुझ्याजवळ मीं वस्तुस्थितीचा उलगडा करायला हवा होता. मग अलकानं तिला पाहिजे त्याची निवड केली असती–कदाचित् तूं निराश झाला असतास किंवा कदाचित् माझ्या वांट्याला निराशा आली असती. माझं कर्तव्य मीं केलं नाहीं, खऱ्या स्नेहाला मी जागलों नाहीं; म्हणून हें शल्यमय जीवन माझ्या वांट्याला आलं आहे. मला चांगली नोकरी आहे, अलकासारखी सुंदर पत्नी आहे, दोन गोजिरवाणीं मुलें आहेत. तसा मी सुखी आहें. पण सुरेश, मित्रवंचनेचं शल्य सारखं कुठंतरी सलतं आहे. एकसारखं वाटतं कीं, तुझ्याशीं प्रतारणा करून मीं तुला कायमचंच दुःखी तर केलं नाहीं ना ? अलकानं तुला पसन्त केलं का...? तुझ्या सहवासांत ती जास्त सुखी झाली असती का ? अनेक वेळां मी स्वतःला हे प्रश्न विचारतों. या प्रश्नांचीं निरनिराळीं उत्तरें मला सुचतात; पण माझं समाधान होत नाहीं आणि माझ्या मनांतलं हें शल्य मला तसंच टोंचत राहतं ! ! ”

●●●

मंगलसूत्र

३

" आई, जेवायचं झालं असलं तर वाढ मला लवकर " बाथरूममधून बाहेर आलेला नाना म्हणाला.

" झालंच आहे सगळं, चंपूला म्हणावं पाटपाणी कर. "

" आहे कुठं ती...?" केस विंचरतां विंचरतां नानानं विचारलं.

" असेल तिच्या खोलींत कांहींतरी वाचीत बसलेली. "

नानानं हांक मारल्यावर चंपू आंत आली. नानानं तिला विचारलं " कुठं बसली होतीस ? खोलींत तर नव्हतीस... "

" अरे गॅलरींत उभी होतें जरा " पाट-ताट घेतां घेतां चंपूनं उत्तर दिलं.

" गॅलरींत उभी राहून काय टांगे, मोटारी बघत होतीस वाटतं...? " नानाला थट्टेची लहर आली.

नानाच्या पानांत गरम पोळी टाकीत माई म्हणाल्या, " तुझं आपलं कांहींतरीच...टांगे-मोटारी बघायला ती काय एखाद्या खेडेगांवांतनं आली आहे...जावईबुवांच्या पत्राची वाट पाहात उभी राहते, दुसरं काय..." माई चंपूकडं पाहून हंसल्या, नानानंहि हंसण्याला साथ दिली.

त्या दोघांचा विरस व्हायला नको म्हणून चंपूहि हसली; पण मनांत ती म्हणत होती, " जावईबुवांच्या पत्राची वाट पाहायला भारीच रसिक लागून गेले कीं नाहीं जावई...! घरांत बायकोशीं बोलायची मारामार; ते माहेरीं गेलेल्या बायकोला पत्र पाठविणार अन् लाजेकाजेस्तव पाठविलं एखादं तरी

त्यांत वाचण्याजोगा मजकूर तरी काय असणार? बायको घरांत असली काय नि नसली काय सारखंच. तिच्या अस्तित्वाचं महत्त्व ज्यांना कळत नाहीं, त्यांच्या पत्रांत तरी कुठले भावनांचे आवेग प्रगट होणार आहेत? बायकोचा विरह ज्यांना जाणवत नाहीं त्यांना विरहावस्थेचं वर्णन कुठून करतां येणार...?"

चंपूचे वचार आणखीसुद्धां लांबले असते; पण माईनीं तिला हाक मारली. त्या तिला म्हणत होत्या, " चंपू, तूं पण बस गरम पोळी खायला..."

"अग पण माई, तूं घातलेली गरम पोळी आतां तिला गोड लागायची नाहीं!"

" कां रे?–" आपल्या पानांत चटणी–लोणचं वाढून घेत चंपू म्हणाली.

नानानं डोळे मिचकावीत–उत्तर दिलं,"कां म्हणजे–घरांत राजा न् राणी दोघं एकदम जेवायला बसून एकमेकांना घास घालीत असाल. त्या घासाची सर का येणार आहे या माईच्या गरम पोळीला...!"

" पुरे रे चावटपणा " नानाला दटावीत माई गालांतल्या गालांत हंसल्या आणि तव्यावरल्या पोळीला भरपूर तूप लावून त्यांनीं मग ती चंपूच्या पानांत टाकली.

नानानं चेष्टा केली खरी, पण खरोखरच चंपूला जेवण जाईना. मघांशीं नानानं चेष्टा केल्यावर ती वरकरणी तरी हंसली होती. आतां ती हंसली तर नाहींच, उलट पानावर बसून मुकाट्यानं जेवणाऱ्या आपल्या रुक्ष नवऱ्याची. मूर्ति डोळ्यांसमोर उभी राहिल्यानं तिच्या कपाळावर आंठ्या मात्र पडल्या. जेवण संपून नाना पानावरून उठून गेला होता आणि माई पोळी लाटण्यांत गुंतल्या होत्या म्हणून; तिची नाखुशी कुणाच्या लक्षांत आली नाहीं, एवढं बरं झालं, असं तिला वाटलं. ऐन जेवायच्या वेळीं आपल्या घुम्या आणि अबोल पतीची आठवण करून दिल्याबद्दल ती थोडीशी चिडली. मोरीशीं वांकून हात धुणाऱ्या पाठमोऱ्या नानाकडं पाहात तिनं एक नापसंतीचा तीव्र कटाक्ष टाकला. इतक्यांत माईचं तिच्या पानाकडं लक्ष जाऊन त्या म्हणाल्या, " हें काय चंपू, गरम पोळी मिळावी, म्हणून मीं तुला जेवायला बसायची घाई केली. ती निवाली तरी अजून तूं पोळीचा तुकडा सुद्धां मोडला नाहींस? लक्ष तरी कुठं आहे तुझं...!"

भानावर येऊन चंपू भराभर जेवूं लागली. जेवण आटोपल्यावर सुपारी

2964
अनुक्रमांक
वि.भा.३३
क्रमांक 709

चघळीत ती बाहेरच्या खोलींत आली. पोषाख करून नाना जायच्या तयारींत होता. टॉयची गांठ नीट बांधीत तो चंपूला म्हणाला, " हे पाहा चंपू, ऑफिसच्या बॉयबरोबर मी तुला वाचायला कांहींतरी पाठवून देतों, तोंपर्यंत रत्नाकरकडं कांहीं असलं तर बघ. अन् संध्याकाळीं सहाला तयार रहा. जाऊं शोला. "

नाना निघून गेला. चंपू मनाशीं म्हणाली, " किती माया आहे नानाची आपल्यावर...मघांशीं उगीचच रागवलें मी. त्याचा विचाऱ्याचा काय दोष? सर्वसाधारण नवविवाहित जोडपीं अशींच वागतात, परस्परांशीं. प्रणयाचे खेळ करतात, म्हणून त्यानं आपली चेष्टा केली. त्याला काय कल्पना आपले मेहुणे याला अपवाद आहेत म्हणून ? त्यालाच काय, आपल्याला तरी कुठं कल्पना होती, कीं पुरुष इतका रुक्ष असूं शकतो आणि नेमका आपल्याच वांटचाला तो येईल म्हणून... "

बिचारी चंपू... ! चार महिन्यांपूर्वी तिचं मुकुंदरावांशीं लग्नं झालं होतं. लग्नाचीं बोलणीं सुरू झालीं आणि चंपूचं मन गोड गोड कल्पनांनीं भरून गेलं. चंपू आणि नाना हीं दोघंच भावंडं. चंपू आईची फार लाडकी होती. चंपूला वाचायचा विलक्षण नाद. घरांत फारसं काम नसल्यानं तिला वाचायला भरपूर वेळ मिळे. शाळेचा अभ्यास व थोडंबहुत घरांतलं काम संभाळून उरलेल्या वेळांत कथाकादंबऱ्या वाचायचा तिचा सपाटा सुरू असे. या वाचनानं चंपूची भाषा सुधारायला मदत झाली आणि दुसरा एक परिणाम असा झाला कीं ती स्वप्नाळू बनली. आपल्या आयुष्यांचीं भावीं चित्रें ती कथा-कादंबऱ्यांच्या सांच्याबरहुकूम रेखाटूं लागलीं. कादंबरींतला आदर्श, ध्येयवादी नायक चंपूच्या संसाराचा नायक बनला आणि नायिकेच्या जागीं ती स्वतःची स्थापना करूं लागली. संसाराच्या चित्रणांत ती नाना प्रकारचे प्रणयरंग भरूं लागली. आपल्या जीवन-प्रवासाच्या मार्गावर असा नायक भेटण्याची अधीरतेनं ती मार्गप्रतीक्षा करूं लागली.

चंपूच्या नशिबाचा योग असा कांहीं विचित्र कीं तिनं अपेक्षिलेला नायक कादंबरींतल्या सारख्या योगायोगानं कांहीं तिच्या आयुष्यांत आला नाहीं. वरसंशोधनाची मोहीम काढून मुद्दाम त्याला शोधावा लागला. मंद स्मित करीत, चंपूच्या गालावर लज्जेचे गुलाब फुलवीत तो आला नाहीं, तर

वरपक्षाच्या अटीतटी, करारनामे, यांच्या रुबाबांत वधु-पक्षाला मानसिक यातना देत तो आला. चंपू मॅट्रिक झाल्याबरोबर माईंनीं तिचं लग्न मुकुंदशीं जमविलं. आयुष्याचा सोबती अगदींच जुन्या आणि रुक्ष प्रकारानं जीवनांत आलेला पाहून चंपू मनांत अगदीं नाराज झाली. ही उणीव आपण विवाहानंतर भरून काढूं असा विचार करून तिनं मुकाटचानं त्याच्या गळचांत माळ घातली. मुकुंद घरांत एकटाच होता. एका मावशीखेरीज त्याला जवळचं असं कुणींच नव्हतं. तेव्हां वाटेल ते चाळे करायला त्याला पूर्ण स्वातंत्र्य होतं. कुणाची आडकाठी येण्याचा संभव नव्हता.

दुर्दैव एखाद्याच्या पाठीमागं लागलं कीं तें पुरतं सूड उगवतं. बिचाऱ्या चंपूचं प्रणयस्वप्न सुरुवातीपासूनच विफल ठरलं. तिच्या स्वप्नांतला नायक योगायोगानं तिला भेटला नाहीं. प्रेमाचे लपंडाव तिला खेळायला मिळाले नाहींत, प्रियकरानं प्रेयसीला विवाहाची मागणी घालण्याच्या, आणि प्रेमाची कबुली देण्याच्या नाटचमय प्रसंगाला ती मुकली. आतां या संकट-परंपरेतलं शेवटचं संकट तिच्यावर कोसळण्याची शक्यता तिला दिसूं लागली. नवऱ्याच्या रुक्षपणाचा प्रत्यय तिला विवाह-समारंभांतच येऊं लागला. त्याच्या गळचांत विवाहमाला घालतांना तिनं हलकेंच ओझरतें स्मित केलें. पण त्याचा चेहरा निर्विकारच होता. होमाच्या वेळीं संधि मिळाली असून सुद्धां तो तिच्याशीं एक अक्षरहि बोलला नाहीं. इतरांनीं केलेल्या चेष्टांनीं सुद्धां त्याचे ओठ कळत न कळत विलग होत एवढंच.

नवऱ्याचीं हीं लक्षणें पाहून चंपूला विलक्षण वेदना झाल्या. ती रडकुंडीला आली. आईनं जमविलेल्या या लग्नाला आपण कुठून होकार दिला असं तिला झाल. तरी तिनं धीर सोडला नाहीं. तिला वाटलं, "मुकुंदाच्या मनाची कळी एकान्तांत तरी उमलेल, ओठ बोलके बोतील, आपला स्पर्श त्याला उत्तेजित करील."

लग्न आटोपलें. चंपू नवऱ्याबरोबर सासरीं गेली. तिचा संसार लावून द्यायला मुकुंदाची मावशी आली होती. बिऱ्हाडाची जागा छान होती. सामानसुमान नवीनच खरेदी केलेलें होतें. आपला छोटासा संसार पाहून चंपूची वृत्ति उल्हसित झाली. क्षणभर आपली निराशा ती विसरून गेली. मनाच्या मोहरलेल्या अवस्थेंतच तिनं मुकुंदाच्या खोलींत पाऊल टाकलं.

मुकुंद कॉटवर पडून पुस्तक वाचीत होता. दाराचा आवाज ऐकून त्यानं पुस्तक बाजूला केलं. दारांत उभ्या असलेल्या चंपूला पाहून त्यानं किंचित हास्य केलं. कळी उमलणारसं वाटूं लागलं. काळ्या मेघानं दाटलेल्या आभाळांत एखादा सूर्यकिरण मधूनच उजळून जावा तसं चंपूला वाटलं. तिचेहि ओठ विलग झाले. पण तेवढ्यांत पुन्हा मेघमालेनं आपलं आवरण घातलं. मुकुंद जागचा उठला नाहीं; लाजलेल्या चंपूचं स्वागत करून, तिचा हात धरून त्यानं तिला कॉटवर आणून बसवलं नाहीं. तिचं एखादं हळुवारसं चुंबनहि घेतलं नाहीं !

तो तसाच पुन्हा वाचीत राहिला. काय करावं तें चंपूला कळेना. तिच्या स्वप्नांतला नायक पत्नीच्या भेटीसाठीं अधीर झालेला होता. गोड गोड बोलून, मधुर हसून प्रियेला हसवीत होता, खुलवीत होता. खेळकरपणानं तिची लज्जा कमी करण्याचा प्रयत्न करीत होता. इथं प्रत्यक्षांत तर अगदीं थंडा कारभार होता, हें पाहून ती अगदींच हतबुद्ध झाली. असा प्रसंग निर्माण झाला असतां पत्नीनं काय करावं, याचं वर्णन कुठंच नव्हतं. कारण कादंबरींत असा नायक नव्हताच. सारेच बेटे रसिक होते ! त्यामुळं त्यांच्या प्रेयसीवर अशी आपत्ति येतच नव्हती.

पतीनं पुढं होऊन पत्नीचा हात धरला नाहीं, म्हणून तिनं किती वेळ दारांत उभं राहायचं... ! चंपू पुढं झाली, मुकुंदच्या शेजारीं बसून त्याच्या हातांतलं पुस्तक ओढून घेत म्हणाली, "पुस्तक एवढं मजेदार का आहे...?"

असा चंपूचा संसार सुरू झाला. अरसिक आणि रुक्ष नवऱ्याशीं गांठ पडल्यानं चंपू फार निराश झाली. जनदृष्टचा चंपूच्या नवऱ्यांत नांव ठेवायला कांहींच जागा नव्हती. त्याचं रूप वाईट नव्हतं, प्रकृति चांगली होती आणि बऱ्या पगाराची नोकरी होती. हें सारं ठीक होतं, पण तो कमालीचा अरसिक होता; हा त्याचा मोठाच दोष होता. चंपूसारख्या स्वप्नाळू कथा-कादंबऱ्यांच्या जगांत वावरणाऱ्या मुलीच्या दृष्टीनं तर तो अगदींच रखरखीत होता. त्याला काव्यमय बोलतां येत नव्हतं, मग काव्यमय वागणं तर दूरच राहिलं ! अनिर्बंध स्वातंत्र्य आणि चंपूसारखी तरुण पत्नी असूनसुद्धां त्याला कधीं प्रणयचेष्टा कराव्याशा वाटल्या नाहींत. वेणी आणली तर आपल्या हातानं तिच्या अंबाड्यावर ती घालण्याची इच्छा त्याला कधीं झाली नाहीं. चंपूनं

खायला केलेल्या पदार्थांची बशी पुढं आली कीं भराभर खाऊन टाकून तो मोकळा होई. आपल्याबरोबर खाण्याचा त्यानं कधीं चंपूला आग्रह केला नाहीं, कीं चमचा भरून तिच्या तोंडांत घातला नाहीं. तिनं आपल्याबरोबर फिरायला चलतांना अमुक पातळ नेसावं असा आग्रह नवरा धरूं शकतो, हें त्याच्या गांवींहि नव्हतं. चंपू जास्त वेळ वाचीत बसली तर तिच्या हातांतलं पुस्तक ओढून, दिवा बिझवून आपला अधीरपणा व्यक्त करावयाचा पोरखेळ त्यानं कधीं केला नाहीं. चंपूनं त्याला खुलविण्याचे, रसिकता शिकविण्याचे प्रयोग करून पाहिले, पण बळेंच फुंकारून कळी कधीं फुलली आहे का? रसिकपणा शिकवून येत नाहीं, तो जात्याच असावा लागतो. याचें प्रत्यंतर तिला आलें. कथा-कादंबऱ्यांतला काल्पनिक प्रणय प्रत्यक्षांत आणायला उत्सुक असलेली चंपू पुन्हा तिकडंच वळली. अतृप्त मनाची तहान भागविण्याकरितां ती आतां वाचूं लागली. प्रणयप्रसंग वाचून रोमांचित होऊं लागली. नवऱ्याच्या मुखदुर्बळ स्वभावामुळं चंपूचं मन संसारांत रंगण्याऐवजीं वाचनांत रममाण होऊं लागलं.

विचार करतां करतां केव्हां डोळा लागला तें चंपूला कळलंहि नाहीं. आईची हाक ऐकून ती जागी झाली. माईनीं चहा केला होता. चूळ भरून चंपू पाटावर येऊन बसली. कपबशी हातांत घेत म्हणाली, " माई, इतक्या लवकर कशाला ग चहा केलास...?"

" मला कथेला जायचंय् ना साडेतिनाला. "

" अग मग तुझ्या पुरता करून घ्यायचा होता. मीं घेतला असता नानाबरोबर. "

" नानाबरोबर पुन्हा घे, आतां मला एकटीला घ्यावासा वाटेना. म्हणून तुलाहि ठेवला घोटभर. " माईचें बोलणें ऐकून चंपूला पुन्हा मुकुंदाची आठवण झाली. सकाळ-संध्याकाळ दोन्ही वेळां त्याची कपबशी चंपू टेबलावर नेऊन ठेवी. ती मुकाटचानं उचलून तो चहा पिऊन टाकी. चार महिन्यांत एकदांहि तो ' तूं घेतलास का चहा ?' अगर ' इकडं आण ना तुझाहि कप ' ' इकडं कशाला आणलास ? मीच तिकडं येतों' असं कांहीं म्हणाला नव्हता.

" तेवढं तुझं मंगळसूत्र दे पाहूं. जातां येतां जाते सोनाराकडे. " माई म्हणाल्या.

माई देवळांत निघून गेल्या. तेवढ्यांतच नानाचा शिपाई मासिकाचे अंक घेऊन आला. नवे अंक पाहून चंपू प्रफुल्लित झाली. दाराला कडी घालून ती गॅलरींत जाऊन बसली. प्रथम तिनें सारे अंक चाळले. एका अंकांत आपल्या आवडत्या लेखकाची कथा प्रसिद्ध झालेली दिसतांच ती वाचायला चंपूनं सुरुवात केली. लवकरच ती वाचनांत गुंगून गेली. " नायिका लाजत लाजत आपल्याला बाळ होणार असल्याची वार्ता पतीला सांगते; तेव्हां तो म्हणतो, ' इतकी गोड बातमी नुसतीच काय सांगतेस ... ! चांगली बातमी सांगतांना पेढे द्यायचे असतात. ही साधी रीत सुद्धां तुला माहीत नाहीं का ? ' त्याच्या बोलण्यांतला गर्भितार्थ जाणून नायिका लाजते, तिच्या गालावर गुलाब फुलतात. नायक त्या गुलाब-फुलांवर आपले ओठ टेकवतो. "

" दुसऱ्या एका प्रसंगीं नायक प्रवासाहून परत येतो. पाहुण्या स्त्रियांशीं गप्पा मारीत पत्नी त्यांच्यांतच झोंपते. तेव्हां पत्नीच्या भेटीला आतुर झालेला पति म्हणतो, 'काल आली नाहींस वर, आतां काय शिक्षा करूं तुला बोल? ' ' एक दिवस मी आलें नाहीं, तर रागावतां अन् तुम्ही आठ आठ दिवस फिरतीला जाऊन बसतां तेव्हां...! ' ' मग तूं शिक्षा करीत जा कीं मला; आपल्याला फार आवडेल अशी शिक्षा.' कथेंतली नायिका लज्जित झाली, तिनें उशींत तोंड लपवलं." कथा वाचणारी चंपूहि लाजली आणि तिनें मासिकच तोंडावर धरलं !

दोन-तीन दिवसांनीं चंपू मासिकं गोळा करून वाचण्याकरितां अशीच गॅलरींत येऊन बसली. ती वाचावयास सुरुवात करणार इतक्यांत बाजूच्या खोलींतून एक तरुण बाहेर आला आणि तिला म्हणाला, " माफ करा हं, आपल्याला एक गंमत दाखवायची आहे. "

रत्नाकर नानांच्या दोस्ताचा नातलग होता. नानानं एक खोली त्याला दिली होती. चंपूनं अजून रत्नाकराला पाहिला नव्हता पण तिनं तर्कानं जाणलं कीं हाच तो रत्नाकर असावा. हंसून ती म्हणाली, " गंमत अन् ती कसली...? "

रत्नाकरनं हातांतलं पाकीट तिच्यापुढं केलं. चंपूनं पाकीट उघडून पाहिलं. त्या पाकिटांत तिचेच दोन-तीन स्नॅप्स होते. " म्हणजे...? " चंपू अतिशय आश्चर्यचकित झाली होती.

"त्या दिवशीं तुम्ही इथं वाचीत बसला होता ना तेव्हां तुमच्या चेहऱ्यावरचे भाव इतके मोहक होते कीं मला फोटो घेतल्यावांचून राहवेना." रत्नाकराचं बोलणं ऐकतां ऐकतां चंपू पुन्हा एकदां फोटो नीट निरखून पाहूं लागली. खरंच...! किती सुंदर भाव उमटले होते, तिच्या चेहेऱ्यावर. तिचा चेहेरा एक गोड कहाणी सांगत होता. तें भावदर्शन लज्जेचें होतें. म्हणजे... नायिकेच्या प्रणयप्रसंगाशीं ती अगदीं समरस झाली होती, तेव्हांचाच हा फोटो कीं...चंपू इतकी लज्जित झाली कीं ती मुळीं एकदम गॅलरींतून आंतच पळाली !

दुसऱ्याच दिवशीं रत्नाकरनं तिला पुन्हां गॅलरींत गांठलं. त्यानं विचारलं, "तुमचा फोटो प्रदर्शनांत ठेवायला मला तुमची परवानगी हवी आहे,चंपूताई."

चंपूला जणूं विस्मयाचे धक्केच बसत होते. आपल्या चेहेऱ्यावरचं भाव-सौंदर्य पाहून रत्नाकरनं गुपचूप आपला फोटो काढून घेतला. ही घटना घडून कांहीं काल लोटतो न लोटतो, तोंच ही दुसरी अनपेक्षित मागणी तिच्यापुढं आली होती. आपल्या चेहेऱ्यांत असं कांहीं वैशिष्ट्य आहे याची आजच प्रथम तिला जाणीव होत होती. तिच्या सौंदर्याचं वर्णन आणि कौतुक आजच केलं जात होतं. ज्याच्याकडून तिनं अशा प्रशंसेची अपेक्षा केली होती, तो तिचा पति तर उदासीनच दिसत होता. नीटनेटका पोषाख करून भरदार केसांवर फुलांचा गजरा घालून चंपू तयार झाली, तरी त्यानं कांहीं कधीं एखादा प्रशंसोद्गार काढला नाहीं. त्यामुळं रत्नाकरनं परवानगी विचारल्यावर काय बोलावं तें तिला सुचेना. पण कांहीं तरी बोललं पाहिजे म्हणून ती म्हणाली, " इश्श ! प्रदर्शनांत ठेवण्यासारखं काय आहे माझ्या फोटोंत ! "

" काय आहे तें कलावंताच्या नजरेलाच समजणार. तुम्ही फक्त परवानगी द्या म्हणजे झालं... "

चार-सहा दिवसांनीं रत्नाकरनें तिला तिच्या फोटोला बक्षीस मिळाल्याची बातमी सांगितली ! रत्नाकराला फोटोग्राफीचा फार नाद होता. शहरांतल्या एका मोठ्या प्रदर्शनांत त्यानें फोटो पाठविला होता व त्याला बक्षिसहि मिळालें होतें. तो म्हणाला, " चंपूताई, तुमचा चेहरा विलक्षण बोलका आहे.

मनांतले सारे भाव आरशासारखे स्वच्छ उमटतात तुमच्या चेहऱ्यावर. तुमचा त्या वेळचा चेहरा पाहून कुणींहि सांगितलं असतं, तुम्ही काय वाचतां आहांत तें..."

"अं हं कुणालाहि नसतं समजलं, तुमच्यासारख्या कलावंतांनाच समजतं तें."

रत्नाकर मनापासून हंसला आणि म्हणाला, "चढाओढींत भाग घ्यायचं ठरविलं अन् सारखा चित्राला विषय शोधीत होतों. मनासारखं कांहींच नजरेला पडेना. त्या दिवशीं सहज चूळ भरायला म्हणून खिडकीशीं आलों न् तुम्ही नजरेला पडलांत. तुम्हीं वाचनांत इतक्या गुंग झाला होता कीं, जवळजवळ पांच मिनिटं मीं तुमचं निरीक्षण केलं, कॅमेरा ॲडजस्ट करून तुमचे दोन-तीन स्नॅप्स घेतले तरी तुम्हांला पत्ता देखील लागला नाहीं."

"कमाल झाली माझी अगदीं" चंपू ओशाळून म्हणाली. "बाकी वाचनांत मी नेहमीं अशीच गुंगून जाते. पण तरीसुद्धां माझ्या फोटोला बक्षिस देणारे परीक्षक वेडपटच दिसताहेत."

"कलावंत वेडेच असतात चंपूताई. हें यश मिळविण्यांत तुम्हीं माझ्याशीं सहकार्य केलंत म्हणून आज मी तुम्हांला चहा देणार आहें. या–" चंपू रत्नाकराच्या खोलींत गेली. दोघांनीं चहापान केलं. रत्नाकरनं आणखीहि कांहीं फोटो तिला दाखविले. ते पाहून चंपू म्हणाली, "तुम्हां कलावंतांच्या हातचं लेणं चढल्यानं साध्याही गोष्टी सुंदर दिसतात. मला माफ करा. माझ्या फोटोला बक्षीस मिळालं असलं तरी त्यांत खरा गौरव झाला आहे तो तुमच्या कलेचा हें मीं लक्षांतच घेतलं नाहीं."

हळूहळू चंपूचा आणि रत्नाकराचा परिचय वाढत गेला. माहेरीं आल्यामुळं चंपूला फारसं काम नसेः दुपारीं नाना ऑफिसांत आणि माई देवळांत गेल्यावर चंपू एकटीच घरांत असे. रत्नाकर एम्. ए. चा विद्यार्थी होता. अभ्यास करून कंटाळा आला, कीं तो गॅलरींत जायचा आणि चंपूच्या व त्याच्या गप्पा सुरू व्हायच्या. रत्नाकराचा स्वभाव मोकळा व थट्टेखोर असल्यानं त्याची कुणाशींहि चटकन् मैत्री होत असे व एकदां मैत्री होत गेली कीं ती वाढतच जाई. चंपूप्रमाणंच त्यालाहि वाचायचा नाद होता. आतांपर्यंत चंपूच्या आयुष्यांत इतका आनंदी आणि रसिक तरुण आलाच नव्हता. कथा-कादंबरींतील अनेक तरुणांचे नमुने तिच्या परिचयाचे झाले होते. पण प्रत्यक्षांत–

स्वतःचा भाऊ सोडला तर–एवढा एकच तरुण तिला इतक्या जवळून पाहायला मिळाला होता. त्याचा स्वभाव आपल्या स्वभावाशीं इतका मिळता–जुळता आहे, हें पाहून तर ती अधिकच खूष झाली. एखादा दिवस तिला रत्नाकराशीं गप्पा मारायला मिळाल्या नाहींत, तर चुकल्यासारखं वाटूं लागलं होतं.

आज चंपूनं रत्नाकराच्या चहाची परतफेड करावयाची ठरविली होती. चहा तयार झाल्यावर ट्रेमधें चहा–फराळाचें घेऊन ती रत्नाकरच्या खोलींत गेली. रत्नाकरनं नुकतंच एक पुस्तक वाचून संपवलं होतं. आळस देत तो चहाचाच विचार करीत होता. समोरून आलेली चंपू दिसतांच तो उठून बसला आणि हंसत म्हणाला, "अरे वा! अगदीं कल्पवृक्षाखालीं बसल्यासारखं वाटतंय्. चहाचा विचार मनांत डोकावतो कीं नाहीं, तों चहा हजर."

टेबलावर ट्रे ठेवून कपांत चहा ओतींत चंपू हंसत म्हणाली, "आतां कांहीं मनांत न आणतां चटकन् चहा घ्यायला या, नाहींतर तरुणीची होईल राक्षसी आणि अमृताचं होईल विष."

"नको, नको," रत्नाकर भयभीत झाल्यासारखं करून म्हणाला, "मीं आपला या कल्पवृक्षाखालून उठतोच कसा" कॉटवरून उठून रत्नाकर खुर्चीवर येऊन बसला.

दुसऱ्या दिवशीं असाच वाचन संपवून, थोडी झोंप काढून रत्नाकर चहाचा विचार करीत कॉटवर लोळत होता. तेवढ्यांत हातांत एक पुस्तक घेऊन चंपू आली आणि म्हणाली, "हें काय! अजून चहा नाहीं झाला...?"

"पाहात होतों आजहि कालच्याप्रमाणंच कांहीं चमत्कार झाला तर...!"

"आज तो चमत्कार नाहीं, पण दुसरा करून दाखवते," असं म्हणून चंपू पुढं आली आणि तिनं स्टोव्ह पेटविला.

या प्रसंगानंतर दोन-तीन दिवसांनीं चंपू आपल्या एका नातेवाईकाकडे गेली होती. तिथून परत येतांना तिला जरा उशीरच झाला. झपझप् पावलं टाकीत ती घराकडं निघाली. उशीर झाल्यानं इकडं-तिकडं कुठंच तिचं लक्षच नव्हतं. त्यामुळं पाठीमागून येणाऱ्या रत्नाकरला तिनं पाहिलंच नाहीं. शेवटीं तोच म्हणाला, "अहो चंपूताई, थांबा कीं, अशा काय भराभर पळताय्!"

चंपूनं विस्मयानं मागं वळून पाहिलं, "अय्या! आज मला कल्पवृक्षाखालीं बसल्यासारखं वाटतंय्! बरं झालं, तुमची सोबत झाली."

रत्नाकर व चंपू चालूं लागले. बाजारपेठ लागल्यावर रत्नाकर कांहीं खरेदी करण्याच्या हेतूनं एका स्टोअरकडं वळूं लागला. चंपू रस्त्यावरच उभी राहिली, समोरच्या शोकेसमधील साडयांकडं तिची नजर वळते न वळते तोंच कुणी तरी तिच्या पाठीवर थाप मारली. चंपू मागं वळून बघते, तो तिची एक वर्गभगिनी. पण तिचें नांव कांहीं चंपूला आठवेना; तेव्हां ती मुलगी म्हणाली, "आहा, लग्न झालं म्हणजे ओळखसुद्धां विरसतात कांहीं माणसं !"

अजूनहि चंपूला तिचं नांव नेमकं आठवतं नव्हतं. कांहीं तरी बोलून वेळ मारून न्यावी अशा विचारानं चंपूनं ओठांची हालचाल केली; पण ती मुलगीच स्टोअरकडं अंगुलिनिर्देश करीत म्हणाली, "तुझे मिस्टर ना...? ओळख करून दे कीं एकदां..."

आपल्याशीं एवढ्या सलगीनं बोलणारी ही मुलगी कोण या कल्पनेनं चंपूचा अधिकच गोंधळ उडाला होता. त्यांत तिचं हें बोलणं ऐकून तर ती आणखीनच बावरली. तिचा गैरसमज आपण दूर केला पाहिजे हें सुद्धां तिच्या लक्षांत त्यावेळीं आलं नाहीं. "आतां उशीर झाला आहे. पुन्ह केव्हां तरी" असं कांहीं तरी पुटपुटत ती एकदम चालूं लागली.

रात्रीं चंपूला मुळींच झोंप येईना. वाचनांतहि गोडी वाटेना. रत्नाकराशीं ओळख झाल्यापासून आजपर्यंत तिच्या मनांत पाप आलं नव्हतं. त्याचा मनमोकळा बोलका स्वभाव तिला आवडला होता. त्याच्या व्यक्तिमत्वावर ती खूप होती. त्याच्यामुळें तिचा दुपारचा वेळ मजेंत जात असे. चार महिने अबोल नवऱ्याच्या सहवासांत काढून कुचंबलेल्या तिच्या मनाला, या उमद्या तरुणाचा सहवास म्हणजे उत्साहाची पर्वणीच वाटत होती. त्याच्याबद्दल तिला आदर वाटत होता, कौतुक वाटत होतं आणि शुद्ध मैत्रीच्या भावनेखेरीज इतर कोणत्याहि भावनेनं चंपूच्या मनाला स्पर्श केला नव्हता; पण आज तिचं मन चाळवलं गेलं. त्या मुलीचे शब्द सारखे तिच्या कानांत घुमूं लागले, "तुझ्या मिस्टरांची ओळख दे कीं करून..."

त्या वेळीं रस्त्यांत चंपू गोंधळली होती, पण त्या शब्दांचा अर्थ तिच्या लक्षांत आल्यावर ती एकदम शहारली. गैरसमज होता खरा तो; पण किती गोड गैरसमज . . . ! चंपूच्या अंगावर सुखाचे रोमांच उठले. इतका उमदा आणि रसिक तरुण आपला जन्माचा जोडीदार—या कल्पनेशीं ती चाळे करूं

लागली. त्याचं बोलणं–चालणं ती आठवूं लागली. त्याच्या वागणुकींत आढळणाऱ्या रसिकतेचा प्रत्यय घेऊं लागली. रसिकतेला मुकलेल्या आपल्या मनाला तिनं अगदीं स्वैर सोडलं. वाळवंटांत प्रवास करणाऱ्या तहानेलेल्या प्रवाशाला एखादा निर्झर आढळल्यावर त्यानं मनमुराद उदक प्राशन करून आपली तृष्णा शांत करावी, तसं चंपूचं झालं. तारुण्यांतल्या उन्मादक प्रणयाला भुकेलेलं तिचं मन रत्नाकराचा विचार करण्यांत गुंग होऊन गेलं.

दुसऱ्या दिवशीं उठल्याबरोबर तिनें गॅलरींत डोकावलें. रत्नाकराच्या खोलींत स्टोव्हचा आवाज येत होता. तो चहा बनवीत होता हें तिच्या लक्षांत आलं. आपण जाऊन त्याला चहा करून द्यावा, अशी तिला उत्कट इच्छा झाली. पण माईंना आवडलं नसतं, म्हणून ती चूप बसली. मात्र तिचं सारं लक्ष त्याच्या हालचालीकडंच होतं. आंघोळ करून, खोलीला कुलूप घालून तो बाहेर निघून गेल्यावर तिचा नाइलाज झाला.

दुपारीं गॅलरींत जाण्यापूर्वी तिनं आरशांत डोकावलं. चेहऱ्याची साफसफाई केली. केसावरून कंगवा फिरवला. पूजेच्या फुलांतली एक गुलाबकळी तिनं बाजूला ठेवून दिली होती ती केसांत घातली आणि मग ती धडधडत्या हृदयानं गॅलरींत आली. आपण मुद्दाम थाटमाट केला आहे, हें त्याच्या लक्षांत येऊं नये, असं एकीकडे चंपूला वाटत होतं, तर दुसरा विचार येत होता कीं आपण त्याच्याकरितांच नीटनेटकं होऊन आलों आहों याची त्यानं दखल घ्यावी.

रत्नाकर तिची वाटच पाहात होता. तिला पाहून तो म्हणाला,"हें काय? कुठं बाहेर चालली वाटतं स्वारी? मी तर एक गंमत सांगणार होतों तुम्हांला..."

मनांतून खूष होत चंपू म्हणाली,"छे, बाहेर नाहीं जात. आज रोजच्यापेक्षां थोडी जास्त झोंप झाली म्हणून सुस्ती जाण्याकरितां तोंड स्वच्छ धुतलं."

"काल काय गंमत झाली, तुमच्याबरोबर येतांना रस्त्यांत माझ्या एका मित्रानं पाहिलं आणि स्वारी सारखी चेष्टा करायला लागली माझी. मला फार मजा वाटली त्याच्या गैरसमजुतीची–" रत्नाकर मोठमोठ्यानं हंसला.

रत्नाकराचं बोलणं ऐकून चंपू मोठ्यानं हंसली खरी; पण त्याच्या बोलण्यांत ध्वनित झालेल्या कल्पनेनं तिच्या अंगावर कांटा उभा राहिला. छातीची धडधड वाढली. चेहेरा लाल झाला. आपली अवस्था त्याच्या

ध्यानांत येईल, या भीतीनं चंपूनं तोंड वळवून टेबलावरच्या वह्या-पुस्तकांशीं चाळा करीत म्हटलं, "पण मग त्याच्या चुकीची दुरुस्ती केलीत कीं नाहीं?"

"तर...मी त्याला सांगितलं कीं एखाद्या मुलीनं माझ्यावर प्रेम करण्याइतका मी नशिबवान् कुठं आहें...!"

"वा:! काय पण विनय...! अहो, तुम्हीं मनांत आणायचा अवकाश, पोरी नुसत्या पाठीस लागतील तुमच्या..."

"असं...? इतका का देखणा आहें मी?" रत्नाकरानं विचारलं.

चंपूनं ओठ चावला. आपण असं बोलायला नको होतं, असं तिला वाटलं. रत्नाकर टक लावून आपल्याकडं बघतो आहे, आपल्या भावनांचे शोध घेतो आहे, याची तिला जाणीव झाली. पण बोललेले शब्द निसटून गेले होते. आतां ते मागारीं येणं शक्य नव्हते. विषय बदलायसाठीं म्हणून आतां कालची गंमत त्याला सांगावी असं तिच्या मनांत आलं. आधीं तिनं त्याला कांहीं सांगावयाचं नाहीं असं ठरवलं होतं, पण आतां तिचा बेत बदलला. हंसून ती म्हणाली, "तुमच्या मित्रानं तुमची चेष्टाच केली नुसती, पण काल माझ्या एका ओळखीच्या मुलीनं तर तुम्हांला माझे मिस्टरच बनवून टाकलें."

"शाबास...!" रत्नाकर पुन्हा एकदां मोठ्यानं हंसला आणि म्हणाला, "मग तुम्हीं काय सांगितलं तिला?"

"तुमच्यासारखंच. असे मिस्टर मिळण्याइतकी कुठं भाग्यवान् आहें मी...!" चंपू हंसली आणि तिनं स्टोव्ह पुढें ओढला. मुकाट्यानं दोघांचं चहापान झालं आणि चंपू आपल्या घरांत निघून आली. ती एक प्रकारच्या उन्मादांतच होती. आजपर्यंत अनुभवाला मिळाला नाहीं, असा प्रसंग अनुभवाला मिळाला कीं मनाला आनंद होतो. साऱ्या शरीरांत जणूं एक तेजाची लहर चमकून जाते. कण न् कण प्रफुल्लित होऊन जातो. चंपू पराकाष्ठेची स्वप्नाळू मुलगी. प्रीतीचा उगम, विकास यांचें रेखाटन वाचतांना ती तल्लीन होऊन जाई. त्या मुग्ध प्रणयाचा अनुभव घ्यायला ती उत्सुक झाली होती. तो अनुभव घेत असतांना मनाला होणाऱ्या आनंदाचं प्रत्यक्ष दर्शन तिला हवं होतं. तिची ती आकांक्षा अपुरी राहिली होती. तिला पाहिजे होता, तसा तरुण आज तिच्या आयुष्यांत आला होता. त्याच्याशीं प्रणयाचे खेळ खेळून ती आपल्या मनाचं समाधान करूं इच्छित होती. आपण विवाहित आहोंत, हें जणूं कांहीं ती काल विसरूनच

गेली होती. जीवनांतल्या त्या दिव्य अनुभवानं बेभान व्हायचं, एकदां तरी हा स्वर्गीय आनंद अनुभवायचाच, या एकाच विचारानं ती भारली होती. परिणामाची कल्पना करायलाच ती तयार नव्हती.

आणखी सात-आठ दिवस असेच गेले. आपल्याला जसें रत्नाकराचें आकर्षण वाटतें, तसेंच त्यालाहि आपल्याबद्दल वाटतें, हें चंपूला कळून चुकलें. या पांच-सात दिवसांत घडलेल्या घटना, दोघांत झालेलीं सूचक बोलणीं यांवरून हें आकर्षण जास्त जास्त प्रगत होऊं लागलें होतें, असं म्हणावयास हरकत नाहीं. दिवसां परस्परांशीं गप्पा माराव्या, एकमेकांचे भावनांचे शोध घ्यावे आणि रात्रीं ते सारं आठवून प्रेमाच्या कल्पनामय राज्यांत गुंग व्हावं असा चंपूचा क्रम होता, प्रेमाच्या प्रवाहांत ती सांपडली होती आणि त्याबरोबर स्वेच्छेनं वाहात चालली होती.

आज चंपू रत्नाकराच्या खोलींत शिरली त्या वेळीं तो आपल्या कॅमेऱ्याची साफसफाई करीत होता. चंपूनं खुर्चीवर आसन ठोकीत विचारलं, "आज काय विचार आहे?"

"बक्षीस मिळाल्यापासून कॅमेऱ्याला हातसुद्धां लावला नाहीं. म्हटलं आज तरी तिकडं बघावं."

"अस्सं...मग आज कुणाला गांठायचा विचार आहे आपला?"

"आणखी कुणाला...! तुलाच गांठून ठेवली आहे कीं मीं...तुझ्याइतकं चित्तवेधक ऑब्जेक्ट समोर असतांना दुसऱ्या कशाला शोधायला जायचं...!

"पण मी स्वतःच समोर असतांना माझा फोटो घ्यायची काय जरूर आहे?"

"काय वेडचासारखा प्रश्न विचारलास हा चंपू? असा विचार केला तर जगांत कलावन्त आणि त्यांची कला यांचं महत्त्वच उरणार नाहीं कांहीं, अग, सुंदर क्षण, मनोवेधक देखावे दिसले, कीं ते पकडून चिरंतन करण्यासाठीं कलावंत धडपडत असतात."

"बरं बरं, कलावंत, मग आज कोणता सौंदर्याचा साक्षात्कार झाला आहे आपल्याला, म्हणून आपण माझ्या फोटोची तयारी चालविली आहे?"

"अलीकडं आठ दहा दिवस मी पाहतों आहे चंपू,! विलक्षण खुषींत असलेली दिसतेस तूं मला. तुझा चेहेरा विलक्षण प्रसन्न दिसतो. म्हणून मला पाहिजे असलेल्या दोन-तीन पोझेस् मी काढून घेणार आहें."

बोलतां बोलतां रत्नाकरनं कॅमेरा लोड केला. फर्निचरची थोडीशी हलवा-हलव केली. चंपूनं प्रसाधन केलेलं होतंच. त्यांत रत्नाकरनं केलेल्या स्तुतीनं ती आणीकच प्रसन्न झाली होती. सारी तयारी झाल्यावर रत्नाकरानं आपल्या कोटाच्या खिशांतून एक पुडी काढून चंपूच्या हातांत दिली. "वेणीशिवाय फोटोला मजा येणार नाहीं, काय?" ती म्हणाली,...

"हं, आतां एखादा मधुरसा विचार मनांत आण, म्हणजे मला पाहिजे तसा गोडवा तुझ्या चेहऱ्यावर येईल."

पोझ घेऊन बसलेल्या चंपूनं एकदम मान फिरवली. किंचित् चिडून ती म्हणाली, "माफ करा, कलावन्त, नुसत्या काल्पनिक प्रणयाचा मला आतां कंटाळा आला आहे."

फोटोच्या विचारांत असलेला रत्नाकर चंपूचं बोलणं ऐकून थोडा गडबडलाच. हातांतला कॅमेरा त्यानं टेबलावर ठेवून दिला आणि तो समोर बसलेल्या चंपूकडं पाहूं लागला. तिच्या बोलण्याचा आशय त्याच्या ध्यानांत आला. त्याचा चेहरा हंसरा झाला. दोन पावलं पुढं टाकून तो म्हणाला, "मग खरोखरीच कृति करून दाखवूं काय...?"

चंपूनं एकदां त्याच्याकडं पाहिलं आणि तिनं मान खालीं घातली. तिच्या सूचक नजरेनं रत्नाकर बेभान झाला. तो पुढं सरकला. त्यानं चंपूचा हात धरला. आपल्या स्पर्शानं चंपूची काया थरथरली, हें त्याच्या लक्षांत आलं. तो वांकला, हलकेंच त्यानं चंपूची हनुवटी वर केली. पुन्हा एकदां चंपूची बेहोष नजर त्याच्या नजरेला भिडली. त्या नजरेंत अपेक्षा होती. आव्हान नाकारण्याइतका रत्नाकर बेडा नव्हता. चंपूचा हात दाबीत तो आणखी पुढं सरकला. आतां त्याचे ओठ चंपूच्या ओठांना भिडणार...

"चंपू, ए चंपू, पाहिलंस का तुझं मंगळसूत्र आणलंय् सोनारानं."

माईचे ते शब्द तापलेल्या तेलासारखे चंपूच्या कानांत शिरले. तिची धुंदी उतरली. वस्तुस्थितीची तिला जाणीव झाली. तिचा चेहेरा एकदम कठोर झाला. तिनं रत्नाकराला एकदम ढकलून दिलं आणि—"माफ कर रत्नाकर—" असं कांहींतरी पुटपुटत ती वेगानं खोलीच्या बाहेर पडली!

● ● ●

मुलखावेगळी ४

छोट्या सुमीला बशीखालीं कांहींतरी झाकून नेतांना पाहून प्रतिभेनं ओळखलं कीं आज घरीं केलेल्या आंबोळ्याचा नमुना आईनं माधवला पाठवला आहे. तरीपण तिनं मुद्दामच सुमतीला हांक मारून विचारलं, "काय ग सुमे ?"

"आईनं आंबोळ्या नेऊन द्यायला सांगितल्या आहेत माधवरावांना. तूं देतेस का नेऊन ?" सुमतीनं हातांतली पातेली पुढं केली. प्रतिभा घाई-घाईनं म्हणाली, "नको, मला वेळ नाहीं. तूंच घेऊन जा."

सुमी हंसली आणि पुढं गेली. तिच्या हंसण्याचा अर्थ प्रतिभेला कळला आणि तिला थोडासा रागच आला. घरांत कांहीं विशेष केलं, कीं आई माधवला विसरत नाहीं हें प्रतिभेला ठाऊक होतं. त्याबद्दल तिला मोठंसं कौतुक वाटलं नाहीं, आनंद झाला नाहीं. तरी पण कधीं रागहि आला नव्हता. आज मात्र आईचं करणं तिला अगदीं रुचलं नाहीं. धाकटा प्रभा मधल्या-वेळीं आंबोळी मागत होता. त्याला नाहीं म्हणून सांगून आईनं माधवासाठीं त्या आंबोळ्या राखून ठेवाव्या, ही गोष्ट तिला बिलकूल रुचली नाहीं. दारांतून बाहेर पडणाऱ्या सुमीकडं पाहात नि कपाळावर आठ्यांचं जाळं चढवीत प्रतिभा मोठ्यानं म्हणाली, "काय ग आई, बिचाऱ्या प्रभाला रडवून माधवरावांना आंबोळ्या पाठवायचं कांहीं अडलं होतं वाटतं ?"

स्वयंपाकघरांत तांदूळ निवडीत असलेल्या गोदूताईनीं प्रतिभेचं बोलणं ऐकलं. त्यांना वाटलं, उठावं आणि प्रतिभेला सांगावं, "अग प्रतिभा, भावी

जांवयाकडं असंच लक्ष असतं हो बायकांचं. जांवयाचं भारी कौतुक असतं आम्हांला. पहिल्या वहिल्या लेकीचं लग्न होऊन येणारा पहिला जांवई मग त्याला कुठं ठेवूं न् कुठं नको असं झाल्याशिवाय कसं राहणार...! माधव-विषयीं मला काय वाटतं, तें तुला मुलगी झाल्याशिवाय कळायचं नाहीं. "

गोदूताई हें सारं मनांतच बोलल्या. कारण उघडपणें बोलून तें प्रतिभेला रुचेलच,असं त्यांना वाटेना.आज सात-आठ दिवस प्रतिभेच्या वागण्यांत कांहीं-तरी बदल झाला आहे असं त्यांना सारखं वाटत होतं. पंधरा-वीस दिवसां-पूर्वी प्रतिभा आपल्या, चुलत्याकडे जाऊन आली आणि तेव्हांपासून हा बदल गोदूताईच्या लक्षांत येऊं लागला होता. पूर्वीसारखी ती मोकळेपणानं हंसत बोलत नव्हती. लहानग्या भावंडांची चेष्टा करीत नव्हती. त्यांच्या अभ्यासा-कडं पण या आठ दिवसांत तिनं मुळींच लक्ष दिलं नव्हतं. आईच्या कामाला हातभार लावला नव्हता. एवढंच नव्हे, तर या सर्वांत महत्त्वाची आणि लक्षांत येण्यासारखी गोष्ट म्हणजे गांवाहून आल्यापासून ती एकदांहि माधवरावांच्या खोलींत गेली नव्हती. तो आला तेव्हां त्याच्याशीं मनमोकळेपणानं बोललीहि नव्हती. तिच्या वागण्यावरून गोदूताईना वाटलं होतं कीं ती माधवला टाळण्याचा प्रयत्न करते आहे आणि हें लक्षांत आल्यावर त्यांना जरासं वाईटहि वाटलं होतं. प्रतिभेला विसावं वर्ष लागल्यापासून त्यांना तिच्या लग्नाची काळजी वाटत होती. पण शेजारच्या खोलींत माधव राहायला आल्यापासून त्यांच्या काळजीचं कांहींसं निवारण झालं होतं. नीटस नाका-डोळ्यांचा, ऐन पंचविशींतला कष्टाळू माधव त्यांना एकदम आवडला होता. आणि थोडासा परिचय वाढल्यानंतर त्यांनीं मनाशीं माधवला आपला जांवई निश्चित करून टाकला होता. आपल्या मनांतला विचार उघडपणं कुणालाहि बोलून न दाखवितां त्या प्रतिभेच्या मनाचा अंदाज घेत होत्या. त्यावरून एवढं त्यांच्या लक्षांत आलं होतं कीं, प्रतिभेचं मन माधवविषयीं प्रतिकूल खास नाहीं. नाहींतरी त्यांच्यासारख्या परिस्थितींतल्या स्त्रीला यापेक्षां फाकडा असा कोणता जांवई मिळण्याची शक्यता होती ? पदरीं चार लहान मुलं, छोटंसं राहातं घर अन् यजमानांनीं ठेवलेली थोडीशी पुंजी एवढ्या आधारावर गोदूताई दिवस काढीत होत्या, प्रतिभा मॅट्रिक झाली होती व माँटेसरीचा कोर्स पुरा करून शाळेंत नोकरी करीत होती. अजून तिचं लग्न व्हायचं होतं, चारी

मुलांचीं शिक्षणं व्हायचीं होतीं. अशा स्थितींत माधव गोपूताईंच्या नजरेला पडला तेव्हां आपली एका काळजींतून मुक्तता झाल्यासारखं त्यांना वाटलं.

माधव खरोखरीच अतिशय सालस मुलगा होता. गरिबींत आयुष्य काढल्यामुळें त्याचा स्वभाव मेहेनती आणि राहणी अगदीं साधी होती. पार्टटाइम् नोकरी, शिकवण्या वगैरे करून तो बी. कॉम्चा अभ्यास करीत होता. त्याला फारसा वेळ मिळत नसे, पण आपल्या धांदलीच्या कार्यक्रमांतूनहि सवड काढून तो गोदूताईंची विचारपूस करून त्यांना शक्य ती मदत करी. आपल्या परिस्थितीला जुळणारा हा तरुण गोदूताईंना एकदम पटला. त्यांनीं आपल्या मनांतला विचार जरी बोलून दाखविला नव्हता, तरी त्यांची माधवबद्दलची आस्था पाहून कुणालाहि त्यांच्या मनांतल्या विचारांचा थांग लागणं अगदीं सहज शक्य होतं. आपला विचार सिद्धीला जाण्यांत कांहीं अडथळा उत्पन्न होणार नाहीं अशी त्यांना आशा वाटूं लागली होती. प्रतिभा व माधव एकमेकांशीं कशी वागतात इकडे त्यांचं बारीक लक्ष असे. त्यांना गप्पा मारतांना, हसतांना, बोलतांना पाहून गोदूताईंना बरं वाटे. मर्यादेच्या पलीकडं न जातां त्या दोघांना एकमेकांशीं बोलतां-चालतां येईल अशी त्या चतुराईनं योजना करीत. प्रतिभेचं मत माधवाबद्दल चांगलं आहे याचा प्रत्यय आला कीं आपली योजना यशस्वी होईल, असा विश्वास त्यांना वाटूं लागे.

प्रतिभा गांवाला जाऊन आल्यापासून त्यांच्या या विश्वासाला किंचित् धक्का बसूं पाहात होता. इतर गोष्टींबद्दल त्यांना कांहीं विशेष वाटलं नसतं. नसेल तिची लहर लागत असं समजून त्या स्वस्थ बसल्या असत्या. पण माधवच्या बाबतींतलं प्रतिभेचं औदासिन्य बघून गोदूताई थोडयाशा भयभीत झाल्या होत्या. प्रतिभा कांहीं फार दिवस गांवाला गेली होती, असं नव्हे; पण तेवढ्या पंधरा-वीस दिवसांच्या अवधींत माधवनं दोन-चार वेळां तिच्या परत येण्याची चौकशी केली होती. आतां प्रतिभाहि परत आल्यावर त्याला भेटायला-बोलायला उत्सुक झाली असेल, अशी त्यांनीं आशा धरली होती. परंतु, प्रतिभा आल्यावर त्यांचा साराच हिशेब चुकलेला पाहून त्यांना आश्चर्याचा लहानसा धक्का बसला होता आणि आपण मनांत आंखलेला साराच बेत फसतो कीं काय अशी हुरहुर त्यांना लागली होती. साहजिकच प्रतिभेच्या या फेरबदलाच्या कारणपरंपरेचा गोदूताई शोध घेऊं लागल्या.

इथून गेली, तेव्हां प्रतिभा अगदीं मजेंत गेली. लहान भावंडाचे तिनं गालगुच्चे घेतले, त्यांना कुरवाळलं, त्यांच्यासाठीं खाऊ आणण्याचं आश्वासन दिलं. आईचा निरोप घेतांना तिचा गळा किंचित् दाटून आला होता. माधव तिला पोंचवायला स्टेशनवरहि गेला होता.

पण परत आल्यावर ती अशी वेगळी होऊन आली होती. अर्थातच तिच्या या फेरबदलाचं कारण ती जिथें गेली होती, तिथं घडलं होतं हें नक्की; पण तें काय असावं याचा गोदूताईना अंदाज करतां येईना. कोणीतरी माधवबद्दल कांहींतरी बोललं असावं यापलीकडं त्यांच्या तर्कशक्तीची मजल जाईना.

गोदूताईचा पहिला तर्क अगदीं बरोबर होता. प्रतिभेच्या मनांत चलबिचल व्हावी, अशी कांहींतरी घटना काकांच्या घरच्या मुक्कामांत घडली होती. गोदूताईचा दुसरा तर्कसुद्धां कांहीं अंशीं बरोबर होता. म्हणजे असं कीं, माधवची प्रत्यक्ष नालस्ती जरी कोणी केली नव्हती, तरी तो प्रतिभेच्या मनांतनं उतरावा अशी व्यक्ति तिच्या नजरेला पडली होती. स्टेशनवर तिला पोंचवायला आलेल्या माधवच्या हंसतमुखानं निरोप घेतांना प्रतिभेला अशी कल्पनासुद्धां नव्हती, कीं नुकता कोठें आपल्याला आवडूं लागलेला हा माधव लवकरच आपल्याला अगदीं फिका वाटूं लागणार आहे. गाडी स्टेशनांतून बाहेर पडेपर्यंत ती प्लॅटफार्मवर उभ्या राहिलेल्या माधवकडं पहात होती आणि तो दिसेनासा झाल्यावर त्याचं नि आपलं संभाषण आठवून बघत होती. घरांतून बाहेर पडल्यावर माधव तिला म्हणाला होता, "कांहीं वेळां इच्छाशक्तीच्या प्रबलतेचं प्रत्यंतर आल्यावांचून राहात नाहीं."

"म्हणजे ?—कसली इच्छा ?"

"म्हणजे असं कीं तुमचं गांवाला जायचं ठरल्यापासून मला सारखं वाटत होतं, आपण तुम्हांला पोंचवायला स्टेशनवर जावं. आज आईंनीं मला तुमच्याबरोबर यायला सांगितलं–"

"आणि तुमच्या इच्छाशक्तीचा जय झाला असंच ना—?"

स्टेशनवर थोडा खाऊ घेऊन तिनं माधवजवळ दिला आणि ती म्हणाली, "मुलांना द्या हा खाऊ. अगदीं हिरमुसलीं झालीं होतीं बिचारीं."

"त्यांना हा खाऊ आणि आम्हांला काय ? आम्हांलासुद्धां चुकल्यासारखं होईल."

"पत्रांत तुमची आठवण करीन ना मी..."

हें संभाषण आठवीत प्रतिभा मनाशींच म्हणत होती, "वाः! अगदींच कांहीं रुक्ष नाहीं माधव..."

पण काकांच्या घरीं पोंचल्यावर प्रतिभा हें सारं कांहीं विसरली. खुशालीचें एक पत्र घाईघाईनें खरडून तिनं आईला टाकलं तेवढंच. त्यावर तिला पत्र टाकायला सवडच झाली नाहीं. इतकी ती तिथल्या कार्यक्रमांत गुरफटून गेली. कार्यक्रमांत म्हणण्यापेक्षां रुबाबाला भाळली, असं म्हणणं जास्त श्रेयस्कर ठरेल. प्रतिभेचा चुलत भाऊ हेमचंद्र याचा मित्र चंद्रकांत याच्या रुबाबाला नि थाटामाटाला पाहून ती भुलून गेली. चंद्रकांत प्रेमाचा जिवलग मित्र होता. जवळ जवळ रोजची त्याची हेमाकडची फेरी चुकत नसे. त्याचा स्वभाव अतिशय हौशी होता. सुट्टी असल्यामुळं त्यानं वनभोजनाचे, बोटिंगचे, सिनेमाचे कार्यक्रम आंखले होते. हेमानें प्रतिभेची ओळख करून दिल्यावर तिला त्यानं आपल्या कार्यक्रमांत सामील होण्याचं आमंत्रण दिलं. काकांच्या घरीं दुसरी कांहीं करमणूक नसल्यानं प्रतिभा आनंदानं सर्व कार्यक्रमांत भाग घेऊं लागली. चंद्रकांताचा आणि तिचा परिचय वाढूं लागला. एक माधव सोडून इतर कुणाहि तरुणाशीं तिचा विशेष परिचय नव्हता. त्यामुळं या अनुभवांतल्या नाविन्यानं प्रतिभाला खूप मजा वाटली. चंद्रकांतासारख्या देखण्या, श्रीमंत आणि रुबाबदार तरुणाचा परिचय म्हणजे एक अपूर्वाई होती. श्रीमंत घराण्यांत जन्म झालेला असल्यामुळं चंद्रकांताचे सारे रीति-रिवाज अगदीं खानदानी होते. वागणुकींत निर्भयपणा नि बेफिकिरी होती. बोलण्या-चालण्यांत कुशलता होती. या परिचयाचा परिणाम असा झाला कीं, साधासुधा, काटकसरीनें राहाणारा माधव तिला अगदींच अळणी नि मिळमिळीत वाटूं लागला. झगझगीत जरतारी साडी समोर आल्यावर सुती पातळ अगदीं भिकार वाटूं लागावं, तशी प्रतिभेची अवस्था झाली. त्या दहा-पंधरा दिवसांत चंद्रकांताच्या सहवासाचा तिला सतत लाभ झाला. आणि त्याचा ठसा तिच्या मनावर इतका स्पष्ट उमटला कीं माधवचें रेखाचित्र पार लुप्त होऊन गेलं. विजेच्या झगमगाटानं स्तिमित झालेलं प्रतिभेचं मन माधवला एखाद्या क्षुद्र काजव्याप्रमाणं लेखूं लागलं. चंद्रकांताच्या सहवासांत कसे दिवस गेले, तें तिला समजलं पण नाहीं. एखाद्या

चित्रपटांतलं एक दृश्य नाहींसं होऊन दुसरं पुढं सरकावं आणि त्यांनी आपल्या मनाची पकड घ्यावी, त्याप्रमाणं प्रतिभेच्या मनःपटलावरचं माधवचं चित्र नाहींसं होऊन तिथं चंद्रकांताचं केव्हां उमटलं हें प्रतिभेच्या लक्षांतसुद्धां आलं नाहीं.

सुट्टी संपून प्रतिभा घरीं परत आली ती चंद्रकांताच्या हजार आठवणी मनांत घेऊनच. त्या आठवणी जोंपर्यंत तिच्या मनांत ताज्या होत्या, तोंपर्यंत तरी माधवबद्दल तिला पूर्वीची आस्था वाटणं कठीणच होतं. एखाद्या नव-वधूनं पतीबरोबर मधुचंद्राला निघतांना माहेरच्या गोड आठवणी मनांत सांठवाव्या पण परत येतांना त्या स्मृतींचा मागमूसही न राहतां गोड, चंदेरी स्वप्नांनीं सारी दुनिया धुंद वाटावी तसं तिचं झालं होतं. चंद्रकांताच्या विविध स्मृतींनीं तिचं मन इतकं भरून गेलं होतं, कीं त्यांत बिचाऱ्या माधवला मुळीं स्थानच उरलं नव्हतं. आठवण झालीच तर ती तुलना करण्याकरितांच होत होती ! कुठं चंद्रकान्ताची उंच, सुडौल आणि टेनिस खेळून सुदृढ झालेली मूर्ति आणि कुठं बेताच्या अंगाबांध्याचा सर्वसाधारण माधव ! चंद्रकांताचं कोटिबाज बोलणं, इंग्लिश पद्धतीचे रीतिरिवाज आणि निरनिराळचा विषयांचं ज्ञान...

छेः ! त्याचं सारं कांहीं वेगळंच होतं, माधवशीं त्याची तुलना करणंच मुळीं वेडेपणाचं होतं. खरं सांगायचं म्हणजे माधव अलीकडंच तिला थोडासा आवडूं लागला होता. आईच्या मनांत काय आहे हें तिच्या लक्षांत आलं होतं, पण प्रथम प्रथम तिनं माधवकडं मुळींच लक्ष दिलं नव्हतं. कारण पुष्कळ वेळां तिला वाटे आपण लग्न करणं बरोबर नव्हे. आपल्या पाठचीं चार लहान भावंडं शिकाय-सवरायचीं असतांना आपण लग्न करून संसार थाटणं कांहीं विशेष सुखाचं नव्हे. आपल्या नोकरीची सर्वस्वी जरी नाहीं तरी बऱ्याच प्रमाणांत कुटुंबाला मदत होते, हें तिच्या चांगलंच लक्षांत होतं. आपल्या मनांतली विचारसरणी जरी तिनं कुणाला दाखविली नव्हती तरी माधवच्या व लग्नाच्या बाबतींत ती थोडीशीं उदासीनच होती. थोडासा परिचय झाल्यावर माधवबद्दल तिचं मत चांगलं झालं होतं एवढं खरं. त्याचा कष्टाळू स्वभाव, आनंदीवृत्ति आणि उपयोगी पडण्याकडं कल या गुणांमुळं तो साधारणतः

सर्वांना आवडत असे. पण आतां चंद्रकांताच्या रुबाबानं दिपलेल्या प्रतिभेच्या मनांतून तो साफ उतरला.

आपल्या गांवीं परत आल्यावर कदाचित् प्रतिभा चंद्रकांताला विसरून गेली असती. त्यांच्याबद्दल वाटणारं आकर्षण कितीहि तीव्र असलं तरी तिनं तें आवरून धरण्याचा प्रयत्न केला असता. चंदेरी स्वप्नांच्या मोहमयी सृष्टींतून ती सत्यसृष्टींत उतरली असती. चंद्रकांताच्या स्मृति तिनं मनांत खेळूं दिल्या नसत्या. आकाशांतलीं नक्षत्रं कितीहि सुंदर असलीं, तरी तीं आपल्यासाठीं नव्हतं, असं तिनं पुन्हां आपल्या मनाला शिकवलं असतं...

पण काकांच्याकडं कानावर पडलेला तो ओझरता संवाद...

प्रतिभा मधल्या घरांत न्हालेले केस विंचरीत होती. काकूंनीं स्टोव्ह पेटवला होता. हेमा आईला म्हणत होता, "आई, खायला काय करणार आहेस तें थोडं जास्तीच कर बरं का ?—चंद्रकांत येईलच एवढ्यांत."

"कां रे हेमा, अलीकडं फारसा येऊं लागला आहे चंद्रकांत आपल्याकडं ?"

"सध्यां प्रतिभा आहे ना आपल्याकडे. तिच्याशीं ओळख झाल्यापासूनच स्वारीच्या खेपा वाढल्या आहेत आपल्याकडल्या. मनांत भरलेली दिसते आहे प्रतिभा."

"अगबाई, मग येऊं दे हो खुशाल. पोरीचं नशीब उघडेल नि बाईंची काळजी दूर होईल."

अनपेक्षितपणें कानीं पडलेल्या या बोलण्यानं प्रतिभेच्या मनांत आशेचा सूक्ष्म अंकुर झाला होता, आणि तो अंकुर तिला चंद्रकांताचं विस्मरण होऊं देत नव्हता. त्या नाजूक आशातंतूच्या आधारावरच तिनं आपल्या मनोराज्याचे मनोरे उभारले होते. धाग्याच्या बारीक आधारावर पतंग जसा अंतराळांत तरंगत असतो त्याप्रमाणं आशेच्या या सूक्ष्म धाग्यावर प्रतिभेच्या स्मृतींचा फुगा डुलत होता, आशेचं फूल फुलत होतं, वेडं मन सुखावत होतं, स्वप्नं पाहात होतं, जुन्या जगाला विसरूं पाहात होतं.

आपल्या बदललेल्या वागणुकीचं हें कारण प्रतिभा कुणाला सांगूं शकणार! ...

कांहीं दिवस गेले आणि एक दिवस असा उजाडला कीं प्रतिभेच्या आनंदाला सीमाच उरली नाहीं. हेमाचं पत्र आलं. त्यानं लिहिलं होतं ...

"लवाड पोरी,

दहा-बारा दिवसच तूं इथं होतीस पण तेवढ्यांत आमच्या चंद्रकांताच्या मनांत उलथापालथ करून टाकलीस! मला वाटायचं आमची प्रतिभा आपली साधीभोळी पोरगी...पण साध्याभोळ्या पोरीच आंतल्या गांठीच्या असतात असं दिसतंय्! चंद्रकांतानं आपलं मनोगत मला सांगितल्यावर मीं त्याला म्हटलं," काय रे दिसलं तुला आमच्या या बावळट पोरींत—?" माझ्या बोलण्यावर तो हंसला. त्याच्या हंसण्याचा अर्थ नीटसा कळला नाहीं मला; पण बहुतेक त्याला म्हणायचं असावं, "काय दिसलं, तें तुला कळायचं नाहीं आणि मला सांगतां यायचं नाहीं." कळेल मला, पण अशीच एखादी बावळट पोरगी भेटली तर...

चंद्रकांताला जाळ्यांत पकडल्याबद्दल अभिनंदन हं! आणखी एक गुलगुलित बातमी! चन्द्रकांताला म्हणे लग्नाआधीं तुझी आणखी ओळख करून घ्यायची आहे—म्हणजेच 'रोमान्स्' करायचा आहे. त्याकरितां लवकरच तो तेथें येऊन मुक्काम ठोकणार आहे-अर्थात्, तुझ्या मनाचा थांग लागल्याबरच. मला तो लागलेलाच आहे. चन्द्रकांतसारखा रुबाबदार, देखणा, श्रीमंत, राजबिंडा कोणाला नको आहे...! तरी पण तूं एक संमतिदर्शक पत्र पाठव म्हणजे चन्द्रकांताची स्वारी तेथें येईल. मग चालूं द्या...जास्त कांहीं लिहायची लाज वाटत असली, तर एवढंच लिही कीं चन्द्रकांताला येऊं दे.

काय?...छान युक्ति आहे कीं नाहीं...? अच्छा, हें पत्र वाचून तुझ्या गालावर फुललेले गुलाब पाहायला मिळायचे नाहींत, याचं वाईट वाटतं."

हेमाचं पत्र वाचून खरंच प्रतिभेच्या गालावर गुलाब फुलले. ओठांच्या कळ्या उमलल्या. ती शोभा पाहायला हेम नसला तरी गोदूताई हजर होत्या. पत्रांतल्या मजकुरानं प्रतिभेचा गोंधळ उडालेला पाहून त्यांची उत्सुकता अधिकच वाढली.

"का ग? पत्रांत काय आहे मजकूर एवढा?" गोदूताईनीं विचारलं.

पत्रांतला मजकूर तोंडानं सांगणं अशक्य झाल्यामुळें प्रतिभेनं पत्रच आईच्या हातीं दिलं आणि आपल्या तोंडावर एक पुस्तक धरलं! पत्र वाचून गोदूताईंनीं प्रश्न विचारून विचारून प्रतिभेकडून सारी माहिती काढून

घेतली. चंद्रकांताचं वर्णन ऐकून त्या हर्षित झाल्या आणि प्रतिभेप्रमाणंच आतां त्यांनाहि माधवचा विसर पडला. उतावळेपणा करून माधवशीं आपण उघड कांहीं बोललों नाहीं, याबद्दल त्यांनीं स्वतःलाच धन्यवाद दिले. आपल्या लेकीच्या देखणेपणाचं त्यांना कौतुक वाटलं. भावी जांवयाचा आदरसत्कार कसा करावा, या विचारांत त्या गुंगून गेल्या.

प्रतिभा तर काय-! वसंतागमनानं डवरलेल्या लतिकेप्रमाणं हर्षानं फुलारून गेली. बिचाऱ्या माधवला आतां कोणीच विचारीना. क्षितिजावर उदय पावलेल्या सूर्यनारायणाच्या किरणजालांत चंद्रबिंब अगदीं निस्तेज व्हावं, त्याप्रमाणं चंद्रकांताच्या प्रभावी व्यक्तित्वापुढं माधव अगदींच निष्प्रभ झाला.

ठरल्याप्रमाणं पांच-सहा दिवसांत चंद्रकांत आला. गोदूताईनीं भावी जांवयाच्या स्वागताची परिपूर्ण सिद्धता केली होती. पण त्यानं चहाच्या कपाखेरीज कशालाहि हात लावला नाहीं. आणि दहा-पंधरा मिनिटांपेक्षां जास्त वेळ तो थांबलाहि नाहीं. प्रतिभेला घेऊन तो हॉटेलांत ठरविलेल्या खोलीकडं निघून गेला. मग रोज संध्याकाळीं प्रतिभा त्या खोलीवर जाई आणि नंतर त्यांचे कार्यक्रम ठरत-कधीं फिरायला, तर कधीं सिनेमाला.

चार-पांच दिवस गेल्यावर चंद्रकांत प्रतिभेला म्हणाला, "प्रतिभा, आज करावयाची गोष्ट म्हणजे तुझ्यासाठीं कपड्यांची खरेदी. तुझे हे साधे-सुधे कपडे कांहीं मला आवडत नाहींत. मी भारी सुटांत हिंडायचं आणि तूं माझ्याबरोबर या सुती छापील पातळांत यायचंस, हें कांहीं बरं दिसत नाहीं. चल आज तुला छान साड्या घेऊन देतों."

आपल्या अंगावरच्या कपड्यांकडं चंद्रकांतानं टाकलेला तिरस्कारपूर्ण दृष्टिक्षेप प्रतिभेला मुळींच आवडला नाहीं. ती म्हणाली, "आतांच काय घाई आहे? मग घेऊं कीं..."

"मग म्हणजे केव्हां ग?..." विवाहाच्या कल्पनेनं प्रतिभा लाजली! तिच्या लाजऱ्या मुखचंद्रम्याकडं पाहात चंद्रकांत म्हणाला, "मग करावयाची खरेदी वेगळीच आहे, काय समजलीस? ती खरेदी करायला आपल्याला मुंबईला जावं लागेल. सध्यां इथल्याच दुकानावर भागवून घेऊं."

दोघं दुकानांत गेलीं. चंद्रकांतानं चार-पांच साड्या आणि ब्लाउझ् पीसेस खरेदी केले. लगेच शिप्याकडे जाऊन अर्जंट ऑर्डर दिली.

आपल्या सुखासाठीं त्याची तत्परता पाहून प्रतिभा एकीकडे सुखावून गेली, पण साड्या खरेदी करतांना त्यानं आपल्या पसंती-नापसंतीचा जरासाहि विचार केला नाहीं, ही गोष्ट तिला खटकल्यावांचून राहिली नाहीं.

आज प्रतिभा नव्या अबोली साडीची घडी मोडणार होती. तोंड धुवून झाल्यावर तिनं साडीच्या निऱ्या केल्या. प्रतिभेच्या पाठची विमल जवळच अभ्यास करीत बसली होती. ती म्हणाली, "कित्ती छान साडी आहे, ताई!"

"आज तुझ्या शाळेचं गॅदरिंग आहे ना...मग तुला नेसायची आहे का ही साडी, नेस." प्रतिभेनं ती विमलला नेसायला दिली. तिला साध्या सुती साडींतच बघून चंद्रकान्त म्हणाला, "आज अबोली साडीची घडी मोडणार होतीस ना—? तो रंग तुला फारच खुलून दिसेल."

"विमलला गॅदरिंगला जायचं होतं, म्हणून तिला नेसायला दिली."

"छान–! मीं प्रेमानं तुझ्यासाठीं घेतलेली साडी तूं खुशाल बहिणीला नेसायला दिलीस—!"

"दिली नाहीं कांहीं, आजच्यापुरती नेसली आहे ती. मीं नेसायला घेतलं अन् तिला फार आवडलं तें. माझी लहान बहीण आहे ती. तिचं मन मला मोडवेना. उद्यां नेसेन कीं मी—" प्रतिभा समजुतीच्या सुरांत म्हणाली.

"पण तिला काय करायचं होतं एवढं भारी पातळ—!"

थोड्या वेळानं चंद्रकांत रोजच्यासारखा हसूं–बोलूं लागला; पण त्याचं बोलणं प्रतिभेच्या मनाला चांगलंच लागलं होतं. त्याच्या कपाळावरील आठ्या, आवाजांत व्यक्त झालेली नाराजी आणि विमलविषयीं बोलतांना ध्वनित झालेली तुच्छता या साऱ्या गोष्टी तिच्या मनांतून मुळींच जाईनात. थोडा वेळ तिला चन्द्रकांताचा इतका राग आला, कीं आतां दोन-चार दिवस त्याच्याकडं यायचंच नाहीं, असं तिनं ठरवून टाकलं. पण तिचा तो निश्चय मनाशीं फारसा टिकला नाहीं. कारण चांदण्यांत नदीकांठीं चन्द्रकांताच्या प्रेमप्रवाहाला भरती आली आणि त्यांत प्रतिभेचा राग वाहून गेला.

दोघांचा परिचय वाढत होता, पण आपण चन्द्रकांताच्या जवळ जातों आहोंत कीं त्याच्यापासून दूर चाललों आहोंत हें प्रतिभेला समजेना. झूल्यावर

झोके घेणारी व्यक्ति जशी, एकदां या दिशेच्या जवळ जाते, तर लगेच विरुद्ध दिशेच्या सन्निध जाते; त्याप्रमाणं प्रतिभेची स्थिति झाली होती. तिला चन्द्रकांत आवडत असला, तरी मधूनच त्याची एखादी करणी तिच्या मनाला खटके. प्रणयाच्या धुंदींत नि रंगांत कांहीं काल ती सारं विसरून जाई, पण पुन्हा तिला हुरहुरल्यासारखं वाटूं लागे.

प्रतिभेच्या जीवनांतला हा काळ असा होता कीं, प्रेमाच्या विहारांत तिनं सारं कांहीं विसरून जायला हवं होतं. चन्द्रकांताच्या सहवाससुखानं तिला एक प्रकारची बेहोषी यायला हवी होती–तिच्या जीवनांत पौर्णिमेचं उन्मादक चांदणं फुलायला हवं होतं. प्रणयाच्या गुलाबी रंगांत तिचं जीवन रंगून निघायला हवं होतं. साऱ्या विश्वाचा विसर पडायला हवा होता. तिच्या दुनियेंत फक्त ती अन् चन्द्रकांत एवढेंच उरायला हवें होतें.

पण तसं होत नव्हतं. हेमाचं पत्र आल्यावर चन्द्रकांत येईपर्यंतच्या काळांत ती जेवढी आनंदांत, अनपेक्षित सुखाच्या वर्षावांत न्हाऊन निघत होती, तेवढी कांहीं आतां प्रत्यक्ष चन्द्रकांताच्या सहवासाचं सुख मिळत असतांनाहि हर्षित होत नव्हती. त्याच्या सहवासाचीं जीं सुंदर स्वप्नें तिनें आपल्या कल्पनेंत रंगवलीं होतीं तेवढी कांहीं प्रत्यक्षांत तीं सुखकर वाटत नव्हतीं. लांबून मऊ, आरामशीर वाटणाऱ्या हिरवळींत अभावितपणानं एखादा कांटा टोंचावा तसा दुरून सुखाचं साधन वाटणारा चन्द्रकांताचा सहवास तिला पूर्णांशानं सुखकारक वाटत नव्हता.

चन्द्रकांतानं प्रतिभेला मागणी घातल्यावर भाग्याच्या उच्च शिखरावर ती जाऊन बसली होती. आपल्यासारखी भाग्यवान् कोणी नाहीं अशी तिची कल्पना होती. चन्द्रकांतासारखा देखणा, सुशिक्षित नि श्रीमंत पति मिळाल्यानं आपल्या जिवाचं सार्थक झालं, असं तिला वाटत होतं. पण लांबून मोहक वाटणाऱ्या दीपज्योतीचं तेज जवळून कांहींसं दाहक वाटवं, तसं चन्द्रकांताचं सान्निध्य तिला सर्वस्वी सुखकारक वाटेना. अप्राप्य, अमोल आणि असामान्य व्यक्ति मिळाल्याचा तिचा आनंद गढूळ होऊं लागला. चन्द्रकांताच्या सहवासांत असेपर्यंत ती आनंदांत असे; पण घरीं परत आल्यावर त्याच्या, बोलण्या चालण्याचा चुकून झालेल्या स्पर्शसुखाच्या स्मृतींनीं रोमांचित होण्याऐवजीं मनाला बोचलेल्या एखाद्या प्रसंगानं व्यथित होई. गडद रंगानं ओढलेल्या फलकावर

कितीही रंग फासले तरी मूळ डाग लुप्त होऊं नये, त्याप्रमाणं चंद्रकांताच्या प्रीतीच्या मधुर स्मृति तिच्या मनांतलं बोचरं शल्य नाहीसं, करावयास समर्थ होत नसत. मधून मधून असा प्रसंग घडायचाच. आकाशांतलं सांवट नाहींसं होऊन आकाश थोडं निर्मळ वाटूं लागावं तोंच तें पुन्हा ढगाळून जावं, तसा प्रकार होत होता. एखाद्या दिवशीं कांहीं घडलं नाहीं म्हणजे प्रतिभा म्हणे, "वेडपटच आहें मी." चन्द्रकांत किती प्रेमळ आहेत. त्यांचं माझ्यावर किती प्रेम आहे. आपण उगीचच त्यांच्यावर रागावतो नि मनाला दुःख करून घेतो.

दोन-तीन दिवस प्रतिभेच्या मनाची कळी खुले. चंद्रकांताशीं ती समरस होई नी पुन्हा तिच्या मनाला टोंचणारी एखादी गोष्ट घडून येई. चंद्रकांत आला, त्याच दिवशीं तिच्या मनाला थोडासा धक्का बसला होता. तिच्या आईनें अगत्यानं व मेहनत घेऊन बनवलेल्या पदार्थाला त्यानं हातसुद्धां लावूं नये, ही गोष्ट प्रतिभेला चमत्कारिक वाटली होती. प्रतिभेशिवाय दुसऱ्या कुणाशीं तो नीटपणें बोललासुद्धां नाहीं. आपल्या भावंडांची त्यानं मुळींच विचारपूस केली नाहीं, याचंहि तिला सखेदाश्चर्य वाटत होतं. पातळांची खरेदी करतांनाही त्याचा स्वामित्वभाव तिला आवडला नव्हता. त्याच्या पसंती-नापसतीला तिनं मान दिलाच असता; पण त्यानंहि आपल्या आवडी-निवडी विचारांत घ्यायला हव्या होत्या, असं तिला वाटतं होतं. धाकटचा बहिणीला साडी नेसायला दिल्याबद्दल त्याला आलेला फणकारा ती विसरली नव्हती. सारांश, या पंधरा-वीस दिवसांतला चंद्रकांताचा सहवास म्हणजे नुसती गुलाब-पुष्पांची पखरण नव्हती. नुसताच सुगंधाचा कल्लोळ नव्हता; नुसतीच रस-रंगाची लयलूट नव्हती; केवळ शरदाचं आल्हादकारक चांदणं नव्हतं; तर उन्हा-पावसाचा तो खेळ होता, छायाप्रकाशाचं जाळं होतं, हर्ष-विषादाचा गोफ होता. निरनिराळ्या रागांची खुलावट होतां होतां बैठकीला रंग चढत जावा, तसा चंद्रकांत आणि प्रतिभा यांच्या मैत्रीला, प्रेमाला गहिरा रंग भरायला हवा होता तसा तो भरत नव्हता. गायनाच्या सुरवातीलाच तंबोऱ्याची तार तुटावी, त्याप्रमाणं प्रतिभेच्या मनांतल्या रुखरुखीला सुरुवात झाली होती. प्रेमाच्या व्यक्तीची एखादी गोष्ट अप्रिय वाटल्यानं ती व्यक्ति सर्वस्वी त्याज्य वाटते, असं नव्हे. अप्रिय गोष्टी मनांत सांचल्या तरच त्यांची प्रतिक्रिया घडते. या नियमाला अनुसरून मनांतलीं शल्यं दडवून प्रतिभा

चंद्रकांताशीं समरस होण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु पुढल्या सात-आठ दिवसांत दोन-तीन घटना अशा घडल्या कीं, प्रतिभेला आपल्या मनांतले विचार आवरणं कठीण होऊन बसलं.

प्रतिभेचा वाढदिवस होता.वाढदिवसाला चंद्रकांताला जेवायला बोलवायचा बेत गोदूताईनीं केला. प्रतिभा चंद्रकांताला म्हणाली,

" उद्यां माझा वाढदिवस आहे. तुम्हीं घरीं जेवायला आलं पाहिजे."

" उद्यां तुझा वाढदिवस अन् आज सांगते आहेस मला तूं... आणि वाढदिवस असा तुझ्या घरीं साजरा करण्याची पद्धत अगदींच साधी अन् अरसिक आहे. त्यापेक्षां असं करूं आपण; तूंच ये माझ्याकडे जेवायला. शॉपिंग करूं अन् संध्याकाळीं आईस्क्रीमचा कार्यक्रम करून रात्रीं शो पाहूं. तुला छानपैकीं कर्णभूषणें घेऊन देतों. तुझीं हीं जुनाट कुडीं मला मुळींच पसंत नाहींत. ठरला कार्यक्रम तुझ्या वाढदिवसाचा..."

" आईला फार वाईट वाटेल. विमल, सुमी,प्रभा एवढंसं तोंड करतील." प्रतिभेनं आज बोलायचं ठरवलं होतं. चन्द्रकांत थोडा वेळ गप्प राहिला आणि मग म्हणाला, " तुझ्या भावंडांकरितां आणि आईकरितां तूं माझा विरस करणार काय...!"

बिचारी प्रतिभा! नाइलाजानं तिनं चन्द्रकांताच्या बेताला संमति दिली, पण तो बेत पार पाडतांना तिला सारखी आईची अन् मुलांची आठवण होत होती. मनाच्या ओढाताणीचं प्रतिबिंब तिच्या चेहेऱ्यावर दिसूं लागलं. तेव्हां तिचा हात दाबून चन्द्रकांत तिला म्हणाला, " दमलीस प्रतिभा ? "

यानंतर तीन-चार दिवसांनींच चंद्रकांतनं पुन्हा ट्रिपचा कार्यक्रम आंखला. या वेळीं तरी सर्वांनीं मिळून जावं, अशी इच्छा प्रतिभेनं व्यक्त केली. पण चन्द्रकांतानं तिचं म्हणणं मान्य न करतां कांहीं तरी उडवाउडवी केली आणि प्रतिभेला एकटीलाच यावयास भाग पाडलं.

आतां आपल्या मनांतल्या शल्याचं स्पष्ट स्वरूप प्रतिभेच्या लक्षांत आलं. चंद्रकांताच्या सहवासांत आपण पूर्णांशानं सुखी कां होऊं शकत नव्हतों, याचा तिला आतां चांगलाच उलगडा झाला. चन्द्रकांताला फक्त प्रतिभा हवी होती. तिच्या नात्यागोत्याच्या, जिव्हाळ्याच्या माणसांचा संपर्कहि त्याला नको

होता हें उघड होतं. तिच्या माणसांबद्दल त्याला तिरस्कार वाटत होता. तो त्यांना झटकून टाकायला बघत होता. हें त्याच्या वागणुकीवरून सिद्ध होत होतं आणि त्याची ही वृत्ति प्रतिभेला जाचक वाटत होती. तिच्या सुखांत विघ्नं निर्माण करीत होती. कारण, प्रतिभेला आपल्या भावंडांबद्दल प्रेम वाटत होतं आणि वडील बहीण या नात्यानं आपण त्यांच्या सुखदुःखाची चेतां येईल तेवढी जबाबदारी घ्यायची, अशी तिची विचारसरणी होती. चन्द्रकांताशीं विवाह झाल्यानं आपल्याला आपलं कर्तव्य मुळींच करतां येणार नाहीं हें तिला स्पष्टच दिसत, होतं. दुकानांतली पसंत पडलेली वस्तु उचलून न्यावी,बाकीच्या वस्तूंची दखल घेण्याचं काय कारण? अशा व्यवहारी विचार-सरणीनं चन्द्रकांत भारला होता. प्रतिभा सुंदर होती–हुषार, चलाख होती, चन्द्रकांताच्या मनांत भरली होती. आपल्या रुबाबाच्या, श्रीमंतीच्या जोरावर तो तिला जिंकूं पाहात होता. तिचीं भावंडं, तिची आई, तिचं कर्तव्य या गोष्टींशीं त्याचा कांहीं संबंध येत नव्हता-संबंध ठेवण्याची त्याची इच्छा नव्हती.

प्रतिभा सारखी विचार करीत होती. कांहीं तरी निर्णय घेणं आवश्यक होतं. तिचे आणि चन्द्रकांताचे संबंध आतां असेच चालूं ठेवणं अशक्य होतं. त्याच्या सहवासानं तिला निर्मळ आनंद होत नव्हता. तो कितीहि श्रीमंत असला तरी त्याची मनोवृत्ति आकुंचित होती याचा तिला प्रत्यय आला होता. त्याच्या या वृत्तीचा तिला मनापासून तिटकारा वाटत होता. अशा स्थितींत त्याच्याशीं लग्न करून तिला मुळींच सुख झालें नसतें. कारण चन्द्रकांताचं प्रेम स्वार्थी होतं. स्वतःला आवडली म्हणूनच केवळ प्रतिभा त्याला हवी होती. आपल्याला आवडलेल्या या मुलीला तिचं स्वतःचं व्यक्तित्व असूं शकेल असा विचार करण्याइतकं त्याचं मन मोठं नव्हतं.

"छे:!" प्रतिभा मनाशीं म्हणाली, "चन्द्रकांताचा मोह मला सोडला पाहिजे. माझ्या परिस्थितीशीं, अडचणींशीं आणि सुखदुःखांशीं समरस होणाऱ्या तरुणाशींच मी विवाहबद्ध होईन."

संध्याकाळीं पांच वाजायला आले, तरी प्रतिभा स्वस्थच बसलेली पाहून गोदूताईना आश्चर्य वाटलं. त्या तिच्या खोलींत जाऊन बसतात तोंच–तिनं चन्द्रकांतानं दिलेल्या पातळाचं एक पुडकं केलं होतं आणि त्यावर एक

पाकीट ठेवलं होतं, त्यांकडे पाहून–गोदूताई आश्चर्यानं "म्हणाल्या, हें काय, आज तुला जायचं नाहीं का ? चन्द्रकांत वाट बघतील ना...?"

कांहीं न बोलतां प्रतिभेनं पाकिटांतलं पत्र काढून आईच्या हातीं दिलं. गोदूताई वाचूं लागल्या," चंद्रकांत, इतक्या दिवसांच्या आपल्या परिचयांतून एक गोष्ट निष्पन्न झाली, कीं वेगवेगळ्या पातळींवरच्या माणसांनीं एकत्र येण्याचा अट्टाहास करूं नये, कारण तीं परस्पराशीं एकजीव होऊं शकत नाहींत. वरच्या थरांतील व्यक्तीला दुसऱ्याच्या जीवनाशीं समरस होतां येत नाहीं. त्याचे प्रश्न समजून घेतां येत नाहींत आणि मग त्या दोन व्यक्तींच्या जीवनांत संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून आजपर्यंत घडलेल्या सर्व घटनांचा पूर्णपणें विचार करून मीं शेवटचा निर्णय घेतला आहे,कीं आपला विवाह उभयतांना सुखकारक होणार नाहीं."

" हें काय प्रतिभा ! इतका सुंदर, संपन्न नवरा चालून आला असतां त्याला नकार दिलास. काय म्हणावं या तुझ्या मुलखावेगळ्या करणीला—!"

" असूं दे मी मुलखावेगळी..." असं म्हणून प्रतिभेनं आईच्या छातीवर आपलं मस्तक टेकलं.

● ● ●

जावें त्याच्या वंशा ५

प्रभावतीनं ओसरीवर पाऊल टाकलं तें अगदीं भीतभीतच. त्या वेळीं तिची छाती विलक्षण धडधडत होती आणि अतिशय जलद चालून आल्यामुळं तिला दम लागला होता; पण तशाहि स्थितींत प्रभावतीनं आपल्या पावलांचा आवाज होऊं न देण्याची खबरदारी घेतली. पायऱ्या चढून ओटीवर आल्यावर तिनं सर्वत्र नजर टाकली.

ओसरीवर कुणीहि नव्हतं. मध्यावर ठेवलेली समई शांतपणानं जळत होती. बालाजीच्या तसबिरीला घातलेल्या पुष्पहाराचा घमघमाट सुटला होता. त्यावरून शुक्रवारची पूजा उरकून दिवाणजी घरीं गेल्याचं दिसत होतं. माजघराच्या दाराशीं चपला काढून ठेवतां ठेवतां प्रभावतीनं कानोसा घेतल्यासारखं केलं. आजोबा देवघरांत असावेत असा तिनं तर्क केला आणि आपल्या खोलीकडं जाण्यासाठीं जिन्यावर पाऊल टाकलं. ती दोन पायऱ्या चढली असेल, तोंच कुणीसं बोलल्याचा आवाज तिच्या कानीं पडला.पायरीवर तसंच थबकून तिनं आवाजाच्या दिशेकडे कान लावले. तिचे आजोबा आजीला म्हणत होते, "आजहि प्रभाला उशीर झाला आहे काय...? दिसत नाहीं कुठं...तिच्या खोलींत जाऊन तरी बघ..."

आजीची चाहूल लागतांच प्रभा चटकन् वर पळाली आणि पुस्तकं टेबलावर फेकून देऊन कॉटवर पडली. उशीखालची मेंथालची बाटली काढून तिनं भराभर मेंथॉल डोक्याला चोळलं. तेवढ्यांत आजी वर आल्या आणि दिवा लावून म्हणाल्या, "का ग पोरी, बरं नाहीं का तुला ? आलीस तरी केव्हां

घरीं . . मी म्हणतें अजून आलीच नाहीं वाटतं...! मला सांगून तरी यायचं वर."

" फार डोकं दुखत होतं ग...अन् माझ्याबरोबर कुसुम आली होती. तिला माझं एक पुस्तक हवं होतं, म्हणून तशीच वर आलें."

" फार डोकं दुखत होतं का ग..."आजींनीं प्रभेच्या डोक्यावर हात ठेवीत विचारलं. त्यांच्या आवाजांत काळजी स्पष्ट दिसून येत होती. आजींचा हात चटकन् पण हळूच बाजूला करीत प्रभा म्हणाली, " काल रात्रीं बराच वेळ वाचीत बसलें होतें, म्हणून दुखत असेल झालं.सकाळींच थोडंसं दुखत होतं."

"हो का...? मग कॉलेजांत कशाला गेलीस पोरी...? जायचं नव्हतं. एवढा कुणाचा जोरा आहे तुला शिक्षणाचा...! तुझ्या जिवाला विरंगुळा न् तुझाच नाद म्हणून तुला घातली कालीजांत; पण तूं असा त्रास नको बाई करून घेऊं जिवाला..."

" नाहीं ग आजी, अभ्यासाचं पुस्तक नव्हतें वाचीत. असंच होतं एक गंमतीचं..."

" बरं, तुला चांगला सुंठीचा चहा करून देतें म्हणजे बरं वाटेल. खालींच चल..."

" तूं हो पुढं, मी आलेंच..." आजी खालीं जातांच प्रभा उठून बसली. हातरुमालानं कपाळावरचं मेंथॉल तिनं जोरजोरानं पुसून टाकलं आणि कंगवा हातांत घेऊन ती आरशापुढं उभी राहिली. कंगवा केसांतून फिरवीत असतांना तिच्या मनांत आलं," कुठलं डोकं दुखतं आहे ? माझ्या चेहेऱ्यावर वेदनांच्या छटा यत्किंचित् तरी दिसताहेत का...? उलट मोहनच्या गोड बोलण्याच्या स्मृतीनं माझं मुख जास्तच प्रफुल्लित दिसतं आहे." केस साफ करतां करतां प्रभाचं मन मोहनच्या आठवणींत गुंगून गेलं.

त्या दिवशीं संध्याकाळीं मोहन आणि प्रभा उठून बगीच्याच्या बाहेर आलीं. त्या वेळीं बगीच्याच्या मध्यावर असलेल्या घडघाळांत आठाचे ठोके खणखणले आणि लटक्या रुसव्यानं ती म्हणाली, " मी उद्यां येणार नाहीं बरं कां ! "

तिचा हात धरण्याचा प्रयत्न करीत मोहननं विचारलं, " कां बुवा आम्हांला ही शिक्षा ? आम्ही काय गुन्हा केला आहे तुमचा...?"

" तुमचा गुन्हा फारच मोठा आहे. आपल्या गोड गोड बोलण्यानं तुम्ही

मला गुंगवून टाकतां, अन् मग मला वेळाचं मुळीं भान उरतच नाहीं. बघा, आतां आठ वाजले ना?—"

"बस्स्...! आठच वाजले...! इतक्यांत चाललीस तूं...चल आणखी बसूं थोडा वेळ."

"तर तर...! तुम्हांला काय होतं...! तुम्ही आरामांत जाऊन पडाल आपल्या खोलींत."

"साफ चूक. आरामांत कसला पडतों. उलट तुझ्या वियोगानं तळमळत पडतों. शेवटीं तुझीं बोलणीं, तुझं हसणं, तुझ्या हाताचा हा नाजूक स्पर्श आठवून आठवून कशीबशी माझ्या तळमळणाऱ्या मनाची समजूत करतों..."

"पाहा लागलांत पुन्हा गोड बोलून माझा वेळ घ्यायला-! उशीर झाला तर आजोबा मला घरांत घ्यायचे नाहींत..."

"न घेईनात. माझ्या घराचं दार तर सतत उघडं आहे ना तुझ्या स्वागताला. चल अशीच, येतेस का...?" मोहननं प्रभेचा हात अगदीं घट्ट धरला होता. तो सोडवून घेऊन आपल्या घराकडं वळतांना प्रभेला केवढा मनोनिग्रह करावा लागला होता.

गोड स्मृतींत गुंगून जाऊन प्रभा खालीं जायचं विसरूनच गेली. अशांतच आजीनं तिला हाक मारली. कंगवा टेबलावर टाकून प्रभा खालीं जायला निघाली. तितक्यांत टपकन् तिच्या गळ्यापासून कांहींसं खालीं पडलं.चमकून प्रभेनं खालीं वांकून पाहिलं. टपोरं गुलाबाचं फूल-टपोरं कसलं-मघां मोहननं दिलं, तेव्हां टपोरं होतें. पोलक्यांत दडवून ठेवल्यानं तें बिचारं चुरगळून गेलं होतं. "आपण तरी काय मूर्ख...! नुसतं फूल पाहून का आजीला आपल्या प्रेमाची शंका येणार होती? छे: ! आजी अगदीं भोळी आहे. किती चटकन् समजूत पटली तिची. पण आपण आजीला फसवतों, हें बरं करतों का...?"

आणि मग खालीं गेल्यावर आजीच्या हातचा चहा पितांना देखील आजीशीं लबाडी करावी लागल्याचा खेद तिच्या मनांत रेंगाळत होता. कारण आजोबा-आजीवर तिची भारी माया होती व आपल्यावरहि त्या दोघांची अमर्याद ममता आहे याची तिला खात्री होती. आतांपर्यंतचं तिचं सारं आयुष्य त्याच घरांत गेलं होतं आणि तिला समजूं लागल्यापासून आजोबा

व आजी या दोन व्यक्ति प्रामुख्यानं तिच्या सहवासांत आलेल्या होत्या. वडील म्हणजे काय याची तिला मुळींच जाणीव नव्हती. लहानपणीं आणि आतां जाणीव झाली असली, तरी स्वानुभवाच्या अभावीं त्याची गोडी कळणं तिला अशक्य होतं. प्रभावतीचं लग्न होईपर्यंत तिची आई होती. परंतु प्रभावतीचा जन्म व्हायला आणि तिचे वडील स्वर्गवासी व्हायला एकच गांठ पडल्यानं कीं काय प्रभेच्या आईचं आपल्या लेकीकडं मुळींच लक्ष नव्हतं. एखाद्या विरक्त तपस्विनीप्रमाणं तिचा जीवनक्रम होता. संसारांतले सारे मोहपाश तोडून टाकावयाचा तिचा प्रयत्न चाललेला असे. प्रभावतीसारख्या गोड पोरीमुळं कदाचित् आपण पुन्हा या ऐहिक जीवनांत गुरफटलों जाऊं कीं, काय अशी तिला भीति वाटत असे; जणूं कांहीं...! म्हणून तिचा त्या पोरीपासून दूर राहावयाचा सतत प्रयत्न चालूं असे. पुष्कळ वेळां प्रभेच्या सुंदर मुखाकडं पाहून तिनं दीर्घ सुस्कारे सोडावेत. जणूं त्या सुस्कार्‍या-वाटें ती दर्शवी "काय करायचंय् तुझं गोडं रूप घेऊन–तुझा पायगुण कुठं चांगला ठरला...?" प्रभावती तीन चार वर्षांची होऊन आपल्या मोहक बालक्रीडांनीं सर्वांना सुखवूं लागली, तरीहि तिच्या आईची दुर्मुखलेली कळी कधीं उमललेली नाहीं. तिचं वर्तन पाहून प्रभावतीची आजी चिडून म्हणे, "तुझं मुलखावेगळं दुःखं बाई ...! अशी सोन्यासरखी पोर लाभली आहे तुला, तिच्याकडं पाहून आपलं दुःख विसरायचं का असंच पिचत बसायचं–बरं बाई...! ती माझीच पोर आहे असं मी समजतें—" आणि त्याप्रमाणंच आजोबा–आजींनीं प्रभेला पोटच्या पोरीइतकंच कौतुकानं वागवलं होतं. त्यामुळंच प्रभेला आपल्या आईचं तुटक आणि ममताहीन वर्तन फारसं जाणवत नसे. पुढं प्रभेचं चौदाव्या वर्षींच लग्न झालं आणि दोन वर्षांतच तिला वैधव्य प्राप्त झालं. त्या दुःखानं प्रभाची आई वारली. परंतु आजीच्या निस्सीम प्रेमाची पांखर असल्यानं तिला पोरकं वाटलं नाहीं. आजी हीच तिची आई होती. तिचं विसाव्याचं स्थान आजीच होती. सारे हट्ट करायचे ते आजीजवळ. मनचं सारं गुज उकलं जायचं तें आजीजवळ.

आतां त्याच आजीजवळ. प्रतारणा करायची वेळ आली होती तिला. त्यावद्दल प्रभेला भारी वाईट वाटत होतं. पण ती तरी काय करणार ? नाहीं तरी ती आजीला असं का सांगणार होती..." आजी, तुझ्या सांगण्याप्रमाणं

मी कॉलेजांत फक्त विद्यार्जनासाठींच जात होतें. कधीं कुणाशीं बोललें नाहीं, कीं कुणाकडं फारसं पाहिलंहि नाहीं. पण कुठून तो दिवस उगवला कुणास ठाऊक ! आणि काय झालं तेंहि मला नीटसं सांगतां यायचं नाहीं. पण ते लबाड डोळे माझ्या डोळ्यांना भिडले आणि त्यांनीं माझ्या मनांत काय उलथापालथ केली, तें तुला सांगून समजायचं नाहीं. त्या दिवसापासून पुस्तकावर खिळलेले डोळे अभावितपणं वर उचलले जातात आणि पुन्हा तीच नजर मला शोधीत आहेसं मला दिसतं. त्या नजरेंतून मला एक गोड संदेश मिळतो. असं पुष्कळ दिवस चालल्यावर त्या डोळ्यांनीं माझा गोंधळ ओळखला, मला एकीकडं गाठलं आणि माझ्या अंतःकरणाचा ताबा घेतला व कसल्यातरी विलक्षण जादूनं मला भारून टाकलं. त्या व्यक्तीच्या सहवासांत आणि संभाषणानं अशीं कांहीं नवनवीन गोडगोड गुपितं माझ्या मनांत निर्माण होतात. तीं तुला सांगणं अगदीं अशक्य आहे आणि तुला तीं उलगडायचीं पण नाहींत. या नवीन सुखाच्या मधुर जाणिवेनं माझं जीवन पालवलं आहे. माझ्या आयुष्यांत वसंताचं आगमन झालं आहे, त्यांच्याशीं बोलत बसलें कीं मला वेळेचं भानच उरत नाहीं. आजहि आम्ही दोघं गप्पांत रंगलों अन् मला घरीं यायला उशीर झाला. खरंच ...! आजी, ते फारच चांगले आहेत ग..." हें सारं पुराण का सांगणार होती आजीला...? अन् सांगितलं असतं तर ...

अरे बापरे...! कल्पनाच करायला पाहिजे काय होईल त्याची. सनातनी मनाचीं वृद्ध माणसं दुसरं काय करणार...? प्रभेचं कॉलेज एकदम बंद झालं असतं आणि आजीच्या बरोबर कथा-पुराणांना जाण्याची सक्ति झाली असती तिच्यावर. तुळशीला प्रदक्षिणा घालून दासबोध वाचायची तालीम तिला आजोबांच्या सक्त नजरेखालीं करावी लागली असती. कालिदास, शेक्सपीअर यांच्या काव्यमय ग्रंथांऐवजीं शिवलीलामृताचे अध्याय पठण करावे लागले असते. कारण, आजोबांनीं प्रभेला कॉलेजांत घातलं होतं, तें किती मिनतवारीनं. काय त्या अटी आणि कोण तीं बंधनं...! "प्रभेनं कोणाशीं बोलतां कामा नये, ओळख करून घेतां कामा नये, गॅदरिंग फिदरिंग असल्या हजार भानगडी कॉलेजांत चालतात त्यांच्या मोहांत पडायचं नाहीं."

प्रभेच्या मृत पतीची व तिच्या सासरच्या माणसांची इच्छा होती प्रभेला शिकवण्याची; म्हणून आजोबांचा नाइलाज झाला होता. पतीच्या गोड

प्रेमचेष्टांचा व आडून केलेल्या लपंडावांचा अर्थ जेमतेम तिला कळूं लागला न लागला तोंच तिच्या कपाळीं वैधव्य आलं. त्या चौदा पंधरा वर्षांच्या पोरीला पोथ्या-पुराणांत घालण्याची कल्पना आजोबा आजींच्या सनातन मनालासुद्धां कशीशीच वाटली असावी. बरोबरीच्या पोरींत आणि अभ्यासांत प्रभा आपलं दुःख तेव्हांच विसरेल, अशा हिशेबानं आजोबांनीं तिला शाळेंत घातली होती. आपल्यावर कोसळलेल्या संकटाचं गांभीर्य कळण्याइतकं प्रभेचं वय मोठं नसल्यानं शाळेंतील वातावरणांशीं ती तेव्हांच समरस झाली. तिचा शिक्षणक्रम सुरळीत चालूं झाला तो इंटरपर्यंत. आणि आतां...

आतां अगदीं अकल्पितपणानं तिच्या जीवनक्रमांत बदल झाला होता. त्या फेरबदलाचा तिला स्वतःला अतिशय आनंद झाला होता, प्रीतीचा मादक अनुभव कोणाला नकोसा वाटला आहे...? आपल्या वांट्याला हें सुख येईल, याची प्रभेला अगदीं कल्पना नव्हती, किंवा तें सुख आपल्याला वर्ज्य आहे, असंच ती समजत होती आणि एखाद्या विरागी स्त्रीप्रमाणं आयुष्य घालवीत होती. पण तिचं नाजूक सौंदर्य, करुण मुद्रा आणि शांत व संयमशील आणि सौजन्यपूर्ण वागणूक यांचं आकर्षण जबरदस्त होतं. तिच्या गुणांची मोहिनी मोहनवर पडली आणि मोहनच्या व्यक्तित्वाच्या प्रभावामुळं प्रभाहि त्याच्या प्रीतिजालांत गुरफटली. महिना दोन महिने त्या दोघांच्या परस्परांशीं नुसता लपंडाव चालला होता. शेवटीं तो लपंडाव संपला. त्या दोघांनीं परस्परांना प्रीतीची कबुली दिली आणि दोघेंहि आपल्या भावी संसाराचीं व सुखी आयुष्याचीं चित्रं रंगवण्यांत दंग होऊं लागलीं.

परंतु त्यामुळंच प्रभेला आपल्या-आजोबा आजीशीं लपंडाव खेळावा लागत होता. हल्लीं तिला कधीं कधीं कॉलेजांतून घरीं यायला उशीर होतो, हें दोघांच्याहि मनांत येई, कांहींतरी सबब सांगून प्रभा वेळ मारून नेई.

पुढं पुढं मात्र प्रभेलाहि त्या लपंडावाचा अगदीं वीट येऊं लागला होता. त्यापासून तिला जितकं सुख होत होतं, त्यापेक्षां दुप्पट त्रास होत होता. कारण, मोहन कॉलेज सुटल्यावर हट्टानं तिला आपल्याबरोबर यायला भाग पाडी. त्याच्या सान्निध्यांत तिला विलक्षण सुख वाटे. पण तें सुख लुटीत असतांना एकीकडे तिचं मन विलक्षण घाबरून गेलेलं असे. तें सुख सोडून, वेळाकडं लक्ष ठेवून घरीं वेळेवर परतण्याची काळजी तिच्या जिवाला आंतल्या-

आंत बेचैन करीत. मोहनबरोबर गप्पा करतांना या बगीच्यांत आपल्याला कुणी पाहिलं, कीं काय या विचारानं ती कावरीबावरी होई. मोहनच्या सुखकर सहवासाचा, गोड चतुर संभाषणाचा मोह सोडून घरीं जावयाला निघतांना तिला फार संयम करावा लागे. घरीं गेल्यावर आपली प्रफुल्लित मुद्रा आजोबा-आजींपासून लपवितांना प्रभावतीची कोण त्रेधा उडे. घरांत वावरत असतांना मोहनच्या गोड आठवणीनं मनाचा समतोलपणा ढळूं न देण्याची तिला खबरदारी घ्यावी लागे. त्या सर्वांपेक्षांहि रात्रीं बिछान्यावर पडल्यानंतर आपल्या शरीराला आणि मनाला काय हवं तें समजल्यामुळं तिची विलक्षण तळमळ होई. त्यानं तिला फार शीण वाटे. मोहन भेटल्यावर तो आपल्या मनःस्थितीचं जें वर्णन करी, तें ऐकून एकीकडं त्याच्या प्रीतीची साक्ष पटण्याचा तिला आनंद होई, हें खरं असलं तरी त्याच्या या विकल स्थितीला आपण कारणीभूत आहोंत हें ध्यानांत येऊन तिच्या मनाचे हाल आणीकच वाढत. परस्परांवरील प्रीतीची साक्ष पटण्याला बराच काळ लोटून गेला होता, त्यामुळं चारपांच दिवसांच्या अंतरानं होणाऱ्या तासा दोन तासांच्या भेटीनं त्या दोघांचं समाधान होत नव्हतं. परस्परांच्या अखंड आणि पूर्ण सहवासाची त्यांना उत्कट ओढ लागली होती. एकमेकांना दूर ठेवतांना त्यांना कोण प्रयास पडत. या सर्व मानसिक कुचंबणेमुळं मोहन हल्लीं पुष्कळ वेळां चिडलेलाच असे.

आजहि प्रभेला येऊन ठराविक जागीं जाऊन बसल्यावर थोडा वेळ तो कांहींच बोलला नाहीं. प्रभेकडून दुसरीकडं नजर वळवून, जमिनीवरील गवताशीं कांहींतरी चाळा करीत, तो स्वस्थ बसला होता. त्याची मुद्रा त्रस्त दिसत होती. उंच कपाळावर आठ्या चढल्या होत्या. डोळ्यांतला हंसरा भाव आणि खोडकरपणा लोपल्यासारखा दिसत होता. थोडा वेळ प्रभाहि स्वस्थ बसली होती. पण त्याची स्तब्धता फार वेळ सहन करणं शक्य नव्हतं तिला. त्यामुळं थोड्याच वेळांत त्याचा हात हातांत घेत ती म्हणाली, "कां, आज बोलायचं नाहीं वाटतं...? मौनव्रत घेतलं आहे ?"

"बोलायचं काय रोज तेंच तेंच. आपल्या भावी जीवनाचीं नुसतीं स्वप्नं रंगवायचा कंटाळा आला आहे मला. कारण सत्यसृष्टींत तीं स्वप्नं उतरण्याची कांहींच संधि दिसत नाहीं. तूं तर नुसती आश्वासनावर झुलत आहेस मला."

" असं काय वरं बोलतां...! माझ्या प्रेमाची कशी खात्री देऊं मी...? "

" कांहीं नको व्हायला...खरं प्रेम असतं, तर इतके दिवस झाले, तरी अजून माझ्यापासून दूर राह्यला तयारच झालीस नसतीस..."

" तें माझ्या हातांत आहे का...? आजोबांची परवानगी...? "

" ती कधींच मिळायची नाहीं, मग तिची वाट बघण्यांत काय अर्थ आहे ? त्यांचं सनातनी मन कधींच वळायचं नाहीं, हें अगदीं उघड आहे. त्यापेक्षां आपल्या सुधाकरला सांगून मी सारी व्यवस्था करतों. तूं फक्त माझ्याकडं यायचं. साधा सुटसुटीत विवाहविधि करूं या. तुला कल्पना नाहीं प्रभा ! पण तुला माझ्या घराची, माझ्या सर्वस्वाची स्वामिनी बनवायला मी विलक्षण अधीर झालोंय्." मोहनच्या आवाजांतल्या भावविवशतेची व स्निग्धतेची जाणीव झाल्यानं प्रभाचं मन अगदीं गहिवरून गेलं. ती म्हणाली, " कल्पना नाहीं असं म्हणूं नको मोहन. तुम्ही अधीर झालां आहांत अन् तशीच, मी नाहीं का झालें...?"

" मग असा विलंब कां लावतेस...? स्पष्टच विचारतों तुला, आजोबांची परवानगी नसली, तर काय मोठंसं नुकसान होणार...? आर्थिक दृष्ट्या तुला कांहीं कमी पडेल, अशी तर भीति नाहीं वाटत ना तुला...?"

" छे:! कमी काय पडायचं आहे. अन् तुमचा आधार असल्यावर मी कोणत्याहि संकटाला तोंड द्यायला आनंदानं तयार होईन. "

" हें खरं ना...मग एकदम हो म्हण पाहूं. मी सारी व्यवस्था करतों. आणि आपण विवाहबद्ध होऊं या. या लपंडावाचा मला आतां वीट आला आहे, प्रभा ! प्रेमाची परिणति विवाहांत झाली पाहिजेच ना केव्हांतरी ? तुला पत्नी म्हणून माझ्या घरांत आल्याशिवाय माझ्या मनाचं मुळींच समाधान होणार नाहीं. अन् तसं होणार नसेल तर..."

मोहनच्या चढलेल्या आवाजानं प्रभा चांगलीच घाबरून गेली होती. तरी पण धीर करून तिनं विचारलं," तर काय...?"

" तर...तर काय...! नको,प्रभा! उगंच भलतंच वाईट-साईट कशाला माझ्या तोंडून वदवतेस? पण आतां उगीच माझा अंत पाहूं नकोस. " मोहन अगदीं निकरावर आलेला दिसत होता. त्याच्या मनाचा तोलहि सुटलेला होता. तेव्हां जास्त कांहीं बोलणं म्हणजे त्याला चिडवण्यासारखंच होतं;

म्हणून कांहीं न बोलतां प्रभा शांत राहिली, पण डोळ्यांत दाटलेले अश्रु कांहीं तिला आवरतां येईनात. तिचे अश्रु पाहून मोहन शांत झाला आणि तिच्याजवळ सरकून म्हणाला, " माफ कर प्रभा, पण किती धीर धरूं तूंच सांग. प्रत्येक गोष्टीला कांहीं सीमा ही आहेच ना...? तूं रोज म्हणतेस उद्यां विचारीन. तो उद्यां केव्हां उगवणार आहे कुणास ठाऊक...! त्यापेक्षां आपणच आपला निर्णय घेऊं या ना..."

प्रभा अगदीं काकुळतीनं म्हणाली, " मोहन, इतके दिवस थांबलास तसं आणखी थोडं थांब ना..."

"हं...! थोडं...! थोडं म्हणजे निराश होईपर्यंत..." मोहन पुटपुटला. प्रभेच्या अश्रूंनीं किंचित् नरमलेलं त्याचं मन पुन्हा कठोर झालं होतं. तिच्या आवाजांतल्या काकुळतीचा त्याच्या मनावर कांहींच परिणाम झाला नव्हता.

" तुला कधींच धीर होणार नाहीं. तूं आजोबांना विचारणार नाहींस, तुझं थोडं थां णं कधींच संपायचं नाहीं. आणि परस्परांसाठीं असंच झुरत बसावं लागणार आपल्याला. चल,नाहींतर मीच विचारतों तुझ्या आजोबांना."

" नको, नको. " प्रभा जणूं तिला नकळत बोलून गेली.

" मग आजपासून एका महिन्याची मुदत देतों तुला. आजोबांना विचारायला, मनाची तयारी करायला एवढा अवधि पुरे आहे. त्यांची परवानगी मिळाली तर ठीकच, नाहींतर तुला माझी आज्ञा मान्य करावी लागेल. जर तूं माझ्या प्लॅनप्रमाणं माझ्याशीं विवाहबद्ध व्हायला तयार झाली नाहींस, तर तुझं प्रेम खोटं आहे, असं मी समजेन. "

" किती कठोर झालां आहांत तुम्ही मोहन ! " प्रभेच्या नेत्रांतून पुन्हा घळघळ अश्रु वाहूं लागले. तिची विकलावस्था पाहून आतां मात्र मोहनचा ताळ्यावर आला. तिचे दोन्ही हात हातांत घेऊन मुग्ध स्वरांत तो म्हणाला " असं रडूं नको गडे प्रभा, तुझे अश्रु पाहून मला फार दुःख होतं आहे. तूंच मला कठोर बनवलंस ना...? तुझा वियोग मला सहन होत नाहीं आणि तूं तर आपलं मीलन लांबणीवर टाकते आहेस. मग मी जरा चिडलों तर तो माझा दोष आहे का...? चल, जाऊं या आतां आपण. "

बिचारी प्रभा...! तिला तरी कुठं विलंब सहन होत होता. ओठाशीं सुखाचा पेला आलेला होता. पण त्या पेल्याला ओठ लावून त्याचा घोट

घ्यायला ती घाबरत होती. आणखी किती दिवस हें गुपित दडवून ठेवायचं हा प्रश्न ती स्वतःला रोज विचारीत होती. मोहनबरोबर संभाषण करतांना निर्माण केलेली स्वप्नसृष्टि प्रत्यक्षांत आणायला ती काय कमी अधीर झाली होती...! ती आतां ऐन तारुण्यांत होती आणि तिच्या यौवनाचा पूर्ण विकास झालेला होता. साहजिकच नवतारुण्याचं चैतन्य तिला स्वस्थ राहूं देत नव्हतं. प्रीतीची तिला तहान लागली होती; ती पूर्ण झाली होती. पण त्या प्रीतीचा शेवट विवाहांत झाल्याशिवाय प्रेमसाफल्याचं समाधान लाभणं अशक्य होतं. त्यांतच आणखी मोहनच्या जिवाची तळमळ तिला दिसत होती. आजच्या त्याच्या निर्वाणीच्या बोलण्यानं तिचं मन थोडंसं दुखावलं होतं खरं! पण त्याबद्दल मोहनवर रागवायचा काय अधिकार होता तिला...? तिच्यावरील आत्यंतिक प्रेमामुळंच तो असं बोलला होता ना...! त्याच्या मनस्तापाला तीच कारणीभूत झाली होती ना?

"मग काय सांगावं का आजोबांना सारं...? माझ्या पुनर्विवाहाला संमति द्या, म्हणून त्यांना विनवावं काय...? पण छे!! आजोबांची संमति मिळणंच शक्य नाहीं. आज जवळ जवळ २०-२२ वर्षे आपण त्यांच्या सहवासांत आहोंत. त्यांचं सोवळं-ओवळं, सनातनी मत यांच्याशीं आपला पूर्ण परिचय आहे. आपलं लग्नसुद्धां त्यांनीं किती लबकर केलं, आणि वैधव्य प्राप्त झाल्यावर त्यांनीं स्वतःला दोष न देतां माझ्या खडतर नशिबाला दोष दिला. आपल्यावर आजोबा-आजींची एवढी माया...पण माझ्या हातचं पाणी कांहीं त्यांना चालत नाहीं. ते कसले आपल्या विवाहाला संमति देताहेत. आपल्यावर किती सक्त पहारा असतो त्यांचा. माझ्या न कळत ते माझ्या खोलीचा झाडा घेतात. अभ्यासाच्या पुस्तकाशिवाय दुसरीं पुस्तकं आपल्या टेबलावर दिसलीं, तर ते रागावतात. त्यांचं जपजाप्य, देवतार्चन, जुनं तें सोनं मानण्याची प्रवृत्ति यांत किंचितहि बदल झालेला आपल्याला कधीं दिसला नाहीं. आजी तर काय...आधींच अशिक्षित त्यांत आजोबांच्या तालमींत तयार झालेली. मग तिचं सोवळं-ओवळं अन् जुनाट विचारसरणी यांबद्दल बोलायलाच नको. त्या दोघांच्या आचारविचारांत प्रथम प्रथम आपल्याला कौतुक वाटे. पण आतां मात्र वाटत नाहीं. कॉलेजमध्यें पाऊल टाकल्यापासून आपला आजोबांच्या विचारप्रणालीवरचा विश्वास उडूं लागला आणि आतां तर त्याबद्दल तिरस्कार

वाटूं लागला आहे. पण तसं कांहीं बोलायची सोय नव्हती. कारण झालेल्या फेरबदलाची यत्किंचित् कल्पना जरी आली तरी ते आपलं कॉलेज बंद करतील. मग काय करणार...मोहनच्या म्हणण्याप्रमाणं गुपचूप विवाह करून टाकावा काय...?"

प्रभेचं सारं शरीर एकदम शहारून गेलं.

"काय गोंधळ करतील आजोबा, आपलं तोंडसुद्धां पाहणार नाहींत त्यापेक्षांहि त्यांच्या मनाला केवढा धक्का बसेल. मोहन नेहमीं म्हणतात मला कीं, "एवढी काय आजोबांना घाबरतेस? काय करतील? बोलणार नाहींत तुझ्याशीं, न बोलेनात–तुला कुठं तिथं राहायचं आहे? तुला यायचं माझ्या घरीं. तूं आपल्या नव्या संसारांत आणि आयुष्यांत इतकी रंगून जाशील कीं आजोबांच्या त्राग्याची तुला आठवणसुद्धां होणार नाहीं. थोडे दिवस गेले कीं, आजोबांची माया जागृत होईल. पुन्हा लवकरच आपण त्यांना एखादं पतवंड प्रेझेंट केलं कीं, संपलीच सारी आढी..."

मोहनच्या गोड बोलण्याच्या आठवणींत प्रभा मनांतल्या मनांत लाजली आणि क्षणभर तिचा त्रस्त चेहरा स्मितयुक्त दिसूं लागला. पण पुन्हा तिची विचारमालिका सुरू झाली." मोहनला काय लागतंय् असं म्हणायला? त्याची अन् आजोबा–आजींची ओळखसुद्धां नाहीं, त्यामुळं त्यांना नकळत विवाह उरकून घ्यायची कल्पना सोपी वाटते त्याला. पण माझ्या मनाच्या ओढाताणीची कल्पनाच करीत नाहीं तो. मायेचे पाश तटकन् तोडून टाकण्याइतके का सोपे आहेत...? ज्यांनीं मला लहानपणापासूनप्रेमानं आणि ममतेनं वाढविलं, माझं दुखलं खुपलं पाहिलं, माझ्या डोळ्यांत पाणी पाहून ज्यांचा जीव घाबरून जातो, त्या प्रेमळ जीवांना आपल्या सुखासाठीं दुखवणं इतकं सोपं आहे कां? आई-बापापेक्षांहि जास्त माया आहे, त्या दोघांची माझ्यावर...त्यांची मुळींच पर्वा न करण्याइतकी मी कठोर अन् कृतघ्न होऊं काय...? मोहनच्या मार्गांत कांहींच अडचणी नाहींत, त्यामुळं तो माझ्या अडचणींशीं समरस होऊं शकत नाहीं. त्यांना फक्त मी पाहिजे आहे. ज्यांना आपण इतके दिवस विसांवा मानलं, आपलं मायेचं छत्र म्हणून ज्यांच्याकडं पाहिलं तें एकदम झुगारून द्यायला मनाची तयारी कशी होणार...मला मोहनचा विश्वास आहे. त्यांच्या उत्कट प्रीतीची खात्री आहे, त्यांच्या सहवासांत माझं आयुष्य अत्यंत सुखाचं

होईल हें सारं खरं! ...पण त्या सुखाची एवढी मोठी किंमत द्यायला तयार व्हायचं का?... तयार व्हायचं...झालंच पाहिजे. कारण ज्या एका विशिष्ट मर्यादेंत स्त्री-पुरुष नुसत्या प्रेमाच्या कल्पनेनं परस्परांवर संतुष्ट असतात, त्या मर्यादेपर्यंत आपण येऊन पोंचलों आहोंत. ही मर्यादा जर आपण वेळेवर ओलांडली नाहीं, तर तें प्रेमहि एखादेवेळीं नाहींसं व्हायचं. मग काय...पण इतकं तडकाफडकी आपलं मन कसं तयार होणार...?"

विचारांच्या भरांत आपण आपल्या घराजवळ येऊन पोंचलों, हें प्रभेच्या लक्षांतसुद्धां आलं नाहीं. परंतु दाराशींच तिच्या घरांतून बाहेर पडलेल्या मैत्रिणीनं हटकल्यामुळं ती भानावर आली. ती ओसरीच्या पायऱ्या चढून माजघरांत जाणार तोंच आजोबांनीं तिला हाक मारली आणि ते म्हणाले, "आज बराच उशीर झाला आहे ताई तुला. आजहि प्रोफेसरांनीं जादा तास घेतला वाटतं ?"

प्रभा अतिशय घाबरली, कारण आजोबांच्या आवाजांतला उपरोध अगदीं स्पष्ट होता. तिनं घड्याळाकडं पाहिलं. सहा वाजून गेले होते. मोहनच्या क्षुब्ध वागणुकीनं तिच्याहि मनोवृत्ति क्षुब्ध झाल्या होत्या. त्यामुळं उशीर झाल्याचं कारण म्हणून एखादी सबब योजून ठेवण्याचं अवधान तिला राहिलं नाहीं. ती पुरती गोंधळून गेली होती. आजोबा पुढें म्हणाले, "प्रोफेसर रोजरोज असे जादा तास घ्यायला लागले, तर तुझं कॉलेज बंद करावं लागेल पोरी मला. तुझा एकटीचाच जादा तास घेतात वाटतं प्रोफेसर अन् तोहि बगीच्यांत. मघांशीं ती मालती आली होती. ती म्हणाली, "कधींच तास घेत नाहींत जास्त..."

बिचारी प्रभा थरथर कांपत होती. तिच्या तोंडून शब्द बाहेर फुटेना. कशीबशी तिनं माडी गांठली आणि बिछान्यावर अंग टाकून ती मुसमुसून रडूं लागली. तिच्या पाठोपाठ आजी वर येऊन म्हणाली, "काय करायचं मनांत आहे तुझ्या पोरी—आमच्या नांवाला काळिमा लावायचा का तुला?... आपलं जुनं नांव, लौकिकाचं घराणं! आमचा फार विश्वास होता तुझ्यावर तूं कांहीं भलतंसलतं करणार नाहींस म्हणून..."

"नको ग आजी कांहीतरी बोलूंस. भलतंसलतं कांहीं केलेलं नाहीं मी.

आणि तसं कांहीं माझ्या हातून व्हायचं पण नाहीं. ... जरा नुसतं कुठं बोललें एवढंच."

" तुझं कॉलेज बंद करतील ना हे..."

" आजी, तेवढं मात्र करूं नकोस हं...माझ्या जिवाचं तें एक मोठं समाधान आहे."

" हो, पण त्यांतूनच हे मोह निर्माण होतात ना ! म्हणून मोहाचं मूळच नाहींसं केलं पाहिजे. म्हण आहे ती उगीच कां...?"

" कांहीं म्हणीबिणी सांगूं नकोस आजी मला तूं ... एवढं माझं मन मला आवरतां आलं नाहीं, तर पुनर्विवाह करीन मी..."

" तूं पुनर्विवाह करणार, बोलतेस तरी काय पोरी... ! असं झालंय् का आपल्या घरांत...का बाई म्हातारपणीं आम्हांला हा मनस्ताप..."

आजी एकदम प्रभेपासून दूर झाल्या आणि धड् धड् जिना उतरून खालीं गेल्या. प्रभेनं दार लावून घेतलं, आणि ती खुर्चीवर बसली. जणूं कांहीं तिला आपल्या विचारांची जुळवाजुळव करावयाची होती. अखेर आजोबांना सारं समजलंच. जें सांगावयासाठीं आज जवळ जवळ महिनाभर ती आपल्या मनाला तयार करीत होती, ते शेवटीं न सांगतांच समजलं आणि त्याचा निकालहि लागला. जी थोडीबहुत आशा होती, ती खलास झाली. आतां तिच्या भोंवतीं निराशेचा अंधार पसरला होता. इतक्या म्हातारपणीं आजोबा आजींचं मन दुखवून स्वत:ला सुखी करण्याइतकं मनोधैर्य तिच्यांत नव्हतें. आणि तें सुख जरी तिनें मिळविलं असतं,तरी तें तिला पूर्ण वाटलं नसतं.कारण आजोबा-आजींच्या दु:खाचं शल्य तिच्या सुखांत सतत बोंचत राहिलं असतं. तिच्या मनांत आलं, " मोहनची निराशा होणार, अन् माझी तर फारच होणार. मोहनचं विशाल वक्षस्थल पाहिलं कीं मला वाटायचं, एक दिवस केव्हांतरी या भव्य वक्षावर आपलं मस्तक विसावतां येईल.त्याच्या उंच कपाळावर रुळणारे काळे कुरळे केस पाहिले कीं, माझ्या मनांत येई, एक दिवस आपण या केसांशीं खेळूं शकूं. त्यांच्या भरलेल्या पिळदार बाहूंच्या पाशांत पडायची कल्पना किती गोड वाटे."

प्रभेला एक प्रसंग आठवला...

त्या दिवशीं ती मोहनची खोली–खोली कसली ब्लॉक होता चांगला ! तो-पाह्यला गेली होती. इतकी अव्यवस्था माजली होती खोलींत. परटीचे कपडे कॉटवर तसेच टाकलेले होते. बूट, चपला, मोजे अस्ताव्यस्त पडलेले होते. टेबलावर वह्या, पुस्तकें उलथापालथी लोळत पडलीं होतीं. कांहीं सुटीं नाणीं अन् दोन नोटा उघडचावरच टाकलेलीं होतीं. तिला खुर्चीवर बसवून मोहन म्हणाला, " कशी काय आहे आमची...आपली म्हटलं पाहिजे नाहीं का...? जागा...?"

" छान आहे; पण अव्यवस्था कोण आहे या जागेंत ? त्यामुळं अर्धी शोभा कमी झाली आहे जागेची...इश्श्–! मला नाहीं आवडत बाई इतका पसारा." प्रभेनं बोलतां बोलतां खोलीचं निरीक्षण चालविलं होतं.

"खरं सांगायचं म्हणजे आवरणार होतों. सारा पसारा आज तुझ्या स्वागता-साठीं म्हणून; पण म्हटलं...असाच पडूं द्यावा. म्हणजे तरी तुला माझी आणि माझ्या जागेची दया येईल. तुला तितकंच लवकर यावंसं वाटेल या घरांत..."

प्रभेनं लाजून दुसरीकडं पाहिलं.हल्लीं मोहन वरचेवर असं सूचक बोलायचा. त्यांतून त्याची अधीरता व आतुरता प्रगट होत असल्यानं त्याच्या बोलण्यानं प्रभेच्या अंःकरणाला फार सुख होई. आतांहि त्याचं बोलणं ऐकत असतांना तिचं मन प्रसन्न होत होतं.

मोहन पुढं म्हणाला," ही जागा आतां तुझी वाट पाहते आहे. जेव्हां जेव्हां मी आवरायचं म्हणून ठरवतों, तेव्हां तेव्हां मला तुझी आठवण होते. अन् माझं मन लगेंच एक गोड चित्र रंगवूं लागतं. तूं माझी खोली आवरती आहेस, आणि मी पडल्या पडल्या तुझ्याशीं गप्पा मारतों आहें, किंवा तुला त्रास देतों आहें. तूं माझ्या गबाळेपणावर टीका करते आहेस. पण तुझे लबाड डोळे, हसरे ओठ आणि गालावरच्या खळचा मला गुप्त संदेश देताहेत कीं, त्या टीकेंत कौतुकाचाच अंश जास्त आहे. तेव्हां तुझं बोलणं मनावर घ्यायचं कांहींच कारण नाहीं. आतां तूंच बघ. असं सुखस्वप्न रंगवल्यावर पसारा आवरायचा मी विसरून गेलों, तर विशेष तें काय चुकलं ?"

आणखी एक सुखस्वप्न मोहन तिला सांगे. तो म्हणे ..." प्रभा, आणखी एक गोड स्वप्न सांगूं का तुला...? ऐक. सकाळीं नुकताच अरुणोदय झाला आहे. पांखरांचा किलबिलाट चालूं आहे. तूं माझ्याजवळून उठून चहाच्या तयारीला

लागली आहेस. तुझ्या हातांतल्या बांगड्याची किणकिण होती आहे. त्यांतच तुझ्या गुणगुणण्याचा अस्पष्ट मधुर आवाज मिसळतो आहे आणि मी मात्र उठायची वेळ झाली असूनहि त्या सुस्वर नादनिनादांत गुंगून तूं मला उठवायला येशील म्हणून वाट पाहतों आहे."

त्यावर हसून प्रभेनं म्हणावं, " आणखी नाहींत का कांहीं सुखस्वप्नं... ?"

" कितीतरी...नमुना म्हणून हीं दोन तीन सांगितलीं..."

" मग सांगा ना आणखी कांहीं..."

" छट्...! तीं अशीं नाहीं सांगायचीं...! तीं फारच गोड आहेत आणि खास राखून ठेवलीं आहेत, बिछान्यावर पडल्या पडल्या तुझ्या कानांत कुजबुजायसाठीं."

मोहनचं बोळणं ऐकून प्रभा इतकी लाजली होती कीं, तिनं जवळच्या झुडुपांत आपलं तोंड लपवलं होतं.

त्या सुखकर स्मृतींनीं प्रभेचं मन अतिशय हळहळलं..." आतां कसलीं सुखस्वप्नं आणि कसलं काव्यमय जीवन...!"

रात्रंदिवस विचार करून करून प्रभेचं मस्तक बधिर व्हायची वेळ आली. तिच्या त्राग्यांत भर म्हणून कीं काय आजोबांनीं तिला कॉलेजांत जायची बंदी केली होती. त्यांचं सनातनी मन मुळींच बदलत नव्हतं. दोघांनींहि प्रभेशीं जवळ जवळ अबोला धरलेला होता. ती आंतल्याआंत झुरत होती.

चार पांच दिवसांनीं मोहन स्वतःच आजोबांना भेटायला आला. पण आजोबांनीं त्याला स्पष्ट शब्दांत नकार दिला, एवढंच नव्हे, तर प्रभेला मोहांत पाडल्याबद्दल त्याची हवी तशी निर्भर्त्सना केली. आजोबांना भेटून गेल्यावर प्रभेच्या मैत्रिणीच्या हातीं मोहननं प्रभेला पत्र पाठविलं त्यानं लिहिलं होतं...

" प्रिय प्रभा,

तुझा धीर होणार नाहीं, म्हणून मीं स्वतःच हें धाडस केलं. मला माझ्या व्यक्तित्वाचा फार अभिमान होता आणि मला पाहिल्यावर तरी आजोबा एकदम नकार देणार नाहींत, अशी माझी खात्री होती. पण माझा हा आत्मविश्वास फोल ठरला. पण माझं मन पुरतं निराश झालं नाहीं. कारण तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तुझ्या प्रीतीच्या

निर्मलतेची मला खात्री पटलेली आहे. सनातनी विचारांच्या बुजगावण्यांना भिऊन तूं आपल्या प्रीतिपुष्पांचा चोळामोळा करणार नाहींस असं मला वाटतं. माझं सारं जीवन तुझ्यावर अवलंबून आहे; याची जाणीव ठेव आणि तुझा निश्चय ताबडतोब कळव—मी किती अधीर झालोंय्.

तुझाच,
मोहन.

तें पत्र वाचून प्रभेच्या जिवाची अतिशय कालवाकालव झाली. मोहनच्या जिवाची तळमळ पाहून तिला फार क्लेश झाले. त्याची आपल्यावरची अपार प्रीति जाणवल्यामुळं तिचं हृदय अगदीं भरून आलं. तिला वाटलं "असंच जावं आणि मोहनच्या जीवनाशीं एकरूप व्हावं..." किती वेळ तरी ती स्वस्त कॉटवर पडून अश्रु ढाळीत होती. त्या अश्रूवाटें ती नानाप्रकारच्या विचारांना व मनोविकारांना वाव देत होती. क्षणांत तिला स्वतःच्या दौर्बल्याचा असहायतेचा संताप येत होता, तर क्षणांत असा अमोल प्रेमाचा ठेवा लाभल्याबद्दल ती स्वतःला धन्य मानीत होती.

अशा मनःस्थितींत प्रभा किती दिवस पिचत राहिली असती कोण जाणे...? परंतु तिचे आजोबा एकाएकीं फार आजारी पडले. आपलं दुःख तात्पुरतं बाजूला ठेवून प्रभेला आपल्या मनाचा ओघ आजोबांकडं वळवावा लागला. एका दृष्टीनं तिला हायसं वाटलं. कारण मोहनच्या पत्राचं कांहींतरी उत्तर देणं भागच होतं तिला. परंतु आजोबांच्या आजाराची सबब तिला सांगतां आली.

आजोबांच्या आजाराचं स्वरूप जास्तच भीतिदायक होऊं लागलं. सर्वांचीं मनं काळजीनं व्याप्त झालीं. प्रत्येकजण आपापल्यापरीनं त्यांची शुश्रूषा करीत. पण आजोबांच्या दुखण्याचं पाऊल मागं पडेना. मृत्यूची छाया आजोबांच्या शरीरावर पडूं लागली आणि.....आणि अखेरीस मृत्यूचा विजयी झाला.

आजीच्या दुःखाला पारावार नव्हता. वयाच्या ७ व्या ८ व्या वर्षापासून तो आज साठी गांठीपर्यंत तिला ज्यांची सोबत होती, तो जीवनांतील सहप्रवासी आज अकस्मात् निघून गेला होता. आतां पुढं पाऊल कसं टाकायचं...? आतां जीवनांतला जोम संपला होता. उत्साह आटला होता. प्रवासाची गति

विभाग वा.वा.
क्रमांक १९११ ७७
नों. दि. 3-7-61

कमी होत होती आणि पावलं शिणून गेलीं होतीं. या वेळीं अधाराची अतिशयच जरुरी होती जिवाला; परंतु ऐन आणीबाणीच्या क्षणालाच आजी निराधार झाल्या होत्या. आजीचं सारं जीवन म्हणजे आजोबांची छाया होती. आजोबांच्या साऱ्या जीवनाचं प्रतिबिंब त्यांच्यांत पडलं होतं. मनाला विचार करावयाची संवय लागण्यापूर्वीच आजीचं जीवन आजोबांच्या जीवनाशीं निगडित झालं होतं आणि तो एकच आदर्श डोळ्यांसमोर असल्यानं त्या त्यांच्याशीं समरस झाल्या. आजी त्यांच्या जीवनाला गति देत होती आणि आंखून दिलेल्या मार्गावरून त्यांचा जीवनरथ चालला होता. पतीची इच्छा तीच आपली, पतीचें आज्ञा पालन करणं हेंच आपलं जीवन-कार्य, अशी त्यांची श्रद्धा होती. सारं तारुण्य आणि प्रौढपण अशा तऱ्हेनं घालवल्यावर आतां म्हातारपणीं त्यांत काय फरक पडणार होता? अलीकडं त्यांना वरचेवर वाटे. "फार वय झालं आपलं आतां...त्यांच्या अगोदर नेलं देवानं मला म्हणजे वरं होईल. त्यांच्या हातानं आपल्या जीवनाचा शेवट होण्यांतच सारं जीवनाचं सार्थक होईल. आतांपर्यंतचं आयुष्य त्यांच्या छायेखालीं घालवलं. त्यांच्या छायेंतच मला विलीन होऊं दे देवा–"

पण देवानं त्यांची ही विनवणी ऐकली नव्हती. त्यांचा जीवनाधारच त्यांनीं आधीं नेला आणि त्या मागं राहिल्या. सोसाट्याच्या वादळानं सारीं पानं फुलं झडून जाऊन नुसतं झाडाचं खोड शिल्लक राहावं, तसं त्यांना आपलं आयुष्य वाटूं लागलं. "आतां उरलेलं आयुष्य एकटीनं कसं घालवायचं? आधारावांचून पावलं कशीं टाकायची...?" हे प्रश्न त्यांना कुंठित करूं लागले.

एका काळोखाच्या कोपऱ्यांत आजी आडव्या झाल्या होत्या. त्यांच्या डोक्यांत काहूर माजलं होतं. "आतांपर्यंत आपण जगलों ते आपल्या पतीकरितां. आपल्याला स्वतंत्र अस्तित्वच नव्हतं. ते गेले, आतां कुणासाठीं जगायचं...? आपलं जीवनहि लवकर संपेल तर बरं होईल."

इतक्यांत प्रभा खोलींत आली. हातांतील चांदीचं भांडं आजीपुढं ठेवीत ती म्हणाली, "आजी, एवढा साबूदाणा तरी घे..."

प्रभेचा शब्द ऐकून आजी उठून बसल्या. प्रभेनं लोटीतलं पाणी फुल-पात्रांत ओतलं आणि पुन्हा म्हणाली, "हें घे पाणी, चूळ भर." आजींनी

कांहीं एक न बोलतां प्रभेचा हात धरला आणि त्या तिच्याकडे पाहूं लागल्या. तिच्याकडं पाहतांना जणूं त्यांच्या मनांतलीं कोडीं उलगडत होतीं, अनेक प्रश्नांना भराभर उत्तरं मिळत होतीं. आजींच्या त्या नजरेनं प्रभावती गोंधळून गेली. ती कांहीं बोलणार तोंच आजी म्हणाल्या " प्रभे, तुझे ते मोहनराव आहेत ना—त्यांना आधीं बोलावून आण पाहूं."

" म्हणजे...! प्रभा इतकी आश्चर्यचकित झाली होती कीं, आजीच्या पुढं केलेली लापशीची वशी तिनं चटकन् खालीं ठेवली.

" जा उठ, आधीं जा, शपथ आहे माझी म्हातारीची तुला...ते आल्याशिवाय मी कांहीं खाणार नाहीं."

" अग पण आजी. ते सध्यां कुठं आहेत, ते सुद्धां मला ठाऊक नाहीं. अन् कुठं जाऊं त्यांना बोलवायला मी..."

" तर...तुला त्यांचं घर ठाऊकच नसेल जसं कांहीं...अन् एवढ्या दोन अडीच महिन्यांत ते कुठं निघून जाणार आहेत? जा, जा आधीं."

प्रभेचा नाइलाज झाला. ती उठली आणि ओसरीवर येऊन तिनं वडचाळाकडं नजर टाकली. इतक्यांत दरवाजांत पावलें वाजलीं. प्रभेनं दरवाजाकडं नजर वळवली. काय आश्चर्य...!

मोहन दरवाजांत उभा होता. प्रभेला पाहतांच भरभर तिच्याजवळ येऊन तो म्हणाला, " प्रभा, आजोबा वारले ना ग...? फार वाईट झालं..."

प्रभा गहिंवरून म्हणाली, " आतां आम्हांला कसलाच आधार उरला नाहीं. आजीनं तर भलतंच लावून घेतलं आहे मनाला. चला घरांत. तिनं तुम्हांला बोलावलं आहे."

" मला...नको...मी नाहीं येत. त्यांना भलतंच कांहींतरी वाटेल..."

" नाहीं हो...खरंच तिनं तुम्हांला बोलवलं आहे..." प्रभा मोहनला आजीच्या खोलींत घेऊन गेली. " आजी, हे बघ मोहनराव आले आहेत."

" एवढ्यांत...! कुठं लपवून ठेवले होतेस कीं, काय...? माझी म्हातारीची इच्छा बळकट होती तर...! शतायुष्यी व्हा बरं...या असं पुढं या. मला भारी वाईट वाटतं मोहनराव! मागं आम्हीं तुमचा अपमान केला होता.

आम्ही आपली जुन्या विचाराचीं माणसं. पण, आतां माझे डोळे उघडले बरं...माझं इतकं वय झालं तरी त्यांच्या मागं एकटीनं जगायचं संकट पडलंय् मला...ते गेले..." आजींना दुःखाचा उमाळा आला. त्यांना आपले अश्रु आवरेनात. थोडा वेळ स्तब्ध राहून त्या पुन्हा म्हणाल्या, " आतां माझी चूक मला कळली. तरणीताठी पोर ही, हिनं आपलं आयुष्य कसं काढावं? मी पिकलं पान, उद्यां गळून पडेन, पण हिचं सारं आयुष्य पुढं आहे. म्हण आहे ना ' जावे त्याच्या वंशा तेव्हां कळे. ' तुम्ही प्रभेशीं लगीन करा अन् सुखानं संसार करा. माझा आशीर्वाद आहे तुम्हांला..."

प्रभा अन् मोहन यांनीं एकमेकांकडं पाहिलं. दोघांच्याहि डोळ्यांत अश्रु तरंगत होते; पण त्यांत दुःखाच्या खारटपणापेक्षां आनंदाची चमक जास्त होती.

● ● ●

त्रिकोण

६

आज कितीतरी दिवसांनीं मी या माझ्या आवडत्या आम्रवृक्षाच्या शीतल नि सुखकारक छायेंत येऊन आरामशीर पडलें आहे. उशाला मऊशी उशी घेतली आहे. आमचा हा छोटासा बंगला तर सुरेख आहेच, पण बंगल्या-भोंवतालची बागहि फारच छान आहे. आमचा गणू माळी बागेची मशागत फारच कसोशीनें करतो. मामंजींच्या वेळेपासून तो आमच्याकडे कामाला असल्यामुळें बागेवर त्याची फार माया आहे आणि पोटच्या पोरागत तो बागेंतल्या झाडांपेडांना जपतो. कुठल्या गुलाबाला कीड लागली आहे, कोणतें झाड वठून चाललें आहे, कोणत्या मोगऱ्याला पाणी कमी पडतें आहे इकडे त्याचें बारीक लक्ष असतें. त्यामुळें केव्हांहि पाहा, आमची बाग कशी टवटवीत आणि सतेज दिसते.

राणूइतकें जरी नाहीं तरी त्याच्या खालोखाल माझेंहि या बागेवर प्रेम आहे. राणूसारखें मीं बागेंत कष्ट करावयास तयार नसलें,तरी राणूला उत्तेजन द्यायला नि बागेच्या मशागतीला लागणारा खर्च करायला मी केव्हांहि तयार असतें. दुपारचा माझी विश्रांतीची जागा–एक पावसाळा सोडला तर–हें गर्द पर्णभारानं डंवरलेलं हें आंब्याचं झाडच आहे. माझ्या मैत्रिणी आल्या तरी इथंच आम्ही गप्पा मारीत बसतों. शिवण, विणकाम, वाचन इत्यादि गोष्टी-सुद्धां मी इथंच करतें. आतांसुद्धां एक पुस्तक पडलं आहे. तें मला उघडायची सुद्धां इच्छा नाहीं. इतका माझा जीव थकल्यासारखा झाला आहे. मोठ्या

आजारांतून उठल्यावर एखाद्या रोग्याची जशी अवस्था व्हावी, तशी माझी झाली आहे. निकराचा संग्राम करून विजयश्री मिळविलेला शूर शिपाई क्षणभर अगदीं शान्त व्हावा तशी शान्तता मला आली आहे. बऱ्याच दिवसांनीं लाभलेल्या सुखाचा, विश्रांतीचा मनमुराद आस्वाद घेण्यासाठीं जीव अगदीं आसुसलेला असावा; पण अतिश्रमानं सारीं गात्रं पेंगुळल्यामुळं सुखोपभोग घ्यायला सुद्धां असमर्थ व्हावीं, तसंच माझं झालं आहे ! श्रमाचं चीज झाल्यावरहि मनाला एक प्रकारची ग्लानि येते; हृदयांत एक तऱ्हेचा रितेपणा येतो. आनंदानं मन तुडुंब भरलेलं पण जबाबदारीच्या जाणिवेनं मोकळा झालेला असा दुहेरी चमत्कारिक अनुभव येतो ! एकीकडं माझं मन आनंदानं, उदात्त प्रेमभावनेनं भरून गेलं आहे; तर एकीकडं तो आनंद, ती प्रीतीची उदात्तता मिळविण्याकरितां कराव्या लागलेल्या धडपडीनं शीण आला आहे–गात्रं शिथिल झालीं आहेत. माथ्यावरचा भार हलका झाल्यानं सुटकेचा निःश्वास टाकीत असतांनाच इतके दिवस तो भार सहन केल्यानं झालेल्या त्रासाची जाणीवहि मनांत कुठंतरी सलते आहे. तरी पण भीतीच्या उन्मादापुढं त्या जाणिवेचं दुःख मला भासत नाहीं. प्रीतीची प्राप्ति करून घेण्याच्या या संग्रामांत मला झालेला शीण घालविण्याकरितांच मी माझ्या या आवडत्या वृक्षाच्या शीतल छायेखालीं येऊन बसलें आहे.

जेवणं–खाणं, आवरासावर आटोपली कीं, पुढच्या दाराला कडी घालून, राणूला घराकडं लक्ष द्यायला सांगून, त्यानं पसरलेल्या सतरंजीवर अलगद शरीर विसावायचं हा माझा नित्यक्रमच होता. गेले दोन–तीन महिने, पावसाळा नसतांना माझ्या या नित्यक्रमांत खंड पडला होता. ऐन वसंतऋतूंत मला माझ्या या आवडत्या आम्रवृक्षाची सांवली पारखी झाली होती. नुसता एवढाच बदल झाला होता असं नव्हे, साऱ्या जीवनाचीच सूत्रबद्धता नाहींशी झाली होती. आयुष्यक्रमांत उलथापालथ झाली होती. संथ चाललेल्या जीवनप्रवाहांत एकाएकी जोराच्या लाटा निर्माण झाल्या होत्या. शांत सृष्टि-सौंदर्यानं नटलेल्या वनराजींत एकाएकीं झंझावात उपटावा आणि त्यामुळं साऱ्या लतावेलींची नासधूस व्हावी, तसंच कांहींसं माझ्या आयुष्याचं झालं होतं. हिरव्यागार रानगवतावर बागडणाऱ्या हरिणशावकानं वादळाचं रौद्र स्वरूप पाहून क्षणभर गांगरून जावं, तशी माझ्या जीवनप्रवाहांत आलेल्या या

आकस्मिक अडथळचानं मी बावरलें होतें-गोंधळलें होतें. या अडथळचाशीं आपण कोणत्या प्रकारानं सामना द्यावा याचा निर्णय घेतांना माझ्या मनाचे फार हाल झाले होते. संकटाशीं झुंज द्यावी का मुकाटचानं माघार द्यावी अशी चलबिचल माझ्या मनांत सारखी चालली होती. जें आपलं नाहीं तें आपलं म्हणण्याचा अट्टाहास सोडून द्यावा,असं एक मन सांगत होतं,तर आंतला आवाज सांगत होता, " अशी दुबळी होऊं नकोस. तुला यश मिळालं नाहीं तरी यशासाठीं झगडल्याचं श्रेय तरी मिळेल."

आतां माझ्या मनाचा शीण हळूहळू नाहींसा होत चालला आहे. घडलेल्या घटनांचा मी आढावा घेऊं लागलें आहे. माझ्या वागणुकीचं मी सिंहावलोकन करतें आहे. गेल्या तीन-चार महिन्यांत घडलेल्या घडामोडींचा चित्रपट माझ्यासमोरून सरकतो आहे.

सुमारें साडेतीन महिन्यापूर्वी आयुष्यांतल्या या वादळाला सुरवात झाली.

विश्वासराव ऑफिसांतून यायचे होते. त्यांच्यासाठीं चहा-पोहे तयार करून मी त्यांची वाटच पाहात होते. घरांत पाऊल टाकल्याबरोबर विश्वासरावांना चहा नि खाद्यपदार्थ तयार लागतात. व्हरांड्याच्या पायऱ्या चढून ते सरळ बुटासकट स्वयंपाकघरांत डोकावतात आणि खाद्यपदार्थांच्या प्लेटस् टेबलावर दिसल्या कीं, खूप होऊन, कपडे उतरून, शीळ घालीत बाथरूममध्यें हातपाय धुवून शांतपणानं पदार्थांचा आस्वाद घेतात. त्यांची ही संवय चांगलीच परिचयाची असल्यानं मी नेहमीं चहा-फराळांचं जय्यत तयार ठेवतें. रोज विश्वासराव आधीं स्वयंपाकघरांत डोकावतात, म्हणून मी कांहीं त्यांच्या स्वागताला व्हरांड्यांत उभी राहात नाहीं. मी बाहेर दिसलें नाहीं म्हणजेच त्यांना बरं वाटतं आणि खाद्यपदार्थांच्या बशा बघून त्यांच्या मुद्रेवर जें स्मित उमटतं त्या स्मितहास्यानंच मी पण प्रसन्न होतें.

पण आज विश्वासरावांचीं पावलं स्वयंपाकघराकडं वळलीं नाहींत. ते सरळ माडीवर गेले. जिन्यावर झालेला बुटांचा आवाज ऐकून मला फार आश्चर्य वाटलं. काढून घेतलेली टी-कोझी पुन्हा केटलीवर घालून मी पण माडीवर गेले. विश्वासराव खिडकीशीं उभे होते, अंगावरचे कपडे तसेच होते. माझी चाहूल लागून त्यांनीं किंचित् हालचाल केली आणि मी कांहीं

विचारण्याच्या आंतच ते म्हणाले, "सरोज इथं आली आहे. आमच्या ऑफिसांत क्लार्क म्हणून लागली आहे."

—सरोज कोण तें मला माहीत होतं ! तिच्यावर विश्वासरावांचं प्रेम होतं. तिचंहि त्यांच्यावर होतं. पण त्यांना विवाह करतां आला नाहीं. त्यांच्या प्रीतीचा मीलनांत शेवट झाला नाहीं. काय कारण झालं कुणाला ठाऊक...! सरोज त्यांच्या आयुष्यांतून निघून गेली एवढं खरं. आईच्या आग्रहाखातर विश्वासराव लग्नाला उभे राहिले. लग्नाच्या आधीं त्यांनींच मला आपल्या विफल प्रेमाची कहाणी ऐकविली होती. ती सांगतांना त्यांचा गळा दाटून आला होता–डोळ्यांत अश्रुबिंदू तरळले होते. तें पाहून सरोजवर त्यांची किती गाढ प्रीति आहे, याची मला साक्ष पटली होती. तरीपण मी त्यांच्याशीं लग्न करायला तयार झालें होतें. कां तें आज मला नक्की सांगतां यायचं नाहीं. त्यांचा पोळलेला जीव आपण हळुवारपणानं थाऱ्यावर आणायला हवा, असं मला वाटलं कीं माझ्या संगतींत सरोजचा त्यांना विसर पडेल, अशी मला खात्री वाटली, का विश्वासरावांचा देखणेपणा, वैभव यांचा मोह मला सोडवेना, कुणास ठाऊक...! आपल्या नियोजित पतीचे एका मुलीवर प्रेम होतें, हें कळूनसुद्धां मी विवाहाला तयार झालें.

लग्न झाल्यावर तीन वर्षें खरं म्हणजे मी अगदीं सुखांत आहे. मला कांहीं कमी नाहीं. विश्वासराव मला प्रेमानं वागवितात. शक्य तों ते कधीं सरोजच्या प्रीतिविषयाचा उच्चार करीत नाहींत. तरी त्यांच्या त्या प्रेम–प्रकरणाची स्मृति माझ्या मनांत सदैव जागृत असे आणि मी वरचेवर स्वतःलाच प्रश्न करी, "विश्वासराव खरंच माझे आहेत...?"

तरीपण अलीकडं मला वाटूं लागलं होतं कीं, आतां विश्वासरावांच्या मनांतली सरोजची मूर्ति अंधुक होत चालली असावी. हळू हळू का होईना, सरोजच्या जागीं माझी प्रतिमा उमटूं लागेल. किती केलं तरी आज तीन वर्षें सतत मी त्यांच्या सहवासांत आहें. त्यांच्या सुखःदुखाची भागीदारीण आहें. तत्परतेनं पत्नीपदाची जबाबदारी पार पाडतें आहें. माझ्या या निष्ठेचं फळ मला मिळाल्याशिवाय कसं राहील...?

आशेचा किरण दिसूं लागतो न लागतो तोंच पुन्हा अंधारून यावं, तसं झालं. विश्वासरावांचं मन जिंकण्याची थोडीशी उमेद मी बाळगूं लागलें होतें.

इतक्यांत सरोजनं पुन्हा त्यांच्या आयुष्यांत प्रवेश केला. आतां अस्पष्ट होत चाललेलं तिचं स्मृति-चित्र पुन्हा सुस्पष्ट होणार होतं. दुबळे होत चाललेले प्रेमाचे धागे पुन्हा बळकट होण्याची धास्ती होती !

मनाचा तोल सांवरून वरकरणीं सतत-बोलत मी विश्वासरावांना खाऊं-पिऊं घातलं; पण मनांतल्या मनांत मी शिव्यांची लाखोली मोजली सरोजला; कारण तिच्या आगमनाच्या जाणिवेनं विश्वासराव बेचैन झालेले दिसत होते. तिच्या दर्शनानं त्यांच्या मनाची चलबिचल झाली आहे, हें माझ्या चांगलंच ध्यानांत आलं होतं. त्यांच्या त्या बेचैनीनं माझंही मन पार अस्वस्थ करून टाकलं. निरभ्र होऊं लागलेल्या नीलाकाशांत एखादं अशुभ नक्षत्र उगवावं, तशी ही सरोज माझ्या सुखी होऊं लागलेल्या संसारांत माती कालवायला आली होती ! माझ्या वैवाहिक जीवनांत आतां कोठें प्रणयाचे मधुर सूर भरूं लागले होते -आतां कोठें विश्वासराव माझ्यांशीं समरस होऊं लागत होते. तोंच त्यांच्या माझ्यांत अंतराय निर्माण होणार होता. नवीन जमिनींत लावलेल्या रोपट्यानं जीव धरूं लागावा, तोंच त्याच्या मुळावर कुणी घाव घालावा, तसंच झालं होतं !

-माझी भीति खरी ठरूं पाहात होती ! विश्वासराव आतां अनियमित होऊं लागले होते. कधीं त्यांना घरीं यायला उशीर होई तर कधीं वेळेवर येऊनहि ते पूर्वीप्रमाणं स्वयंपाकघरांत न डोकावतां परस्पर माडीवर निघून जात. जेवण्याखाण्यांतहि त्यांचं लक्ष नसे. हातांत पुस्तक असलं तरी नजर कुठंतरी शून्यांत लागलेली असावयाची.

त्यांना घरीं यायला उशीर झाला कीं माझा जीव वाळवंटात पडलेल्या माशासारखा तडफडूं लागे ! नाना प्रकारच्या शंका-कुशंकांनीं माझं मन भरून जाई विश्वासरावांशीं लग्न केल्याचा आतां मला पश्चात्ताप वाटूं लागला. त्यांचा आपल्या मनावर ताबा राहील अशी मला खात्री वाटेना. माझा तीन वर्षांचा सहवास त्यांना सरोजपासून दूर ठेवायला पुरेसा आहे, असं माझं मन मला सांगेना. त्यांना यायला उशीर झाला कीं, ते एखाद्या हॉटेलांत सरोजला घेऊन गले असतील, तेथें तीं दोघं मजेत गप्पा करीत असतील, नाहींतर गांवा-बाहेर निवांत जागीं बसून त्यांचं प्रेमाचं हितगुज चाललेलं असेल,अशा विचारानं मी वेडी होई. मला कांहीं सुचेनासं झालं होतं. कशांतच माझं मन लागत

नव्हतं. एखाद्या भरमिष्टासारखी माझी अवस्था झाली होती. दिनक्रमाची घडी पार विसकटून गेली होती. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं एकच विषय होता. विश्वासराव पुनः सरोजच्या प्रेमपाशांत गुंतत चालले आहेत, या विचारानं माझ्या मनाची पकड घेतली कीं मला वाटे "आधीं विश्वासरावांना या गोष्टीचा जाब विचारला पाहिजे. इतका वेळ ते कुठं आणि काय करीत असतात, हें कळून घेण्याचा हट्ट धरला पाहिजे. तुमचं प्रेम-प्रकरण तुम्हांला मार्गील अंकावरून पुढें चालूं करायचं असलं, तर आतां माझा अडथळा आहे. हें ध्यानांत ठेवा, असं बजावलं पाहिजे."

लगेच माझा विचार बदलून जाई आणि माझ्या मनांत येई, "कशाला हा संताप नि अट्टाहास...! जें काय चाललं आहे त्यांत विश्वासरावांची बिलकूल चूक नाहीं. त्यांनीं स्पष्ट शब्दांत आपलं खरं प्रेम सरोजवर असल्याचं सांगितलं आहे. ती त्यांच्या आयुष्यांत पुन्हा येण्याचा संभव आहे याचा मुळींच विचार न करतां मींच त्यांच्या गळ्यांत माळ घालण्याचा उतावीळपणा केला आहे. आतां सरोज, त्यांचं खरं प्रीतिस्थान पुन्हः त्यांना लाभत आहे आणि आपलं जीवन म्हणजे त्यांच्या मार्गांत एक अडगळ आहे! अशा वेळीं आपणच मुकाटचानं बाजूस सरणं हें श्रेयस्कर नव्हे का—?"

उलट-सुलट विचारांनीं माझं डोकं फिरायची वेळ आली! माझ्या डोक्यांत निरनिराळचा विचारांनीं काहूर उठवलेलं असलं, तरी मी विश्वासरावांना मात्र एका शब्दानंहि माझ्या भावनांची ओळख दिली नव्हती. त्यांच्या बाबतींतल्या माझ्या कर्तव्यांत मीं कसूर केली नव्हती. त्यांच्या वर्तनांतल्या फेरबदलाबद्दल, अनियमितपणाबद्दल माझ्या मनांत कांहीं शंका उद्भवल्या असतील, याचा त्यांना मीं सुगावाहि लागूं दिला नव्हता. काय चाललें आहे, याचा मी मनाशींच विचार करीत होतें. विश्वासराव मला दुरावताहेत याचं दुःख मानीत होतें.

काय करावं, काय नाहीं अशा अनिश्चित मनःस्थितींत असतांनाच एक दिवस ऑफिसला जायला कपडे करतांना विश्वासराव मला म्हणाले, "वसुमति, तुझी हरकत नसेल, तर सरोजला आज चहाला घेऊन येतों."

विश्वासरावांना देण्याकरितां मी टेबलाच्या खणांतून परीटघडीचा हात-रुमाल बाहेर काढीत होतें. दचकून मीं त्यांच्याकडं पाहिलं. ते बूट घालीत

होते म्हणून बरं, नाहींतर माझ्या मुद्रेवर उमटलेले विचित्र भाव त्यांच्या लक्षांत आले असते. विचारांची कितीहि गर्दी मनांत उसळली असली, तरी चटकन् कांहींतरी उत्तर द्यायलाच पाहिजे होतं. त्यांच्या हातांत रुमाल देत मीं म्हटलं, " इश्श्...! हरकत कसली, जरूर घेऊन यावं..."

विश्वासरावांची मोटार–सायकल रस्त्याला लागली अन् माझं मन मोकाट सुटलं. इतक्या प्रकारचे परस्परविरोधी विचार थैमान घालूं लागले कीं सुसंगत विचार करतां येणं अशक्य झालं. विश्वासरावांच्या वर्तनाचा अर्थच मला कळेना. खरोखर त्यांना माझ्या परवानगीची जरुरी वाटत होती का? का मला डिवचण्याचा हा एक डाव होता? सरोजला प्रत्यक्ष माझ्या घरांत आणून मी चिडलें, तर भांडण काढून माझी हकालपट्टी करायची असं तर त्यांनीं योजून ठेवलं नसेल ना ?

—तसं असेल तर मी कांहीं हा बेत सिद्धीला जाऊं देणार नाहीं. प्रेमानं आणि आस्थेनं असं तिचं स्वागत करते, कीं जणूं कांहीं सरोज कोण तें मला माहीतच नाहीं. विश्वासरावांच्यावर माझं फार प्रेम आहे. मला ते अतिशय आवडतात. मी त्यांना सुखासुखी सोडणार नाहीं. त्यांना माझे करण्यासाठीं मी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन.

असा विचार मनांत आल्याबरोबर मला आणखी एक कल्पना सुचली. खरंच...काय हरकत आहे आपण सरोजशीं प्रेमानं आणि स्नेहानं वागायला...! विश्वासरावांची ती पूर्वीची प्रेयसी आहे, म्हणून तिचा राग करण्याऐवजीं आणि विश्वासरावांनींहि तिच्यापासून दूर राहावं अशी अपेक्षा करण्याऐवजीं आपण तिच्याशीं स्नेहसंबंधाचें नातें जुळवावें. विश्वासरावांच्या व तिच्या विफल प्रेमकथेकडं असूयेनं न पाहतां सहानुभूतीच्या दृष्टिकोनानं बघावं त्यांचं प्रेम सफल झालं नाहीं म्हणून त्यांनीं परस्परांपासून कायमचं अलग व्हावं, अशी अपेक्षा करणं चुकीचं नव्हे का...? त्यांच्यांतले प्रीतीचे धागे तुटले असले, तरी मैत्रीचे प्रवाह वाहत राहिले म्हणून बिघडलं कुठं ? लांबून वाहात आलेल्या सुगंधलहरीनंसुद्धां मन सुखावतंच ना? प्रीतिवैफल्यानं दुखावलेलीं त्यांचीं मनं पुन्हा लाभलेल्या मैत्रीच्या जल-सिंचनानं थोडीशी तरी ओलावतील. त्यांचं दुःख हलकं होईल. आपल्याला चोरून–मारून कुठंतरी कसं तरी भेटून, त्यांनीं आपलीं भारावलेलीं मनं शांत करण्यापेक्षां आपणच

त्यांना उघड उघड संधि देऊन त्यांच्या सुखदुःखाचं भागीदार होणं चांगलं नव्हे का...?

हा विचार माझ्या मनांत आला मात्र! तो बळावतच गेला. माझ्या मस्तकांतील उलटसुलट विचारांना विशिष्ट वळण लागूं लागलें. वागणुकीची दिशा निश्चित ठरूं लागली, गोंधळ थांबल्यासारखा वाटूं लागला. मी चटकन् उठलें आणि घर आवरूं लागलें. सरोजचं मत माझ्याबद्दल अनुकूल झालं पाहिजे, असं मला वाटत होतं. विश्वासरावांचं वैवाहिक जीवन सुखी आहे, असा विश्वास मला तिच्यांत निर्माण करावयाचा होता. घर आवरून मी स्वयंपाकघरांत गेलें. फराळाची सिद्धता केली. मग मी स्वतःकडं लक्ष दिलं, जरा कसोशीनंच प्रसाधन केलं. विश्वासराव सरोजला घेऊन येतील; तेव्हां मी अगदीं प्रसन्न दिसलें पाहिजे, असं मीं मनाशीं ठरविलं होतं.

मोटर-सायकल वाजली. मी उत्सुकतेनं बाहेर गेलें. त्यांच्या पाठोपाठच सरोज सायकलवर आली. विश्वासरावाचं मन जिंकणारी सरोज एकदांची माझ्या दृष्टीस पडली. मीं कल्पना केली होती, तेवढी कांहीं ती देखणी नव्हती आणि ऑफिसांत दिवसभर काम करून परस्पर इकडं आल्यानं तिचा चेहरा सुकला होता. विश्वासरावांनीं आमची ओळख करून दिली. मीं तिचं स्वागत केलं. हॉलमध्यें बोलत बसून आम्हीं हंसत-बोलत चहा-फराळ केला. सरोज सारखी माझ्याकडे बघत होती. माझ्या आदरातिथ्याचं तिला आश्चर्य वाटलं असावंसं तिच्या चर्येवरून दिसत होतं. मी मात्र मनाशीं संकल्प केल्याप्रमाणं मुळींच न गोंधळतां एखाद्या मैत्रिणीशीं गप्पा माराव्यात, तशी मोकळेपणानं वागत होतें. ती जायला निघाली, तेव्हां मी तिला वरचेवर येण्याचा आग्रह करावयास विसरलें नाहीं.

हळूहळू सरोज आपण होऊनच आमच्या घरीं येऊं लागली. मी तिच्याशीं अगदीं मनमोकळेपणानं, खेळीमेळीनं वागत असे. शिवाय तिच्या देखत विश्वासरावांशींसुद्धां लाडिकपणानं वागत असे. विश्वासराव माझे आहेत, त्यांच्या प्रीतीविषयीं माझ्या मनांत कांहींच शंका नाहीं असं सरोजला दाखवण्याची एकहि संधि मी वायां घालवीत नसे. सरोज त्यांची पूर्वीची प्रेयसी असली, तरी आतां मला तिच्याविषयीं धास्ती बाळगण्याचं कांहीं कारण नाहीं, असा निर्धास्तपणाचा देखावा मी करीत असे. कधीं कधीं आम्ही

फिरायला अगर सिनेमालाहि जात असूं. एखादे वेळीं सरोज आमच्याकडेच जेवण करी.

वरवर दिसायला सारं ठीक चाललं होतं, पण याचा केव्हां तरी शेवट व्हायला पाहिजे होता. माझ्या मनांत कांहीं नाहीं, असं मी दाखवीत होतें; पण हें नाटक होतं—एक प्रयोग होता. प्रयोगाचा शेवट केव्हां तरी व्हायलाच पाहिजे होता. रोगबीज नष्ट व्हावं, म्हणून रोगी ऑपरेशनच्या दिव्यांतून जायला तयार होतो, तसंच माझं झालं होतं. परीक्षा पास होण्याकरितां विद्यार्थी कांहीं दिवस खूप झटून मेहेनत करतो, त्याप्रमाणं विश्वासरावांच्या प्रीतीला पात्र होण्याकरितां आंखलेली ही एक योजना होती. ही योजना दीर्घकाल लांबविणं शक्य नव्हतं आणि इष्टहि नव्हतं. इतका ताण मनाला सोसण्याजोगा नव्हता. या धडपडीत योजनेचा परिणाम अगदीं उलटा होण्याचा संभव होता. मीं जो हेतु मनाशीं धरून हें पाऊल टाकलें होतें तें सर्वस्वीं चुकून माझाच सत्यानाश होण्याचा संभव होता ! वरून शांतपणा दाखवून मी अंतर्यामीं चांगलीच जळत होतें. सरोज आणि विश्वास यांच्या हालचालींकडं माझं पुरं लक्ष असे. त्यांनीं सरोजला खाण्यापिण्याचा सिनेमाला चलण्याचा आग्रह केला, कीं मला राग येई. असूयेची लहर माझ्या मनांत उठे. वरवर मी त्यांच्या म्हणण्याला दुजोरा देई. हें नाटक होतं आणि त्यांतल्या माझ्या भूमिकेचा मला फार त्रास होत होता. घरांत माझ्यासमोर तीं दोघं मैत्रीचा देखावा करीत असलीं, तरी बाहेर त्यांच्यांत काय बोलणं-चालणं होतं, काय घडतं या शंकेनंहि मला बेजार केलं होतं ! अलीकडं विश्वासराव अफुल्लित आणि प्रसन्न दिसत, म्हणून तर ही शंका अधिकच दृढ झाली होती. काळजीनं आणि मनस्तापानं मी पुरी गांजून गेलें होतें !

त्या दिवशीं मी मैत्रिणीकडं जेवायला गेलें होतें. तिथून सिनेमाला जाऊन मग मी घरीं परतलें. अंगणांत मला सरोजची सायकल दिसली. मी चोर-पावलांनीं आंत गेलें. हॉलला लागून विश्वासरावांची स्टडीरूम होती, तिच्यांतून बोलण्याचा आवाज येत होता. पाऊल न वाजवितां मी दाराशीं जाऊन उभी राहिलें. सरोज स्फुंदत म्हणत होती,

"विश्वास ! किती परक्यासारखा वागतोस रे माझ्याशीं...? "

सरोज ! तुला आतां माझ्याकडून स्नेहापलीकडं कशाचीच अपेक्षा करतां यायची नाहीं. एका काळीं मी तुझ्यासाठीं झुरत होतों; तेव्हां तूं माझी निराशा केलीस."

" विश्वास, माझ्या अडचणी तुला माहीत होत्या. तुझ्याशीं लग्न न केल्याबद्दल आतां मला पश्चात्ताप होतो आहे रे..."

" त्या पश्चात्तापाचा आतां कांहीं उपयोग होणार नाहीं. मी वसुमतीशीं प्रतारणा करणार नाहीं."

विश्वासरावांचा आवाज निश्चयी होता. त्यांचं बोलणं ऐकून माझ्या अंगावर सुखाचे रोमांच उभे राहिले. आनंदातिशयानं मीं क्षणभर नेत्र मिटून घेतले. मला सरोजचा हुंदका ऐकूं आला, सरोज रडत होती. तिच्या अश्रूंनीं विश्वासराव विरघळणार तर नाहींत, अशी मला शंका आली. तेवढ्यांत खुर्ची सरकल्याचा आवाज आला. सरोज हातरुमालानं डोळे पुशीत खोली-बाहेर आली, नि जड पावलांनीं बंगल्याबाहेर पडली. माझ्याकडं तिचं लक्षच गेलं नाहीं. मी खोलींत शिरलें. विश्वासराव टक लावून दरवाजाकडं पाहात होते. त्यांची मुद्रा क्षुब्ध झाल्यासारखी दिसत होती. पुढं होऊन मीं हलकेच त्यांच्या खांद्यावर हात ठेवला आणि मृदु स्वरांत विचारलं, " काय झालं ? सरोज अशी रडत कां गेली ? "

चटकन् उत्तर न देतां विश्वासराव माझ्याकडं बघतच राहिले ! हळू हळू त्यांचा क्षोभ नाहींसा होऊन, त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसूं लागली, ते खुर्चीवरून उठले, त्यांनीं माझ्या कमरेभोंवतीं हात टाकला आणि मला कोचावर बसावयास नेलें. आज किती दिवसांनीं विश्वासरावांनीं मला जवळ घेतलं होतं. त्यांच्या प्रेमळ स्पर्शानं मी अगदीं बेभान झालें ! माझा हात आपल्या हातांत घेऊन विश्वासराव म्हणाले,

" वसु, मला क्षमा कर. तुझ्याशीं मी प्रतारणा करणार होतों, पण बचावलों..."

" क्षमा कसली करायची त्यांत...? पण तुम्ही काय म्हणता त्याचा अर्थ नाहीं कळला मला ! "

" सरोज आली त्या वेळीं मी अगदीं गोंधळून गेलों बघ. त्यांत ती मला रोज भेटूं लागली. विझत चाललेली माझी प्रेमज्योति पुन्हा प्रज्वलित होऊं

लागली. सरोजचें आकर्षण मनाला बेचैन करूं लागलं; अन् मग एक दुष्ट विचार माझ्या मनांत आला. मला वाटलं, सरोज माझ्या जीवनांत आली आहे, तिच्याबद्दलचे प्रेमभाव माझ्या मनांत निर्माण झाले आहेत,याची तुला जाणीव झाली कीं, तूं चिडशील, माझ्याशीं भांडशील, मला दोष देशील मग सरोजच्या आणि माझ्यामधील कांटा आपोआपच दूर होईल. मला भांडणाचं निमित्त सांपडेल. म्हणून मीं सरोजला घरीं आणलं, तिच्याशीं तुझ्यादेखत हसूं-खेळूं लागलों. हेतु हा कीं, तुझ्या मनांतला मत्सरभाव जागृत व्हावा; पण वसु, माझ्या अपेक्षेच्या विरुद्ध तुझं वर्तन दिसलं. सरोजच्या आणि माझ्या प्रेमसंबंधाकडं तूं त्राग्यानं, हेव्यानं न बघतां सहानभूतीनं बघितलंस. आमच्या भावना जाणल्यास. खरंच सांगतों वसु, तुझा हा दिलदारपणा पाहून मी तर अगदीं ओशाळून गेलों. तुझ्या समजूतदारपणानं मला लाजवलं माझ्या क्षुद्र विचारांबद्दल मी स्वतःशींच चिडलों. मला पश्चात्ताप झाला. आतां तूं माझ्या मनांत भरूं लागलीस. शेवटीं माझा निश्चय ठरला—"

"तो काय-? " मीं आतुरतेनं विचारलं.

" तुझा विश्वासघात करायचा नाहीं-तुला अंतर द्यायचं नाहीं. सरोजच्या बाबतींत तूं माझ्यावर विश्वास टाकलास, त्या विश्वासाला मी पात्र आहें, असं तुला दाखवून द्यायचं. वसु, इतके दिवस सरोजच्या प्रीतीच्या स्मृति मनांत रेंगाळत होत्या. तुला मी माझ्या संसारांत स्थान दिलं होतं. पण तुझी मूर्ति पूर्णतया ठसली नव्हती. आतां मात्र खात्री बाळग वसु, मी सर्वस्वी तुझा आहें. तूं मला जिकलं आहेस. "

विश्वासरावांनीं मला जवळ घेतलं. आणि माझं एक दीर्घ चुंबन घेतलं. त्या चुंबनांत माझ्या मनांतल्या साऱ्या शंका-कुशंका लयाला गेल्या. त्यांच्या प्रेमाची मला खात्री पटली.

जें होतं तें बऱ्याकरितांच होतं, असं म्हणतात. असल्या म्हणण्यावर मी कधींच विश्वास ठेवला नसता. पण आतां वाटतं, खरंच जें झालं तें माझ्या बऱ्याकरितांच झालं. वादळ होतं. त्या वादळांत जें जें रोगट, कुजट, दुर्बल असतं, त्या सर्वांचा नाश होतो आणि त्या ठिकाणीं नव्या जोमदार वस्तूंची प्रतिष्ठापना होते. जुन्या जगाचा लोप होऊन नवं जग उदयाला येतं. जोराच्या वृष्टीनंतर सृष्टीची मलिनता धुतली जाऊन तिचं पूर्वीचं रूप

जास्तच प्रसन्न नि टवटवीत दिसूं लागतं. सरोज आली, तिनं माझ्या संसारांत वादळ निर्माण केलं, पण आतां माझ्या वैवाहिक जीवनाचं सुंदर नि सुस्पष्ट असं रेखाचित्र माझ्या डोळ्यासमोर उभं आहे. लग्नानंतर तीन वर्षं मीं विश्वासरावांच्या सहवासांत काढलीं, पण त्या वेळीं माझं मन सतत साशंक असे. त्यांच्या प्रीतीबद्दल मला सदैव एक प्रकारची भीति वाटे. पतीच्या छायेखालीं पत्नीला लाभणारी सुरक्षितता मला कधींहि लाभली नव्हती.

—पण आतां ती लाभली आहे. मध्यंतरीं आलेल्या या संकटानं माझ्या जीवनाची घडी विसकटून टाकली. माझी मानसिक कुचंबणा केली. माझी केविलवाणी अवस्था करून टाकली. मनांत गांगरलें असलें,तरी मीं शांतपणा धरला, धीर सोडला नाहीं, म्हणून आजचा दिवस उगवला. आतां माझ्या संसाराचं स्वरूप खरं मनोहर झालं आहे. कारण, माझ्या आणि विश्वासरावांच्यामधलं अंतर आतां नाहींसं झालं आहे. निरभ्र आकाशासारखं माझं जीवन आतां शुद्ध झालं आहे. सारीं जळमटं, केरकचरा काढून शोभिवंत झालेल्या दिवाणखान्याप्रमाणं माझं हृदय आतां निःशंक बनलं आहे. वादळ आलं नि निघून गेलं. पण त्यानं मला विश्वासरावांच्या प्रेमाची खात्री पटविली. ते माझे आहेत, मी त्यांची आहें, असा विश्वास निर्माण झाल्यानं मन शांत झालं आहे. मंद वाऱ्याच्या झुळका येताहेत, त्याबरोबर आलेल्या विविध फुलांचा सुगंध जिवाला सुखवतो आहे, आंब्यांच्या झाडाच्या पानांची सळसळ मला एखाद्या गोड भावगीताप्रमाणं वाटत आहे. त्या भावगीताचे शब्द आहेत :

" विश्वासराव माझे आहेत, खरंच माझे आहेत ! "

● ● ●

दोनशें रुपयांची कथा

"एक पदार्थ धड झाला असेल तर शपथ!" जेवायला बसलेला श्रीनिवास म्हणाला, "आमटीला चव नाहीं. भाजींत मीठ जास्त झालंय्." तेवढ्यांत शारदेनं त्याच्या पानांत पोळी टाकली, ती उलगडीत तो पुढं म्हणाला, "आणि झालंय् तरी काय तुला–? पोळीला खग्रास ग्रहण लागलंय्. स्वयंपाक करायचा कंटाळा आला वाटतं?"

त्याचं बोलणं ऐकून कांहीं बोलायच्या ऐवजीं शारदा खुदकन् हसली. श्रीनिवासनं कुरकुर करीत जेवण कसंतरी संपवलं. नेहमीं जरा चूक काढली तर वादविवाद घालणारी शारदा आज मुकाट्यानं आपली टीका ऐकून घेते आहे, याचं मनाशीं आश्चर्य करीत, त्यानं कपडे केले आणि तो बाहेर पडला.

तो गेल्यावर शारदेनं आपलं पान वाढून घेतलं. जेवायला सुरुवात केल्यावर तिच्या लक्षांत आलं, कीं खरंच जेवणांतले सारे पदार्थ बिघडले आहेत; पण त्याबद्दल तिला फारसं आश्चर्य वाटलं नाहीं. कारण तिच्या चटकन् लक्षांत आलं आणि त्याबद्दल खेद होण्याऐवजीं तिला थोडंसं हंसूंच आलं. खरोखरीच आज तिचं स्वयंपाकांत मुळींच लक्ष नव्हतं. तिच्या डोळ्यांसमोर सारखी ती मोत्यांची माळ दिसत होती. माळेंतले ते टपोरे मोती, मोत्यांचें तेजस्वी गुलाबी पाणी, मधल्या पदकाचे लकाकणारे खडे तिच्या नजरेसमोरून हलत नव्हते. आज कितीतरी दिवस त्या मौक्तिकहाराबर ती नजर ठेवून होती, त्याच्या प्राप्तीची अभिलाषा बाळगून होती. जातां-येतां दुकानांत कांचेच्या शो-केसमध्यें लावलेले निरनिराळे मुक्ताहार तिच्या दृष्टीस पडत आणि मग तिच्या हृदयांत एक बारीक कळ उठे.

मुलींच्या जातीला आधींच साऱ्या शृंगाराचा सोस असतोच. या नियमाला अनुसरून शारदेला लहानपणापासूनच नटण्यामुरडण्याचा अति हव्यास होता. पण तिच्या नशिबानं जन्माला घातलं तें गरीब आईबापांच्या पोटीं. दागिना तर राहोच पण झुळझुळीत कपडासुद्धां तिला कधीं मिळाला नाहीं. चांगल्या वस्त्रालंकारांसाठीं ती आईच्या मागं हट्ट धरून बसली, म्हणजे तिची समजूत घालतांना आई म्हणायची, "लग्न झालं म्हणजे नवरा घालील हो तुला टोपलीभर दागिने!"

लहान वयांत आईच्या बोलण्यावर शारदेचा विश्वासहि बसे. शिवाय आजूबाजूला एखादी नवी नवरी चार दागिने घालून मिरवतांना दिसली, कीं शारदेच्या बाल मनाला वाटे, 'खरंच! आपलंहि लग्न झाल्यावर नक्कीच मिळणार असं सारं आपल्याला.'

नवरा म्हणजे काय, याची फारशी जाणीव नसलेल्या त्या वयांत शारदेला नवरा म्हणजे दागिन्यांचं आणि भारी वस्त्रांचं टोपलं आणणारा एखादा देवदूतच वाटायचा. त्या कल्पनेवर ती इतकी खूष होती कीं आई-बाबा आतांच कां आपलं लग्न करून देत नाहींत, असा तिला प्रश्न पडे. एकदां तर ती आईला म्हणालीसुद्धां, "नेहमीं सांगतेस लग्न झाल्यावर टोपलीभर दागिने मिळतील. मग टाक कीं एकदांचं लग्न करून!" तेव्हां सगळीं माणसं खदखदून कां हसलीं, तें मात्र तिला मुळींच उमगलं नव्हतं.

शेवटीं ज्या लग्नाची ती आतुरतेनं वाट पाहात होती, तो भाग्याचा दिवस उगवला. पण आतां तिला समजूं लागलं होतं. सोनं-नाणं बाजूलाच राहिलं; पण सुखानं पोटभर खाऊंपिऊं घालणारा नवरा मिळाला, तरी पुष्कळ झालं, याची तिला जाणीव झाली होती. त्यामुळं श्रीनिवासशीं तिचं लग्न झाल्यावर मंगळसूत्राखेरीज कशाचाहि तिच्या शरिराला स्पर्श झाला नाहीं, तरीहि निराशेचा एखादा सुस्कारा टाकण्यापलीकडं तिनं आपला अपेक्षाभंग मनाला फारसा लावून घेतला नाहीं. श्रीनिवासला सव्वाशें रुपये पगार होता. दोन खोल्यांची चांगली जागा राहायला होती. स्वभाव अगदीं शांत होता त्याचा. आपल्या नवऱ्याचा स्वभाव चांगला आहे, ही काय कमी महत्त्वाची गोष्ट आहे, असं शारदेला वाटे. उत्तम पति असणं हा एक अलंकारच आहे, असं शारदा समाधान मानून घेई. गरीब असला तरी त्याच्या इतर गुणांमुळं श्रीनिवास

शारदेला आवडत असे. म्हणूनच ती त्याच्या संसाराशीं समरस होत होती. आपल्याला झुळझुळीत लुगडं नेसायला नाहीं, अंगावर घालायला ठळकसा दागिना नाहीं, याचं बोचणारं शल्य ती श्रीनिवासकडं पाहून विसरायचा प्रयत्न करी. तिचा हा प्रयत्न चांगलाच यशस्वी झाला असता. पण...

शेजारच्या मालतीबाईनीं एक दिवस तिला हाक मारली आणि एक शहापुरी लुगडं दाखवलं. त्याची किंमत पंचावन्न रुपये आहे, हें पण मोठ्या अभिमानानं सांगितलं. त्या लुगडयाचा सुंदर रेशमी पोत, चमकणारे मिश्र रंग आणि जरीचे सुरेख काठ पाहून क्षणभर शारदा स्वत:ला विसरूनच गेली. कांहीं दिवसांनीं मालतीबाईनीं तिला पुन्हा एक आश्चर्याचा धक्का दिला. एक सुरेख पाणीदार मोत्यांची माळ तिला दाखवून त्या हंसत म्हणाल्या, 'कशी काय आहे ?'

" छान आहे कीं–" शारदा म्हणाली होती. पण मनांत ती विचार करीत होती, कीं मालतीबाईनीं इतके पैसे कुठून आणले असावे. त्यांच्या यजमानांना तर श्रीनिवास इतकाच पगार मिळत होता. जवळजवळ त्यांत आणखी मालती-बाईंना दोन मुलं पण होतीं. असं असून लुगडं घ्यायला, माळ आणायला त्यांच्याजवळ कुठून पैसे आले असावे, हें शारदेला कळेना. ती चेष्टेनं म्हणाली, " माधवरावांना प्रमोशन मिळालेलं दिसतंय्. आम्हांला पेढे पाहिजेत हो!"

मानेला झटका देत मालतीबाई म्हणाल्या, " कुठलं आलं आहे प्रमोशन, शारदा ! आणि प्रमोशन मिळालं तरी एकदम शंभर-दोनशें का मिळतं!" बोलतांबोलतां मालतीबाईनीं ती माळ शारदेच्या गळ्यांत अडकवली आणि त्या म्हणाल्या, " आरशांत तरी पाहा एकदां शारदे, तुझ्या गळ्यांत किती सुरेख दिसत आहे ही माळ!"

खरंच! शारदेच्या सांवळ्या पण तजेलदार वर्णाला अगदीं खुलून दिसत होती ती माळ ! मोती कसा उठून दिसत होता. मोठ्या कष्टानं शारदेनं ती माळ काढून मालतीबाईंच्या हातांत दिली. बॉक्समध्यें ती ठेवतां ठेवतां मालती बाईनीं विचारलं, " तुला घ्यायची आहे का माळ शारदा? हे मोतीवाले आमच्या नात्याचे आहेत. अगदीं खात्रीचा माल मिळेल. घेऊन टाक, मनांत भरली आहे तर."

मनांतून कष्टी होत पण वरकरणी हसून शारदा म्हणाली होती, " अन् देऊं काय त्यांना ? दोनशें कवडचा चालतील का दिल्या तर ? अहो, सगळा खर्चवेंच होऊन पांच रुपयेसुद्धां शिल्लक राहात नाहींत दर महिन्याला, असं हे म्हणतात- मग ही एवढी दोनशेंची माळ घ्यायला कुठून पैसे जमणार ? "

" खुळी आहेस शारदा तूं . अग, मला तरी यांनीं खुषीनं काढून एवढे पैसे दिले अशी का तुझी कल्पना आहे ? छेः ! असं थांबून बसलं तर जन्मभर कांहीं मिळायची आशा नको करायला."

मालतीबाईंचं बोलणं ऐकून शारदा बुचकळ्यांत पडली. उत्सुकतेनं तिनं विचारलं, " म्हणजे माधवरावांनीं नाहीं पैसे दिले तुम्हांला ? "

मालतीबाई हसल्या आणि म्हणाल्या, " पैसे त्यांचेच ग. पण त्यांनीं दिलेले मात्र नव्हेत."

त्यांच्या या उत्तरानं शारदेचा गोंधळ आणखीच वाढला. ती मनाशीं म्हणाली, " त्यांचेच पैसे पण त्यांनीं दिलेले मात्र नव्हेत याचा अर्थ काय? मग काय खिशांतून चोरून घेतले; पण एवढी चोरी समजल्याशिवाय कशी राहील?"

मालतीबाई शारदेपेक्षां मोठ्या असल्यानं त्यांना चेष्टेनं का होईना, पण उघड असं म्हणणं तिला बरं वाटलं नाहीं. त्याच पुढं म्हणाल्या," आज सहा वर्षं त्यांना अगदीं पत्ता लागूं दिला नाहीं."

शारदा घरीं आली. तिच्या मनाचं सारं समाधान नाहींसं झालं. मोत्यांचा सर पाहून तिचे डोळे फिरले. विवेकानं दडपून टाकलेली तिची अलंकार-प्रियता जागी झाली. मालतीबाईंनीं तिला दिशा दाखवून दिली होती. इतके दिवस तिचा निरुपायच होता. पण आतां पैसे जमा करण्याचा गुरुमंत्र तिला सांपडला होता. त्या मार्गाचा अवलंब करण्यांत वाईट तें काय होतं...! नवऱ्याची थोडीशी फसवणूक होती, एवढंच. पण ती गोड फसवणूक होती. त्या वंचनेचा शेवट गोड होता.

शारदेचा निश्चय ठरला. मालतीबाईंच्या पावलांवर पाऊल टाकायचें. करून पाहायला काय हरकत आहे, असा तिनं स्वतःलाच प्रश्न विचारला. जमलं तर जमलं; नाहींतर...नाहीं हें ठरलेलंच आहे. असं कांहीं केल्यावांचून आपली मनीषा पुरी होणं अशक्यच आहे.

आतां शारदेला तोच एक ध्यास लागला. कुठल्या उपायानं आपला खाजगी खजिना वाढवितां येईल, हाच एक मंत्र तिच्या ध्यानींमनीं होता. एखादी वस्तु आणावयाची झाल्यास चार ठिकाणीं हिंडून घासाघीस करून ती आणूं लागली. पावशेर भाजीच्याऐवजीं अदपावांतच काम भागवूं लागली. घरांतली रद्दी, बादली, डबडीं सारं कांहीं जपून ठेवून पैशापैशासाठीं पन्नासजणांना हाका मारूं लागली. श्रीनिवासनं चुकनहि एखादा पेपर फाडूं नये म्हणून काळजी घेऊं लागली.

असं करतांकरतां एकदांचे दोनशें रुपये जमले शारदेजवळ. दोनशेवा रुपया आपल्या कुणग्यांत टाकल्यावर शारदेचा जीव शांत झाला. अनिमिष नेत्रांनीं तिनं आपला ठेवा न्याहाळून पाहिला. पुनःपुन्हा त्या नोटा मोजून पाहिल्या.

आज शारदा दुकानांत जाणार होती मालतीबाईंना घेऊन. आणि गेलीं दोन वर्षं जिचा तिनं ध्यास घेतला होता ती रत्नमाला खरेदी करणार होती. त्यामुळंच सकाळपासून तिला कांहीं सुचत नव्हतं. स्वयंपाकांतले पदार्थ करण्यांत तिचं लक्ष नव्हतं. शक्य असतं तर स्वयंपाकाला अजिबात फाटा द्यावा असंच तिला वाटलं होतं. पण मग श्रीनिवासनं तिला कारण विचारलं असतं. तें आतांच सांगायची तिची इच्छा नव्हती. माळ आणल्यावर गळ्यांत घालूनच त्यांच्यापुढं उभं राहायचं अशी शारदेची योजना होती.

दोन वाजतांच शारदेनं आपली वेणीफणी आटोपली आणि पैसे काढून ठेवावे म्हणून तिनं आपली ट्रंक उघडली. लग्नांतल्या जरीच्या साडीमधें तिनं ते पैसे लपवून ठेवले होते. ते पैसे जमविण्यासाठीं तिनं किती त्रास घेतला होता, धीर धरला होता, माळ घेण्याच्या एकाच ध्येयानं प्रेरित होऊन पैशा-पैशासाठीं देह झिजविला होता. ती एक तपस्याच होती तिची. आणि ते दोनशें रुपये म्हणजे तिच्या तपाला प्राप्त झालेली सिद्धीच होती. आज ती माळ खरेदी केली म्हणजे तिच्या कष्टांचं चीज होणार होतं. श्रमांचा परिहार होणार होता.

"हें काय चाललंय् तुझं!" पाठीमागून आलेल्या त्या आवाजानं शारदा इतकी दचकली, कीं तिच्या हातांतून नोटा खालीं पडल्या. आपल्याच विचारांत दंग असल्यानं श्रीनिवास आलेला तिला कळलंच नाहीं. नोटांकडं

बोट दाखवून श्रीनिवासनं तिला विचारलं, "हे पैसे कुठले इतके तुझ्याजवळ?"

शारदा भानावर आली. खालीं पडलेल्या नोटा गोळा करीत, त्यांच्या प्रश्नाकडं लक्ष न देतां तिनं विचारलं," आज तुम्ही आतां कसे घरीं आलांत?"

" सकाळीं तूं फारच चवदार स्वयंपाक केला होता ना! पण त्याचा आस्वाद घ्यायला सकाळीं मला वेळ नव्हता, म्हणून आतां आलों."

शारदेनं चटकन् स्टोव्ह पेटवून शिरा, चहा करून दिल्यावर श्रीनिवास निघून गेला. शारदेच्या कपवशा विसळून होतात तोंच मालतीबाईचा मुलगा येऊन आईचा निरोप सांगूं लागला कीं, 'पाहुणे, आले आहेत म्हणून उद्यां दुकानांत जाऊं या.'

एवढंसं तोंड करून शारदा 'बरं' म्हणाली आणि तांदूळ निवडायला घेऊन बसली. पण आजचं काम उद्यांवर पडलं हें कांहीं ठीक झालं नाहीं अशी तिला हुरहूर लागून राहिली. त्यांत संध्याकाळीं ऑफिसमधून आल्यावर चहा पितांपितां श्रीनिवास तिला म्हणाला, " तूं विसरली असशील, पण मी नाहीं विसरलों अजून. इतके पैसे कुठून आले तुझ्याजवळ, याचा उलगडा केलाच पाहिजे तुला."

श्रीनिवासच्या रागीट आवाजावरून आणि अप्रसन्न चेहऱ्यावरून शारदेनं ताडलं, कीं आतां हा प्रश्न आपल्याला चेष्टेवारी नेतां येणार नाहीं. त्यानं आपल्याला असं हडसूनखडसून विचारावं याचा तिला फार राग आला. आंतल्याआंत जळफळत तिनं आपण ते पैसे कसे आणि कशाकरितां जमविले तें सांगून टाकलं. तिचा खुलासा ऐकल्यावर श्रीनिवासचा राग निवळला आणि तिच्या पाठीवर थाप मारीत तो म्हणाला, " वा! दांडगी कल्पकता आणि चिकाटी आहे तुझी."

श्रीनिवासच्या मनांतलं संशयाचं धुकं वितळलं असलं तरी शारदेची कळी खुलली नाहीं. उलट आपला सगळाच आंखलेला कार्यक्रम फिसकटला हें पाहून ती कांहींशी चिडली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं चहापाणी उरकून, स्वयंपाकाची तयारी करीत करीत ती मनाशीं निश्चय करीत होती. 'आज कांहीं झालं तरी मालतीबाईना घेऊन मोतीवाल्याकडे जायचंच.'

तिला विचारमग्न पाहून श्रीनिवास चेष्टेनं म्हणाला, " मोत्याची माळ घरांत येईपर्यंत आम्हांला कांहीं चांगलं जेवण मिळायची आशा नाहीं. म्हणून म्हणतों तूं आजच जाऊन झटपट खरेदी करून टाक माळेची."

" अगदीं हाच विचार ठरवला आहे मीं ! "

" पण मग तरी लक्ष लागणार ना ? नाहींतर आधीं माळ आणायची आहे म्हणून अन् मग नवीन जिन्नस घरांत आला म्हणून. तुला होईल माळ पण आमच्या पोटाचे मात्र हाल–"

" पुरी झाली चेष्टा. तें पाहा पोस्टमननं पत्र टाकलेलं दिसतंय्."

श्रीनिवासनं घाईनं पत्र फोडलं आणि तें वाचतांवाचतां त्याचा चेहरा पार उतरून गेला. भाजी चिरायची अर्धवट टाकून उत्सुकतेनं बाहेर आलेल्या शारदेच्या हातांत पत्र देऊन तो खुर्चीवर टेकला. श्रीनिवासच्या भावजयीचं तें पत्र होतं. तिनं लिहिलं होतं–गेले सहा महिने हे आजारीच आहेत. डोकं दुखणं, अशक्तपणा वाटणं, हातपाय गाळणं अशा तक्रारी सुरू होत्या. थोडंसं औषधपाणी करायचं; जरा बरं वाटलं कीं दुर्लक्ष करायचं. शेवटीं घेरी येऊन पडले ऑफिसांत. डॉक्टर म्हणतात, ' भिण्याचं कारण नाहीं; विश्रांतीची व चांगलं पौष्टिक खाण्यापिण्याची जरुरी आहे.' किडुकमिडूक विकून सध्यां सोय केली आहे; पण असे सहा महिने घालवायचे आहेत. तुम्ही हातभार लावाल ना ?

पत्र टेबलावर टाकून शारदा आंत जाऊं लागली. श्रीनिवासनं तिला हाक मारली, " शारदा–" शारदा थबकली. श्रीनिवासची आणि तिची नजरानजर झाली. त्याच्या नजरेंतला अर्थ शारदेला समजला, पण न समजल्याचा बहाणा करून ती आंत निघून गेली.

दोन दिवस झाले. दोघंहि आपल्याशींच चुळबुळत होतीं. श्रीनिवासला वाटत होतं–' आपण दादांना मदत केली पाहिजे. संकटांत उपयोगी पडलं पाहिजे. पण आपल्याजवळ पैसे कुठं आहेत ? थोडेसे जमलेले लग्नांत खर्च झाले. आतां तर शिल्लकच उरत नाहीं. शारदेजवळ दोनशें रुपये आहेत ते तिनं द्यायला काय हरकत आहे ? वेळप्रसंगीं पतीची लाज राखणं हें तिचं कर्तव्यच नव्हे का ? '

शारदेला वाटत होतं–' मला माहीत आहे, यांचा माझ्या पैशांवर डोळा आहे. कुठून मला दुर्बुद्धि झालीन् यांच्या नजरेला पैसे पडले. कुठल्या

दि. भाग
क्रमांक
नो. दि. ९९

कुमुहूर्तावर मीं पैसे जमवायला सुरुवात केली कुणास ठाऊक? पण यांचं तरी असं कां ? माझं मन यांना जाणतांच येत नाहीं. माझा विरस झाला तरी चालेल. आपल्या भावजयीची तळमळ तेवढी त्यांच्या लक्षांत येते. पण मी मुळींच भीक घालणार नाहीं. एक पैसा देणार नाहीं.'

शेवटीं श्रीनिवासनंच माघार घेतली. कारण भावाला भेटायला जाणं फार लांबणीवर टाकणं त्याला बरं दिसेना. नाइलाजानं तो शारदेला म्हणाला, " शारदा, दादा-वहिनी मला आईवडिलांच्या ठिकाणीं आहेत. त्यांच्या अडचणींत मदत करायला नको का ? "

शारदा अंथरुणं घालीत होती. चादरीच्या सुरकुत्या नीट करीत ती म्हणाली, " जरूर करावी मदत. मी कशाला नको म्हणूं ! "

शारदेच्या आवाजांतला परकेपणा श्रीनिवासला जाणवला. तिच्या चेहऱ्यावरचा निर्विकारपणा पाहून त्याला चोड आली. पण तसंच मऊपणानं तो म्हणाला, " असं काय करतेस बरं, शारदे ? माझ्याजवळ पैसे नाहींत हें तुला माहीत नाहीं का ? माझ्या पगारांत जेमतेम महिना जातो, एवढंच ! " तरीहि शारदा कांहींच बोलली नाहीं. तिचं मौन हें भावी वादळाचं सूचक आहे, हें श्रीनिवासच्या लक्षांत आलं. पण आतां त्यानं बोलून टाकायचं ठरविलं– " तुझ्याजवळ दोनशें रुपये आहेत, त्यांतून शंभर दे मला."

" समजा, ते नसते किंवा माझ्याजवळ आहेत, हें तुम्हांला समजलंच नसतं, तर तुम्हीं काय केलं असतं ? "

" काय करणार...! वहिनींना वस्तुस्थिति कळवून टाकली असती."

" मग आतांहि तसंच करा. मी पैसे देणार नाहीं ! " शारदेनं अंगावर पांघरूण ओढून घेतलं आणि तिनं भिंतीकडं तोंड वळवलं. आतां मात्र श्रीनिवासला राग आला. तिच्या अंगावरचं पांघरूण बाजूला करून तिला आपल्या बाजूला वळवीत तो म्हणाला, " पैसे तूं जमविले असलेस तरी ते माझ्याच कमाईंतून ना ? तूं कांहीं कुठं मिळवायला गेली नव्हतीस. तेव्हां त्या पैशांवर तुझ्याइतकाच माझाहि हक्क पोचतो–"

" छान–! ते पैसे जमवण्याकरितां मीं किती श्रम केले त्याची कांहींच किंमत नाहीं. माझ्या मेहनतीचं आणि व्यवहारीपणाचं फळ आहे तें. सर्वस्वीं माझे पैसे आहेत ते. तुमचा काडीचा हक्क नाहीं पोचत त्यांवर, समजलांत ? "

शारदेचं तें सडेतोड उत्तर ऐकून श्रीनिवास अगदीं खिन्न झाला आणि म्हणाला, " शारदा, कायदेशीरपणाच दाखवायचा असता तर मी केव्हांच ते पैसे हस्तगत करूं शकलों असतों. पण मला तशी बळजबरी नको आहे. मनापासून तूं पैसे दिले असतेस तरच मला ते हवे होते. मर्जी तुझी ! उद्यां दुपारीं मी जाणार आहें. निदान मुलांना कांहीं खाऊ तरी देशील ना ?"

सकाळीं दोघं उठलीं आणि त्यांचा अबोला सुरू झाला. शारदेशीं एक अक्षरहि न बोलतां श्रीनिवासनं आपले सारे व्यवहार केले. जेवायची वेळ होईपर्यंत कपडे पाहून बॅग भरून ठेवली. पान बाढलेलं दिसतांच जेवण करून तो बाहेर पडला. त्याच्या उदास चेहऱ्यावरच्या दुखावलेल्या भावनांच्या छटा पाहून क्षणभर शारदेचं मन विचलित झालं. आपलं चुकलं तर नाहीं ना असं तिला वाटलं. इतक्या स्पष्ट शब्दांत आपण त्याला नकार द्यायला नको होता, असा विचार क्षणमात्र तिच्या मनांत चमकून गेला. पश्चात्तापाची सूक्ष्म लहर आपलं अंतःकरण व्यथित करीत आहेसा तिला भास झाला. पण हें सारं क्षणाचंच होतं. लगेच तिनं आपल्या मनाला सावरलं. ओठावर ओठ दाबून आपलं कांहींहि चुकत नसल्याचा निर्णय घेतला आणि जेवणं उरकून मालतीबाईंना दुपारीं बाजारांत चलण्याची सूचना द्यावी असा विचार करून शारदा बाहेरच्या खोलींत आली. दारांत एक पाकीट पडलं होतं. भावाचं हस्ताक्षर तिनं ओळखलं. त्यानं लिहिलं होतं–

" प्रिय ताई,

दादा पास झाल्याचं मीं तुला कळविलं होतं. नोकरीसाठीं केलेल्या अर्जाला उत्तर आलं आहे. त्याला दिल्लीला भेटायला बोलावलं आहे. पण जायचं म्हणजे शंभरदीडशेंचा खर्च आहे. उत्तम कपडे पाहिजेत. शिवाय परीक्षेच्या श्रमांनीं आणि काळजीनें दादा बराच खराब झाला होता. जायला पंधरा-वीस दिवसांचा अवधि आहे. तेवढ्यांत टॉनिक, पौष्टिक, खाणंपिणं देऊन प्रकृति आणखी चांगली केली पाहिजे. पण बाबांजवळ तर पैसा उरला नाहीं. शिक्षणापायींच सारं खलास झालं. आतां दादाच्या नोकरीकडेच डोळे लागले आहेत. ही नोकरी मिळाली तर सारं घर सावरलं जाईल. पुष्कळ वणवण केली; पण कुणी एक छदामसुद्धां द्यायला तयार नाहीं.

तूं देतेस का ताई पैसे ? दादाच्या नोकरीवर आमच्या आशा अवलंबून आहेत. पण तूं तरी कुठून देणार ! "

पत्र अगदींच त्रोटक होतं. मनांतली निराशा अर्धवट व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला होता तो. तें पत्र वाचून शारदेच्या मनांत कालवाकालव झाली. तिचं हृदय गहिवरून आलं. आपण मालतीबाईकडं जायला निघालों होतों, हें ती विसरून गेली. परिस्थितीशीं झगडणारीं तिचीं भावंडं, श्रांत आणि हताश झालेले तिचे आईवडील यांचे चेहेरे तिच्या डोळ्यांपुढं उभे राहिले आणि तिच्या डोळ्यांना पाणी आलं. त्यांना उद्देशून जणूं ती म्हणाली, 'कां नाहीं देणार मी पैसे? जरूर देईन. माझीं जिव्हाळ्याचीं माणसं संकटांत असतांना मला मोत्यांची माळ घालून काय सुख होणार आहे? तुम्हांला उपाशी ठेवून मीं माळ गळ्यांत अडकवली तर तिनं मला शोभा येण्याऐवजीं गळ्याला फांस लागल्यासारखाच वाटेल. खरंच! किती बरं झालं, त्या दिवशींच जाऊन माळ घेतली नाहीं म्हणून. माळ घेण्याचं लांबणीवर पडलं तेव्हां मला वाटलं कीं, कुठल्या मूहूर्तावर मीं पैसे जमवायला सुरुवात केली. पण आतां वाटतंय् अगदीं चांगल्या शुभ शकुनावरच सुरुवात झाली, म्हणूनच आज माझ्या माणसांच्या ऐन वेळीं ते उपयोगी पडत आहेत. आजच पाठवून देतें आणि तुम्हां सर्वांची काळजी नाहींशी करतें.'

विचारांचा ताण सहन न होऊन कीं काय शारदा खुर्चीवर विसावली आणि तिला एकदम श्रीनिवासचं स्मरण झालं. 'इथंच उभं राहून त्यांनीं आपल्या भावजयीचं पत्र वाचलं होतं. आपल्याप्रमाणंच त्यांचाहि चेहरा उतरून गेला होता आणि हातपाय गळून असेच ते खुर्चीवर बसले होते. पण त्या वेळीं आपल्याला त्यांच्या यातना समजल्या नाहींत. त्यांना किती वाईट वाटलं, याची कल्पना आली नाहीं. ती आतां आली आहे. शीः! किती क्षुद्र झालें होतें मी. त्या माळेच्या लोभानं मला असं पछाडलं होतं कीं मी माणुसकी गमावून बसलें होतें. पतीच्या अंतःकरणाशीं समरस होतां येत नव्हतं. त्या मेल्या माळेची मोहिनी अशी जबरदस्त होती कीं त्यापायीं मीं त्यांची मागणी सरळ धुडकावून लावली. त्यांना दुरुत्तरं केलीं. पण ते किती चांगले. त्यांचंच म्हणणं बरोबर होतं. त्यांचेच आहेत ते पैसे. एखाद्यानं बळेंच काढून घेतले असते. त्यांनाहि तें अशक्य थोडंच होतं. पण ते माणसासारखे वागले. त्यांनीं जबरदस्तीनं घेतले असते, तर आज आपल्या हातांत एक कवडी राहिली नसती. आणि मग भावाचं पत्र वाचून आपला जीव कितीहि कळवळला असता,

अनुक्रम २९८०
दिनांक आ.आ.
क्रमांक १९११
दि. 3-7-97

तरी त्याचा काहीं उपयोग झाला नसता. किती मनाचा मोठेपणा दाखविला. त्यांनीं आपला तोल जाऊं दिला नाहीं. उलट माझी समजूत घालायचा प्रयत्न केला. पण मी माझ्या शहाणपणाच्या तोऱ्यांत होतें. दोनशें रुपये सांचल्याची धुंदी माझ्यावर चढली होती. त्यांना जमत नसलेली गोष्ट करून दाखविल्याचा उन्माद माझ्यांत संचारला होता. बरं झालं हें पत्र आलं म्हणून. जावें त्याच्या वंशा–अगदीं वेळेवर आलं पत्र नि माझ्या डोळ्यांत चांगलं झणझणीत अंजन पडून माझी धुंदी उतरली, माझी चूक मला समजली. नाहींतर माझ्याविषयीं त्यांच्या मनांत किल्मिष निर्माण झालं असतं. दुजाभाव उद्‌भवला असता आम्हां दोघांत अंतर निर्माण झालं असतं. माझ्या माळेकडं बघून त्यांना सुख वाटण्याऐवजीं त्यांचं मन व्यथित झालं असतं. मग मी तरी त्या माळेची शोभा कुणाला दाखविणार होतें!

शारदा उठली. तिनं तोंड स्वच्छ धुतलं. स्टोव्ह पेटवून श्रीनिवासाबरोबर देण्यासाठीं दोन पदार्थ तयार केले. तेवढ्यांत श्रीनिवास आलाच. त्याला चहा देऊन मग तिनं आपल्या भावाचं पत्र त्याला वाचायला दिलं. त्याचं पत्रं वाचून झाल्यावर हातांतल्या नोटा त्याच्यापुढं करीत शारदा म्हणाली, "मला क्षमा करायची गडे. वेडयासारखं कांहींतरी बोललें मी तुम्हांला. तुमचं मन ओळखलं नाहीं मीं; पण मघाशीं सदाचं पत्र आलं अन्–" शारदेचा गळा दाटून आला. तिला पुढं बोलवेना. "हे शंभर रुपये आपण घेऊन जा. शंभर दादाला पाठवून देतें." शारदेच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

श्रीनिवास क्षणभर अगदीं आश्चर्यचकित झाला. तिच्या बोलण्याचा आशय लक्षांत आल्यावर मात्र तो चटकन् उठला आणि तिला जवळ ओढून तिचे अश्रु पुशीत तो म्हणाला, "वेडी आहेस. त्यांत माफी ती कसली करायची! लहान आहेस अजून तूं शारदा. अलंकारांची हौस असणं यांत कांहींच गुन्हा नाहीं. एखादा अलंकार अगर झुळझुळीत लुगडंसुद्धां मी तुला घेऊं शकत नाहीं. म्हणून तूं जमवायचा प्रयत्न केलास. ते मीं मागितले म्हणून राग येणं अगदीं साहजिक आहे. परत आलों कीं शॉर्टहँड शिकून ऑफिसच्या परीक्षांना बसण्याचं पण मनावर घेतों. मग माझा पगार वाढेल आणि वर्षभरांत तुला माळ आणीन तोंपर्यंत ही करमालाच गोड करून घे!"

● ● ●

IRBK-0106399